शनिवार
२७ सप्टेंबर १९८०
१ रुपया

# माणूस

## घाशीरामचे परदेशगमन....निर्भेळ शुभेच्छा....

घाशीराम कोतवाल हे पुण्याच्या थिएटर अ‍ॅकडेमी या संस्थेचे मराठी नाटक जर्मनीला जाणार ही गोष्ट गेले वर्षभर तरी या क्षेत्रातल्या सर्व मंडळींना माहीत होती. जर यासंबंधी काही आक्षेप घ्यायचा होता तर जाणाऱ्यांची सगळी तयारी झाल्यावर ऐनवेळी, अगदी विमानाची तिकिटे वगैरे काढून झाल्यावर आक्षेपक मंडळींनी धावाधाव करावी, वातावरण तापवावे, हे निश्चितच उचित नव्हते व नाही. परदेशात नाटक न्यायचे म्हणजे अगोदर बरीच पूर्वतयारी करावी लागते. परदेशी संस्थांशी काही व्यवहार ठरवले गेलेले असतात. तिकडची नाटचगृहे, प्रयोगाच्या तारखा, प्रवास, राहण्याची व्यवस्था वगैरे किचकट तपशील बऱ्याच अगोदरपासून आखला गेलेला असतो. हा सगळा पूर्वनियोजित कार्यक्रम, कुणाला तरी ऐनवेळी झटका आला म्हणून उधळून लावला गेला असता तर शोभा कुणाची झाली असती? घाशीराममुळे परदेशात भारताची बदनामी होणार म्हणून कासावीस झालेल्या मंडळींनी असाही थोडा विचार करावा की, या घाशीरामाचे जाणे शेवटच्या क्षणी रद्द केले गेले असते तर भारत सरकारची, मराठी नाटच संस्थांची, पर्यायाने आपली सगळ्यांचीच बदनामी झाली नसती का? आपण भारतीय गलथान, गोंधळी आहोत हा आपला दुर्लौकिक जगभर आहे. गलथानपणा, गोंधळ घरातल्या घरात, देशातल्या देशात चालू आहे तोवर ठीक आहे; पण परदेशांशी संबंध आल्यावर तरी आपण काटेकोरपणे, घड्याळाच्या काट्याप्रमाणे वागायला नको का? घाशीराममुळे नाना फडणिसांची किंवा ब्राह्मणवर्गाची बदनामी वगैरे होते असे मानणाऱ्यांनी अंमळ गंमतीने असाही विचार करून पाहावा की, वेगळ्या अर्थाने या नाटकामुळे नानांच्या ऐतिहासिक कर्तृत्वाला उजळाच तर मिळत नाही? पहा. एकोणिसाव्या शतकाची ही सुरुवात आहे. बंगाल इंग्रजांनी घशात घातलेला आहे. दक्षिण सगळी साफ झालेली आहे. दिल्लीचा बादशाह इंग्रजांचा गुलाम बनला आहे. तरी मराठी राज्य नानामुळे टिकून आहे. नाना गेल्यावरही शनवारवाड्यावर इंग्रजांचे निशाण रोवायला इंग्रजांना तब्बल अठरा-वीस वर्षे झगडावे लागलेले आहे! मराठी राज्य इंग्रजांना सर्वांत शेवट शरण गेलेले आहे—शीखांची ज्योत फक्त नंतर काही काळ तरळत राहिलेली होती. हे कर्तृत्व सामान्य नोहे आणि हे सर्व नाना गाजवतो—अवतीभवती फंदफितुरी आणि स्वार्थ माजलेला असताना, स्वतःजवळ पेशवाईतील साडेतीन शहाणपणांपैकी फक्त अर्धेच शहाणपण असताना आणि घाशीराम नाटकात दाखवले ते खरे असल्यास आपला बराचसा वेळ नाचगाण्यात घालवत राहून देखील! 'इंग्रजांना खडे चारले नाही लागू दिला थार। भले बुद्धिचे सागर नाना, ऐसा नाही होणार!' हा एका समकालीन शाहिराने नानांच्या कर्तृत्वाला घातलेला उजव्या हाताचा मुजरा मानला तर घाशीराम हा आधुनिकांनी डाव्या हाताने घातलेला मुजरा समजायलाही काय हरकत आहे? लंपट नाना एवढे कर्तृत्व गाजवू शकला; जर तो तसा नसता तर? इतिहासालाही कदाचित वेगळे वळण लागले असते असे वाटायला लावणारे 'घाशीराम' हे एक चित्रण का समजू नये? शिवाय नजिकच्या भविष्यकाळात लंपटता, भ्रष्टाचार वगैरे दुर्गण न राहता सद्गुणही ठरण्याची शक्यता आहे! त्या वेळी नानांना दोन्ही हातांनीही मुजरे कशावरून घातले जाणार नाहीत? तेव्हा मंडळी, झाले गेले विसरून जा आणि आम्हा सामान्य प्रेक्षकांना चांगली नाटके, चांगल्या कलाकृती अशाच देत राहा. निळू फुले यांनी घाशीराम परदेशी चालला म्हणून शुभेच्छा व्यक्त करणे ठीक आहे; पण विषवल्ली उपटून फेकून देण्याची भाषा अशा प्रसंगी का उच्चारली जावी? (पहा—केसरी दिनांक २२ सप्टेंबर) कलाक्षेत्रात राजकारण घुसडले जाते ते असे. घाशीरामला परदेशात जायला मनाई करणाऱ्यांची मनगटी भाषा आणि निळू फुले इत्यादिकांची ही शुभेच्छावगुंठित उपटाउपटी—सर्वसामान्यांना तरी हे अतिरेक खेदजनक वाटल्याशिवाय राहणार नाहीत!

घाशीरामचे लेखक तेंडुलकर यांच्या म्हणण्याप्रमाणे नाटक ऐतिहासिक नाहीच. असे जर असेल तर ही सगळी वादावादी फोल व विनाकारणच चालली आहे असे म्हणावे लागते. ती यापुढे तरी थांबणे मग चांगले नाही का?

—श्री. ग. मा.

अलिगढ विद्यापीठात विद्यार्थ्यांसमोर भाषण करताना पं. नेहरू म्हणाले होते....

# 'तुम्हाला या भूतकाळाविषयी काय वाटते?'

श्री. ज. द. जोगळेकर हे कट्टर राष्ट्रवादी, पर्यायाने सावरकरवादी, विचारवंत-लेखक म्हणून ओळखले जातात. 'विवेक', 'धर्मभास्कर' आणि अन्य अनेक साप्ताहिकामधून अनेक वर्षे आपल्या विचारांच्या अनुषंगाने त्यांनी केलेले स्फुट लेखन प्रसिद्ध आहे. 'हिंदुस्थानचे राष्ट्रीयत्व', 'युतीशिवाय गती नाही', 'दोन युद्धे' इ. पुस्तकेही त्यांनी लिहिली आहेत. 'भारतातील युद्धशास्त्राची उपेक्षा' या त्यांच्या पुस्तकास राज्यसरकारचा पुरस्कारही मिळाला आहे.

गेल्या सात सप्टेंबरला त्यांच्या स्वत:च्याच राष्ट्रविचार साहित्य प्रकाशनाने प्रसिद्ध केलेल्या 'निधर्मी राष्ट्रवादाचे शिल्पकार' या त्यांच्या नव्या पुस्तकाचा प्रकाशनसमारंभ श्रीमती दुर्गाबाई भागवत यांच्या उपस्थितीत पार पडला. आपल्या भाषणात दुर्गाबाईंनी श्री. जोगळेकर यांच्या लेखनाची प्रशंसा केली. त्या म्हणाल्या, 'या देशात राहणाऱ्या प्रत्येक नागरिकाच्या मनात या देशाबद्दल प्रेम असले पाहिजे. देशाच्या इतिहासाचा रास्त अभिमान असला पाहिजे. ज्यांच्या मनात या देशाबद्दल प्रेमाऐवजी द्वेषाची भावना आहे त्यांना या देशात राहण्याचा काहीही अधिकार नाही!' असे प्रतिपादन करून त्या म्हणाल्या की, 'देशाविषयीची निष्ठा ही अन्य कोणत्याही निष्ठापेक्षा वरचढ असली पाहिजे!'

लोकसत्तेचे संपादक श्री. विद्याधर गोखले आपल्या भाषणात म्हणाले की, 'निधर्मी या शब्दाने आपल्या समाजकारणात जो गोंधळ निर्माण झाला आहे तो कमी होऊन त्याबाबतची वैचारिक स्पष्टता येण्यास श्री. जोगळेकर यांचे पुस्तक प्रभावी ठरेल. श्री. जोगळेकर यांनी ललित लेखकाप्रमाणे हसत-खेळत राष्ट्रवाद शिकविण्याचा यशस्वी प्रयत्न केला आहे, असेही ते म्हणाले.

महाराष्ट्र टाइम्सचे सहसंपादक श्री. दि. वि. गोखले यांनी आपल्या भाषणात निधर्मीपणाच्या नावाखाली अल्पसंख्यांकांच्या तुष्टीकरणाचे जे प्रयत्न चालतात त्यावर कठोर टीका केली. भारत नेहमीच निधर्मी राहिला आहे; पण खरा निधर्मीपणा आणायचा असेल तर मुस्लिम व ख्रिश्चनानाही समान नागरी कायदा लागू केला पाहिजे!

या कार्यक्रमात शरद कुलकर्णी यांचेही भाषण झाले पुस्तकाचे लेखक ज. द. जोगळेकर यांनी या प्रसंगी फार काही बोलण्यास नकार दिला. या आटोपशीर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुंबई मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष श्री. चंद्रशेखर वाघ हे होते त्यांचेही या प्रसंगी समयोचित भाषण झाले.

श्री. जोगळेकर यांच्या दा सुमारे शंभर पानांच्या पुस्तकात रिशेल्यू, तालेरां, काव्हूर, बिस्मार्क, केमाल, जेफरसन आणि कोसूथ या सात व्यक्तींच्या चरित्रांचे धावते चित्रण आहे या चरित्र-चित्रणाच्या अनुषंगाने प्रथमत: युरोपात मध्ययुगाच्या अंताला राष्ट्र या संकल्पनेच्या सीमा कशा साकारू लागल्या याचा आढावा त्यांनी घेतला आहे राष्ट्रकल्पनेतूनच पुढे राष्ट्राविषयीची निष्ठा उदयाला आल्यावर हळूहळू संप्रदायनिष्ठेच्या बाबतीत शासक उदासीन कसे होत गेले, त्यांतून आंतरराष्ट्रीय निष्ठाना पायबंद कसा बसला याचा एक अस्पष्ट आलेख श्री. जोगळेकर यांनी पुस्तकाच्या प्रारंभीच्या प्रकरणात दिला आहे. राष्ट्रवादी नेत्यांच्या व्यक्तिरेखा वाचताना हा आलेख अधिकच स्पष्ट होतो.

रिशेल्यू आणि तालेरां हे फ्रेंच राष्ट्रवादी, काव्हूर हा इटालियन, बिस्मार्क हा जर्मन, कोसूथ हा हंगेरियन आणि तुर्कस्थानचा केमाल अशा सात व्यक्तींची ही चरित्र-चित्रणे एकाच वेळी माहितीप्रद आणि रंजक झाली आहेत यात शंका नाही. ऐतिहासिक लेखनात एरवी आढळणारा रखरखीतपणा इथे जवळजवळ दिसून येत नाही. प्रत्येक व्यक्तिचित्रणाची सुरुवात व शेवट यातही नाविन्य आहे. चित्रणांच्या अखेरीस त्या त्या व्यक्तीच्या कामगिरीचे राष्ट्रकल्पनेच्या संवर्धनाच्या संदर्भात त्यांनी केलेले मूल्यमापनही रोखठोक आहे.

**साप्ताहिक माणूस**

वर्ष : विसावे
अंक : सतरावा
२७ सप्टेंबर १९८०
किंमत : एक रुपया

संपादक
श्री. ग. माजगावकर
साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

वार्षिक वर्गणी :
चाळीस रुपये

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन.
अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.
राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे, येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.
साप्ताहिक माणूस
१०२५ सदाशिव, पुणे ३०. दूरध्वनी : ४८ ३४ ५९

निधर्मी राष्ट्रवादाचा आलेख या पहिल्या प्रकरणात भारतातील हिंदी राष्ट्रवादाच्या कल्पनेविषयी धावते विवेचन त्यांनी केले आहे. यातच राष्ट्रकल्पना साकार करण्यासाठी कोणते घटक आवश्यक आहेत याची त्यानी तपशीलवार चर्चा केली. त्यातूनच जागतिक पार्श्वभूमीवर राष्ट्रकल्पनेचा उदय व विकास कसा झाला याचा आढावाही त्यांनी घेतला आहे.

हा 'आलेख' व त्याआधीचे त्याचे निवेदन यातून ह्या लेखसंग्रहामागची लेखकाची भूमिका स्पष्ट झाली आहे. 'मिलोव्हिन जिलास' व 'जॉन हम्फ्रेस' याच्या 'सॅटरडे रिव्ह्यू' या पाक्षिकातील लेखामध्ये भारताच्या एकात्मतेच्या भवितव्याबाबत जी चर्चा झाली त्याच्या अनुषंगाने त्यानी या निवेदनाची सुरुवात केली आहे. निवेदनाच्या शेवटी आपला निष्कर्ष माडताना ते म्हणातात, 'जिलास म्हणतात त्याप्रमाणे भविष्यातील राष्ट्रवादाचा पाया जर सांस्कृतिक नि वांशिक राहिला तर हिंदुस्थानला त्याच्या प्राचीन सास्कृतिक परंपरेमुळे एकात्म राहण्यास अडचण येऊ नये. म्हणूनच हा देश एकात्म राहील असे भविष्यकथन जिलास यांच्या मताविरुद्ध करण्याचे धाडस मी करीत आहे.'

अर्थात हे सांगत असतानाच देश एकात्म राहण्यासाठी काय केले पाहिजे हेही त्यांनी मोजक्या शब्दात सागितले आहे. या प्रारंभीच्या निवेदनातून हे स्पष्ट झाले आहे की, श्री. जोगळेकर सात पाश्चात्य राष्ट्रवाद्याच्या चरित्राचा आढावा घेत असले तरी त्यामागे कळकळ आहे ती भारतीय राष्ट्रवादाच्या भल्याची.

सात चरित्र-चित्रणांना जोडूनच भारतातील खऱ्या आणि खोटया राष्ट्रवादी नेत्यांच्या बऱ्या-वाईट कामगिरीचा आढावाही लेखकाने घेतला असता तर ते अधिक औचित्यपूर्ण ठरले असते. श्री. जोगळेकरांच्या मनातील कळकळ अशा आढाव्यामुळे ठळकपणे जाणवली असती.

श्री. जोगळेकर यांचा हा लेखसंग्रह या विषयावर गेली अनेक वर्षे चालू असलेल्या त्यांच्या चिंतनाचा व अभ्यासाचा परिपाक आहे. दोन-चार डझन जाडजूड ग्रंथांच्या अभ्यासातूनच हे माहितीपूर्ण लेख उतरले आहेत. त्यामुळेच अशा सर्व संदर्भग्रंथांची एकत्रित सूचि पुस्तकाच्या अखेरीस देण्याची गरज होती. पुस्तकाच्या प्रथमावृत्तीत त्यामुळे राहिलेली ही अपूर्णता दुसऱ्या आवृत्तीत राहू नये अशी अपेक्षा आहे.

हे पुस्तक अभ्यासातून उतरले आहे व ते वाचल्यावर श्री. जोगळेकर याचा व्यासंग किती दांडगा आहे याची कल्पना येते. अशा व्यासंगी व्यक्ती हमखास भेटण्याचे ठिकाण म्हणजे येथील एशियाटिक लायब्ररी! या लायब्ररीतील आपल्या अभ्यासिकेत श्री. जोगळेकर यांनी माझ्या प्रश्नाना मनमोकळी व मुद्देसूद उत्तरे दिली. त्यातूनच आकाराला आलेली त्याची एक छोटी मुलाखत—

**राष्ट्रवादाच्या अभ्यासाची प्रेरणा आपल्याला कुठे मिळाली?**

-गेली अनेक वर्षे मी या विषयाचा अभ्यास करीत आहे. त्याची प्रेरणा मिळाली ती प्रामुख्याने स्वातंत्र्यवीर सावरकरांकडून! सावरकराच्या विचारांनी मी प्रथमपासूनच अतिशय प्रभावित झालो होतो. त्यांच्या राष्ट्रवादी विचाराचा प्रचार करावा ही ऊर्मीही प्रथमपासूनच माझ्या मनात होती; पण त्या काळात काँग्रेसचा 'हिंदी राष्ट्रवाद' प्रचारात होता. त्यामुळे सावरकराचा राष्ट्रवाद हिंदी राष्ट्रवादापेक्षा कसा श्रेष्ठ आहे हे पटवून सागणे सोपे नव्हते. ते सोपे व्हावे व सावरकराचे राष्ट्रवादी विचार समजावून सागताना आपण कुठेही कमी पडता कामा नये असे सारखे जाणवू लागले. त्यातूनच राष्ट्रवादाचा जागतिक संदर्भातील उदय व विकास या अभ्यासाकडे मी वळलो. 'हिंदुस्थानचे राष्ट्रीयत्व' हा ग्रंथ त्यातूनच तयार झाला.

**आपल्या पुस्तकात भारतातील राष्ट्रवादाचा उदय व विकास याची चर्चा आलेली नाही. आपल्या दृष्टिकोनातून भारतातील राष्ट्रवादाचा उदय व विकास कसा झाला?**

—भारतातील राष्ट्रवादाची सुरुवात काँग्रेसच्या स्थापनेच्या सुमारासच झाली; पण कांग्रेसने स्वीकारला व पुढे रुजवला तो 'हिंदी राष्ट्रवाद.' 'भारतीय' किंवा 'हिंदु' राष्ट्रवाद नव्हे. सावरकरांचा राष्ट्रवाद हा पूर्णपणे निधर्मी राष्ट्रवाद आहे; पण काँग्रेसच्या हिंदी राष्ट्रवादात मात्र धार्मिक व अन्य संदर्भात अल्पसंख्यांक, बहुसंख्यांक इ. भेदांना स्थान होते व आहेही. या पार्श्वभूमीवर सावरकरांचा निधर्मी राष्ट्रवाद आला तेव्हा आपला राष्ट्रवाद जातीय नाही हे पटवून देण्यातच त्यांना बराच वेळ खर्च करावा लागला. ही अडचण उद्भवली याचे कारण हिंदी राष्ट्रवादाची उभारणी प्रामुख्याने secularism च्या विदेशी कल्पनेवर आधारलेली होती. आपल्या तात्कालीन नेतृत्वाने भारताच्या इतिहासाचे भान न ठेवल्याने ही पाश्चिमात्य कल्पना जशीच्या तशी स्वीकारली. सावरकरांनी आपला इतिहास जाणला होता व त्या अनुषंगानेच आपला राष्ट्रवाद त्यांनी माडला.

**भारताच्या संदर्भात राष्ट्रवादाची सोपी पण सुटसुटीत व्याख्या आपण कशी कराल?**

—भारत स्वतंत्र झाल्यावर अलीगढ विद्यापीठात विद्यार्थ्यांसमोर बोलताना पं. नेहरू म्हणाले होते—'भारताला बौद्धिक नि सांस्कृतिक श्रेष्ठत्व मिळवून देणाऱ्या आपल्या पूर्वजांविषयी नि आपल्याला *मिळालेल्या वारशाविषयी मला अभिमान वाटतो हे मी आपणास* सागितले. तुम्हाला या भूतकाळाविषयी काय वाटते? तुम्ही याचे भागीदार नि वारसदार आहात असे तुम्हास वाटते का? हा भूतकाळ आपला आहे असे वाटून त्याविषयी अभिमान वाटतो का?' माझ्या मते पं. नेहरूंच्या या प्रश्नांची होकारार्थी उत्तरे म्हणजे भारतीय राष्ट्रवादाचा स्वीकार! ही होकारार्थी उत्तरे म्हणजेच भारतीय राष्ट्रवाद!

**परंतु लोकशाहीचा फायदा घेऊन काही मंडळी या प्रश्नांची नकारार्थी उत्तरे देतील, आजही देतात, त्यांचे काय?**

—स्पष्ट सांगावयाचे तर अशा मडळींना एक प्रकारची 'बौद्धिक शिस्त' प्रयत्नपूर्वक लावली पाहिजे. खऱ्या निधर्मी राष्ट्रवादाच्या उभारणीस याची नितात आवश्यकता आहे; परंतु हे काम सोपे नाही. एक-दोन पिढया हा विचार रुजविण्यासाठी खर्च पडतील, तेव्हा कुठे आजच्या खोटया निधार्मिकतेची जागा हा खरा निधर्मी राष्ट्रवाद घेऊ शकेल.

**रिशेल्यू, तालेरां इ. च्या चरित्रांतून निधर्मी राष्ट्रवाद रुजविताना त्यांना कोणत्या आव्हानांना सामोरे जावे लागले याचा तपशील आपण दिला आहे; परंतु त्यांच्या, त्या वेळच्या परिस्थितीपेक्षा**

भारतातील आजची स्थिती खूपच भिन्न आहे. अशा स्थितीत आपल्यासमोरील आव्हाने मोठी आहेत असं नाही आपल्याला वाटत ?

–वाटतं तर ! आव्हानं खूपच मोठी आहेत. मुळात आपल्याकडे राष्ट्रवाद, निधर्मिकता या सगळ्या संकल्पना अस्पष्ट आहेत. त्यातच विचारांच्या शुद्धतेचा अभाव आहे. ही स्थिती असण्याचं मुख्य कारण आपल्याकडे हे सगळं निवडणुकीशी बांधलं गेलेलं आहे. खरं म्हणजे काही मुद्दे हे जाणीवपूर्वक निवडणुकीत येणार नाहीत हे बघितले पाहिजे. असे काही मुद्दे, की जे DeGate चे असू शकत नाहीत त्यात निधर्मी राष्ट्रवादाचा मुद्दा आहे; पण हा सुज्ञपणा न दाखविता राजकारणी लोक एकात्मता - समित्या निर्माण करून 'राष्ट्रवाद' जोपासत आहेत.

याचा अर्थ आपल्याकडील लोकशाही पद्धतीमुळे, विशेषतः निधर्मी राष्ट्रवादाच्या संदर्भात, वैचारिक गोंधळ निर्माण झाला आहे, असे म्हणता येईल काय ?

–नाही ! लोकशाहीत सुद्धा काही किमान पथ्ये पाळली तर वैचारिक स्पष्टता निर्माण करता येते. आपल्याकडे आज ही गोंधळाची स्थिती आहे याचे कारण पं. नेहरूंसारख्या सामर्थ्यवान नेत्याने सुद्धा या प्रश्नावावत राजकीय निर्धार दाखविला नाही. आज व यापूर्वीही इंदिरा गांधींकडे प्रचंड सामर्थ्य आहे व होतेही. गरज आहे ती या सामर्थ्याचा, पाठबळाचा उपयोग करून कणखर भूमिका घेण्याची. निधर्मी राष्ट्रवादाच्या आड जेव्हा काही गोष्टी आल्या तेव्हा रिशेल्यूपासून केमालपर्यंत सर्वांनीच तो विरोध मोडून काढला. आपल्या नेत्यांनी मात्र कधीच कणखर वा खंबीर भूमिका घेतली नाही.

फ्रान्स, जर्मनी इ. देश आपल्यापेक्षा आकाराने लहान व त्यांच्याकडे भाषिक-भेदही तुलनेने कमी. तेव्हा मोठा देश व अनेक प्रकारचे अंतर्गत भेद यामुळे निधर्मी राष्ट्रवाद रुजला नाही असे काहींचे म्हणणे आहे. आपल्याला काय वाटते ?

– आपल्या सीमा विस्तृत आहेत व अंतर्गत भेदांच्या भिंती बऱ्याच आहेत हे खरेच; पण असे असूनही आपल्याकडे जवळजवळ सर्व प्रांतात एका संघराज्याचे आपण घटक आहोत ही भावना दिसून येते. तामिळनाडू हा प्रांत केवढा आणि त्यातला अण्णा द्र. मु. क. हा पक्ष केवढा ! पण त्यांना अ. भा. अण्णा द्र. मु. क. असे नांव घ्यायला आवडते, यामागे हीच भावना आहे. ऐतिहासिक काळापासून आपला देश एकात्मच राहिला आहे, आपल्या सांस्कृतिक इतिहासात याचे अनेक दाखले आहेत.

एकूणच भारतात निधर्मी राष्ट्रवादाचा किंवा सावरकरांच्या विचारांची फारशी प्रगती किंवा प्रसार झाला नाही याचे नेमके कारण काय ?

–सावरकरांच्या राष्ट्रवादाचा प्रसार झाला नाही हा एक गैरसमज आहे. कांग्रेसचा हिंदी राष्ट्रवाद या ठिकाणी रुजला याचे कारण रानडे, गोखले, टिळक, गांधी आणि नेहरू अशांच्या समकालीन पाच पिढ्यांनी हिंदी राष्ट्रवाद उचलून धरला. याउलट निधर्मी वा हिंदू राष्ट्रवादाचे सावरकर हे एकांडे शिलेदार होते. १९३७ मध्ये ते सार्वजनिक जीवनात आले व युद्ध सुरू होण्यापूर्वीचा म्हणजे ३७ते४० असा केवळ तीन वर्षांचा काळ त्यांना आपल्या विचाराच्या प्रचारासाठी मिळाला. १९४० नंतर युद्धाच्या धक्काधक्कीत ते जमले नाही व स्वातंत्र्यानंतर हिंदी राष्ट्रवादाच्या प्रचाराची संधीच मिळाली नाही, हे लक्षात ठेवले पाहीजे.

भारतातील राष्ट्रवादाच्या संदर्भात रा. स्व. संघ व संघाच्या राष्ट्रवादाचा समावेश आपण कुठे कराल ?

–सावरकरांनी १९३७–४० या काळात ज्या हिंदू राष्ट्रवादाचा प्रसार केला त्याचेच Institutionalised स्वरूप म्हणजे या काळात व नंतर लगेचच झालेली रा. स्व. संघाची भरभराट. संघाचा राष्ट्रवाद हाही अखेर हिंदू अथवा भारतीय राष्ट्रवादच आहे.

आसामसारखे आजचे अनेक प्रश्न हे खोट्या निधर्मिकतेतून निर्माण झाले आहेत, यावर उपाय काय ?

–मुळातच जे चुकीचे धोरण ठेवले गेले त्याचे हे परिणाम आहेत. खऱ्या निधर्मिकतेचा प्रसार हाच त्यावरील उपाय आहे. यातून असे सरकार अस्तित्वात आले पाहिजे की जे धर्माधिष्ठित तर नाहीच, पण त्याचबरोबर धर्माधिष्ठित सामाजिक व कायदेशीर बंधनेही मानीत नाही. या संदर्भात हिंदू राष्ट्रवाद काय करतो ? तर हिंदू राष्ट्रवाद जातिसंस्थेतून बाहेर पडून काहींची वैचारिक कक्षा विस्तृत करतो तर दुसरीकडे आंतरराष्ट्रीय निष्ठा असलेल्यांना आवर घालून राष्ट्रीय निष्ठा रुजवितो.

सध्याच्या एकूण वातावरणात या हिंदू राष्ट्रवादाचे भवितव्य कसे वाटते ?

–मोजक्या शब्दात सांगायचे तर एकूण कठीण आहे ! Oh, Hindus, you have lost the political eye हे सावरकरांनी काही वर्षांपूर्वी सांगितले, ते आजही तितकेच खरे आहे. त्यामुळेच हिंदू राष्ट्रवादाचे भवितव्य कठीण वाटते.

–विनय सहस्रबुद्धे

---

# दक्षिण कोरिया
## विरोधी नेत्यास देहांताची शिक्षा

वा. दा. रानडे

'देशात लोकशाही आणण्यासाठी मी शक्य ते सर्व प्रयत्न केले आहेत; पण बंड करून सत्ता काबीज करण्याचा प्रयत्न मी कधीच केलेला नाही !' दक्षिण कोरियातील विरोधी पक्षाचे नेते किम एएजंग लष्करी कोर्टापुढे आपले बचावाचे भाषण करीत होते. ते म्हणाले, 'देशद्रोहाचा आरोप माझ्यावर ठेवण्यात आला आहे; पण कल्पनेत सुद्धा तो विचार माझ्या मनात कधी आला नाही !'

देशात गेल्या मेमध्ये झालेल्या विद्यार्थी निदर्शनांची प्राथमिक जबाबदारी सरकारनेच स्वीकारली पाहिजे. लष्करी कायदा चालू ठेवण्याची काही आवश्यकता नसता सरकारने तो सहा महिने न उठविण्याने विद्यार्थ्यांच्या

सहनशीलतेचा अंत झाला, राजकीय सुधारणाचे वेळापत्रक जाहीर करण्यास सरकार जो विलंब लावीत आहे त्यावरून देशात लोकशाही आणण्याच्या त्याच्या अभिवचनाबद्दलच, शंका निर्माण झाल्या आहेत.'

किम दक्षिण कोरियातील सर्वांत लोकप्रिय नेते आहेत. लष्करी कोर्टाने त्याना देहांताची शिक्षा दिली, त्याविरुद्ध वरिष्ठ लष्करी कोर्टात, तसेच सुप्रीम कोर्टात अपील करता येईल. अध्यक्षाकड दयेचा अर्ज केल्यास तेही आपल्या अधिकारात शिक्षा कमी करू शकतात; पण सध्याच्या राजवटीचे धोरण लक्षात घेता त्याची शिक्षा कमी होण्याची शक्यता फारशी नाही !

किम याच्याबरोबरच आणखी चोवीस जणावर सरकार उलथण्याचा कट केला असा आरोप ठवण्यात आला होता. त्याना दोन वर्षांपासून वीस वर्षापर्यंत कारावासाच्या शिक्षा झालेल्या आहेत. या शिक्षाबाबत एक लक्षात घण्यासारखी गोष्ट म्हणजे सरकारी वकिलान निरनिराळ्या आरोपीच्या बाबतीत ज्या शिक्षचा शिफारस केली होती तसाच निकाल लष्करी कोर्टाने दिला आहे. त्यात काहीही बदल कलला नाही. कोर्टाला कोणत्याच शिक्षत बदल करावासा वाटला नाही. त्याने आपला स्वतंत्र न्यायबुद्धी काहो वापरली का नाही असे प्रश्न अशा निकालामुळे मनात यतात. किम याच्याबरोबर ज्या चोवीस जणावर खटले भरण्यात आले त्यात विद्यापीठाचे प्राध्यापक, धर्मोपदेशक, लेखक, राजकीय नते व विद्यार्थी आहेत. कोर्टाला त्याच्या वतीने आवाहन करताना किम आपल्या भाषणात म्हणाले, 'मला दया नको आहे. मी स्वतःकडे पूर्ण जबाबदारी घतो; पण कृपा करून इतरावर अन्याय करू नका !'

गल्या मेमध्ये विद्यार्थ्यांची निदर्शने होण्यापूर्वी सरकार व विरोधी पक्षनेते यानी एकमकाशी सवाद साधून समझोता करण्याचा प्रयत्न कला होता का? त्या दृष्टीने पुरेसे प्रयत्न झाल नाहीत याबद्दल किम यानी स्वतःवर त्याचप्रमाणे त्या वेळचे अध्यक्ष कोई किमु ह्वाह आणि नॅशनल असेंब्लीचे सभासद यांच्यावर आपल्या भाषणात टीका केली. सरकार आणि विरोधी पक्ष यानी देशापुढील प्रश्न सोडविण्यासाठी समझोत्याने तोडगा काढायला हवा ही त्याची भूमिका लोकशाहीवादी नेत्याच्या भूमिकेशी सुसंगतच आहे. याबाबतीत आपल्याकड येणारा दोष त्याना स्वीकारला; पण मुख्य दोष सरकारकडेच येतो. सरकारला समझोता नकोच होता.

परवानगी न घेता जाहीर सभा भरविण्यात आपल्याकडून लष्करी कायद्याचा भंग झाला. अमेरिकेतील आपल्या मेहुण्याकडून आलेले दहा हजार डॉलर आपण स्वतः-जवळ ठेवून आपण परदेशी चलन कायद्याचा भंग केला हे आरोप किम यानी मान्य केले आहेत.

'न्यूयॉर्क टाइम्स' मध्ये २३ फेब्रुवारी १९७३ च्या अंकात प्रसिद्ध झालेल्या एका लेखाचाही किम यांच्यावरील आरोपपत्रात उल्लेख करण्यात आला होता. 'उत्तर कोरियात स्वातंत्र्य नसले तरी तुम्हाला तेथे निदान भाकरी मिळू शकते. दक्षिण कोरियात लोकाना भाकरीही मिळत नाही आणि स्वातंत्र्यही नाही' असे किम यानी या लेखात लिहिल्याचा आरोप होता. त्याबद्दल बचावाच्या भाषणात किम म्हणाले, 'माझे मूळ वाक्य असे होते : 'कम्युनिझम निदान भाकरीची तरी हमी देतो तेव्हा लोक आता कोणता मार्ग स्वीकारतील हे तुम्हालाच चागले कळू शकते.' देशापुढील आर्थिक प्रश्न सोडविण्यात सरकारला अपयश आले आहे. सरकार लोकाना भाकरीसुद्धा देऊ शकले नाही तर ते कम्युनिझमकड वळतील, असे किम यानी मी लेखात सूचित केले होते.

किम याचे बचावाचे भाषण चालू असतानाच कोर्टात बाकीच्या चोवीस आरोपीच्या पत्नी व नातलग यानी निदर्शन करून 'लोकशाही चिरायु होवो!' 'किम दाऊजिंग चिरायु होवोत' अशा घोषणा केल्या. कोर्टाच्या रखवालदारानी लागलीच त्याना बाहेर नेले.

किम याना झालेली शिक्षा फार कडक आहे अशी प्रतिक्रिया वॉशिंग्टनमध्ये अमेरिकन परराष्ट्रमंत्री मस्की यानी व्यक्त केली; पण शाब्दिक नापसंती व्यक्त करण्यापलीकडे अमेरिका याबाबतीत काही करील असे वाटत नाही. आपल्या राजकीय हितसंबंधाच्या दृष्टीने दक्षिण कोरियाशी सहकार्याचे संबंध अमेरिकेला हवे आहेत ते चालूच राहतील. 'शिक्षा अयोग्य आहे. ती अंमलात आणली जाऊ नये यासाठी शक्य ते प्रयत्न आम्ही करू' असे जपानचे परराष्ट्र मंत्री मासामोशी इटो यानी टोकियोत सांगितले. 'किम याना झालेल्या शिक्षेने आम्हाला धक्का बसला. या खटल्यात न्यायाची आंतरराष्ट्रीय पातळीवर मान्य झालेली तत्त्वे पाळण्यात आलेली नाहीत.' अशी प्रतिक्रिया लंडनमध्ये अॅम्नेस्टी इंटरनॅशनल या संस्थेने व्यक्त केली आहे. या जागतिक प्रक्रियेचा दक्षिण कोरियाच्या लष्करी सरकारवर काही परिणाम होतो का हे लवकरच समजेल.

किम याच्याबद्दल दक्षिण कोरियन सरकारने ऑगस्टमध्ये परदेशात एक छोटी पुस्तिका प्रसृत केली होती. किम यानी आपल्या सर्व आयुष्यात पद्धतशीरपणे नेहमी कम्युनिस्ट भूमिकाच घेतलेली आहे. सशस्त्र बंडाची योजना त्यांनी आखली होती. देशाचे स्थैर्य, सुरक्षितता व एकसंघता टिकविण्यासाठी सरकारने त्याच्याविरुद्ध योजलेले उपाय योग्यच आहेत असे त्यात म्हटले होते अशी पूर्वग्रहदूषित भूमिका सरकारने सुरुवातीपासून घेतल्यावर या खटल्याचा निकाल काय लागणार हे उघडच होते.

नवे अध्यक्ष जनरल चुन दू ह्वॉन यानी गेल्या मेपासूनच आपल्या मार्गातील सर्व अडथळे दूर करून सत्तेवरील आपली पकड घट्ट बसविण्यासाठी उपाय योजायला सुरुवात केली होती. जनरल चुन लवकरच अध्यक्षीय निवडणूक घेणार असल्याच्या बातम्या होत्या. या निवडणुकीत त्यांना किमसारखा जबरदस्त प्रतिस्पर्धी आपल्याविरुद्ध उभा राहायला नको आहे. माजी अध्यक्ष पार्क चुग ही याच्याविरुद्ध त्यानी १९७१ मध्ये निवडणूक लढविली होती. तेव्हा फारच थोड्या मतानी ते हरले होते आणि सध्याची त्याची लोकप्रियता लक्षात घेता ते निश्चित निवडून आले असते.

खटल्याच्या बातमीचे वृत्त देण्यावर सरकारने निर्बंध घातले होते. किम आणि या खटल्यातील इतर आरोपी याना आपली बाजू माडण्याचा पूर्ण सधीच देण्यात आली नाही. सहा वर्षांपूर्वी टोकियोतील एका हॉटेलातून दक्षिण कोरियाच्या सी. आय. ए. चे लोकांनी किम याना पळवून नेऊन बंदिस्त ठेवले होते. त्यानतर त्याना उघडपणे कार्य करण्याची सधीच मिळाली नाही आणि आता त्याना देहांताची शिक्षा झाली आहे.

अशी ही दक्षिण कोरियातील लोकशाही आहे. वीस वर्षांपूर्वी उत्तर कोरियाच्या फौजानी दक्षिण कोरियावर हल्ला केला तेव्हा दक्षिण कोरियातील लोकशाहीच्या रक्षणासाठी युनोच्या फौजा गेल्या होत्या; पण त्या युद्धाचा खरा उद्देश लोकशाही रक्षणापेक्षा कम्युनिझमला रोखणे हा होता. दक्षिण कोरियात लोकशाही रुजलेली नसून जनतेला त्यासाठी खडतर लढा द्यावा लागणार आहे. □

# ठराविक हप्त्यांनीं रोख रक्कम तर मिळवाच खेरीज आयुर्विम्याचें संरक्षणही मिळवा.



पांच वर्षानंतर पैसे परत



दहा वर्षानंतर पुन्हां पैसे परत



पंधरा वर्षानंतर पुन्हां पैसे परत



वीस वर्षानंतर पुन्हां पैसे परत

## पैसा परतीची योजना (मनी बॅक पॉलिसी)

### आधुनिक जीवनाच्या गरजा पूर्ण करणारी आदर्श योजना.

ठराविक हप्त्यांनीं रोख रक्कम आणि त्याखेरीज पॉलिसीच्या मुदतींत आपल्या कुटुंबाला आयुर्विम्याचे संपूर्ण संरक्षण पुरवणारी योजना.

मनी बॅक पॉलिसी ही १२ वर्षे, १५ वर्षे, २० वर्षे किंवा २५ वर्षे मुदतीची मिळते. विमेदाराला विम्याची संपूर्ण रक्कम त्यानें निवडलेल्या मुदतीनुसार तीन किंवा चार हप्त्यांत मिळते. मुलांचे शिक्षण, त्यांचे विवाह, त्यांच्या आयुष्याची सुरुवात, घर बांधणे-आदि कामासाठीं लागणारा एकरकमी पैसा किंवा दुसऱ्या कोणत्याही तांतडीच्या गरजपूर्ति-साठी लागणारा पैसा ह्या ठराविक मुदतीनें मिळणाऱ्या रक्कमांतून उभा राहतो.

पॉलिसीच्या मुदतींत केव्हांही विमेदाराचा मृत्यु ओढवल्यास संपूर्ण विम्याची रक्कम अदा केली जाते. त्याशिवाय ज्या मुदतीचे हप्ते भरलेले असतात त्या मुदतीचा बोनसही मिळतो. विमेदाराला आपल्या **ह्यातींत** आधींच परत मिळालेल्या रोख रक्कमा विचारांत घेतल्या जात नाहींत.

उज्वल भविष्याकडे ज्यांची दृष्टि असते अशा दूरदर्शी व्यक्तिसाठी ही आदर्श योजना आहे.

आपल्या एलआयसी एजन्टशी किंवा जवळच्या शाखा कार्यालयाशीं सविस्तर **माहितीसाठी संपर्क साधा.**

**भारतीय आयुर्विमा महामंडळ**

ADEUS/LIC/AS-29

# ‘तो’ आणि ‘ती’

विनय गुणे, संगमनेर

शिपायानं त्यांना माझ्यापर्यंत आणून पोचवलं.

खुर्चीवर बसत त्यांनी आपली ओळख सांगितली.

कारखान्यांचा सर्व्हे करणाऱ्या कोणत्या तरी सरकारी खात्यात होते ते.

त्यांना सर्व्हेचे फॉर्म्स भरून हवे होते.

त्यांचं योग्य प्रकारे आगत-स्वागत केलं.

लवंग वेलदोडा चघळत त्यांनी विषयाला तोंड फोडलं.

‘खरं तर सर्व्हेचे हे फॉर्म्स तुम्हीच भरून पाठवायचे; हे काम तुमचंय.’

‘पण तुम्ही व्हेरिफाय करायला येता दरवर्षी, तुम्ही याल म्हणून पाठविले नाहीत–’ मी. त्यांनी आपला पूर्वीचा धागा पुढं ओढला–

‘आता हे तुमचं काम आम्ही करायचं म्हणजे किती वेळ मोडेल?’

‘माहिती कलेक्ट करून ठेवलीये.’ माझं उत्तर.

‘आम्ही असे स्वतः काम करायला लागलो तर आमचं काम कधी संपणार?’

‘वेळ कशाला घालवायचा? आपण कामाला लागू या.’ मी फॉर्म्स त्यांच्या पुढ्यात सारले.

‘अर्थात एकमेकांच्या सहकार्यानं काम केलं तर होईल म्हणा.’

‘पाहिजे ती माहिती, रेकॉर्ड सादर करतो, सहकार्य करायला नाही कुठं म्हटलंय?’

‘नाही म्हणजे दिवस, दोन दिवस मोडायचे, सगळं फुकट नको जायला. आम्हाला पडलेल्या त्रासाचा तुम्ही विचार करायला पाहिजे.’

त्यांच्या ‘एकमेकांच्या सहकार्याचा’ अर्थ लक्षात आला.

‘आपण काम सुरू करू या’–मी.

ते मध्ये थांबले.

‘आपण काम सुरू करायच्या आधी मालकांना भेटू या, त्यांच्या कानावर घातलं म्हणजे बरं नाही का?’

मी दाद देत नाही म्हटल्यावर त्यांनी पुढची पायरी गाठली.

कितीही रुबाब करायचा म्हटलं तरी ‘हिटलरछाप’ मिशीनं बिघडलेलं त्यांचं व्यक्तिमत्त्व त्यांच्यातला जोर घालवून बसलेलं होतं. त्यांचं रुबाब करणं त्यामुळं हास्यास्पद होऊन बसलेलं होतं.

मी त्यांना मालकांच्या केबिनमध्ये नेलं. ओळख सांगितली.

—गृहस्थ आवाज चढवत बोलायला लागले.

‘हे काम तुमचं आहे...आमचा वेळ जातो...’ वगैरे वगैरे.

‘तुम्ही येता म्हणून ठेवलं होतं–आता पाठवू.’ मालकांचं सौम्य शब्दात उत्तर.

‘याला काय अर्थ आहे? पूर्वीच पूर्ण करायला हवं होतं!’— त्यांचा युक्तिवाद.

‘पाठवून देऊ!’ मालकांच्या आवाजाला धार.

‘एकमेकांना आपण सहकार्य करायला हवं.’

‘मग आम्ही कधी नाकारलंय?’

‘आमचा वेळ जातो.’

‘आम्ही पाठवून देऊ.’

‘सहकार्यानं कोणतेही प्रश्न सुटतात.’

‘आमचे लोक पूर्ण सहकार्य करतील.’

‘तुम्ही समजूनच घेत नाही.’

‘काय समजायचं?’

उतरत चाललेला त्यांचा आवाज. चढत चाललेला मालकांचा आवाज.

मालकांनी समोरची फाइल पुढे ओढली.

साहेब चरफडत केबिनच्या बाहेर.

‘तुमचे मालक कोऑपरेटिव्ह नेचरचे दिसत नाहीत?’

‘आपण काम पूर्ण करू या.’

‘काय अर्थ आहे, फुकट काम करायचं, तुम्ही लोक समजून घेत नाही’ ‘कोऑपरेटिव्ह नेचर’चे साहेब उत्तरले.

चरफडत कामाला लागले.

दोन-तीन तास काम झालं.

दोन-तीनदा कॉफीपान झालं.

लंचची वेळ झाली.

ऑफिस रिकामं झालं.

मीही आवरू या म्हटलं.

‘आम्ही मोठमोठ्या कंपन्यात जातो. उतरायला गेस्टहाउस देतात. दोन वेळेला जेवणाची सोय असते. निदान तेवढं तरी–हल्ली बोलल्याशिवाय काही खरं नाही बघा. दिवस कठीण आलेयेत.’ मी त्यांच्या जेवणाची सोय लावणार होतो.

संस्कृतीनं टाकलेलं ‘अतिथिधर्माचं’ ओझं फेकणं मला जमणार नव्हतं; पण त्यांचा चिरडीला आलेल्या मुलासारखा त्रागा.

मला त्यांची कीव आली.

लंचनंतर परत बैठक मारली. दोन-तीन तास काम झालं.

आवश्यक ती सर्व माहिती पुरविली. फॉर्म्स भरून झाले.

काम करतानाही त्यांची टकळी चालूच होती.

‘आलोय म्हणून करतोय, बाकीचे फॉर्म्स तुम्हीच भरा, द्या पाठवून!’

'तुमचे मालक काही कोऑपरेटिव्ह नेचरचे नाहीत. व्हेरिफाय करायला रेकॉर्ड घेऊन ऑफिसला बोलावतो. साधं 'सहकार्य' नाही म्हणजे काय?'

'चकरा मारायला लागल्या म्हणजे समजेल!'

त्यांचा केविणवाणा त्रागा.

दुसऱ्या दिवशी तयार फॉर्म्स न्यायला ते आले.

फॉर्म्सबरोबर एक बंद पाकीट.

फॉर्म्स न बघता बॅगेत जमा.

पाकीट मात्र उघडलं.

त्यांच्या चेहऱ्यावरचे बदलत जाणारे भाव बघण्यासारखे होते.

आल्यावर 'रुबाब' करणारा.

मालकांनी दाद दिली नाही म्हणून चरफडणारा.

त्यानंतरचा केविलवाणा त्रागा.

आणि आताचे त्यांच्या चेहऱ्यावरचे भाव त्राग्याच्या सार्थकाचे!

पाकिटात पंचवीसच्या नोटा बघून ते आनंदले.

झालेला आनंद त्यांना लपवता आला नाही.

'अखेर समजले तर तुमचे मालक, महागाई बघताच आहात, परवडत नाही, शिवाय पगार कमी...'

ऑफिसच्या कामासाठी सगळे भत्ते मिळणाऱ्या, पंचवीस रुपये किंमतीच्या त्या सरकारी माणसाच्या चिकट लाचारीची मला कीव आली. एखादा अपवाद वगळला तर सगळी सरकारी माणसं अशीच. शासन यंत्रणेचे हे भक्कम आधारस्तंभ!

पाच-पंचवीस रुपड्यांसाठी लाचार होतात—अधिकार गाजवतात, धाकदपटशा दाखवतात आणि आपण सगळे त्याला अपरिहार्य समजून सामोरे जातो. हे असंच चालायचं अशी स्वतःची समजूत पटवतो.

माझ्या माहितीतली एक मुलगी आहे.

मध्यमवर्गीय कुटुंबातली, पदवीधर.

बहुश्रुत—वाचनानं असेल, तिचं वाचन दांडगं आहे.

काही ठाम विचार बाळगणारी—कालपर्यंत मला तसं वाटत नव्हतं; पण अनुभवल्यावर पटलं.

तर तिला नोकरी मिळाली, एका नावाजलेल्या 'आदर्श' (?) शिक्षणसंस्थेत.

कामावर या म्हणून सांगितलं.

ती जायला लागली.

लेसन बघण्याचा फार्स झाला.

घ्यायचं ठरल्यावर संस्थेनं ऑफर दिली.

'पूर्ण पगारावर सही करायची, त्यातही ठराविक रक्कम मिळेल, बाकी शाळेला.'

तिनं कारणं विचारली.

'शाळेचे काही प्लॅन्स आहेत, बिल्डिंग उभारायचीये, फंड हवाय.'

तिनं पूर्ण रक्कम घेऊन त्यातली त्यांच्या अपेक्षेपेक्षा जास्त रक्कम बिल्डिंगफंडासाठी देऊ केली; पण रीतसर पावतीनिशी!

संस्थेला ते परवडणारं नव्हतं. अपेक्षित नकार मिळाला.

'नोकरीवर तुटून पडण्याच्या काळात', आलेली नोकरी घालवणारी ती मुलगी—

व्यवहारी लोक तिला मूर्ख म्हणतील; पण ती आनंदात आहे. स्वतःशी प्रामाणिक राहिल्याच्या मोबदल्यात नोकरी गेल्याची तिला खंत नाही!


ही परस्पर विरोधी दोन उदाहरणं—

आरामशीर नोकरी, खच्चून पगार, सगळे भत्ते घेऊनही पंचवीस रुपयांसाठी लाचार होणारा सरकारी माणूस!

आणि प्रामाणिकपणाच्या मोबदल्यात नोकरीवर लाथ मारणारी ती मुलगी—

—ती एकटीच असली तरी तिचा करारीपणा आम्हाला 'भक्कम ताठ' उभं राहायला शिकवून गेलाय! □


# तिसरी आवृत्ती



# सांगत्ये ऐका

रसिकांची, समीक्षकांची,
सर्वसामान्य वाचकांची
मान्यता लाभलेले
हंसा वाडकर यांचे
अनोखे आत्मचरित्र

किंमत : बारा रुपये

**राजहंस प्रकाशन, पुणे ३०**

लेखकाच्या मध्यपूर्वेतील मनमुराद भटकंतीवर व इराणमधील वास्तव्यावर आधारलेली वेगळी लेखमाला

लेखक विजय परुळकर । लेखांक आठवा

# इमामझादे, दारवीश, लाटसाहेब, इस्लामिक लेफ्टिस्टस्, इ.

इस्फहानमधील काम संपलं होतं. घाईघाईनं बायकोला एक पत्र लिहून सारे विचार, साऱ्या भावना एका पाकिटात बंद केल्या. तिला ते पत्र केव्हा मिळणार कुणास ठाऊक ! आज, आता मला जे वाटतंय ते तिला आठवड्याभरानं, कदाचित पंधरवड्यानंतर वाचायला मिळणार. हे पत्र मिळेल तेव्हा ती काय करत असेल ? पाकीट फोडताना तिच्या मनात भावनांचा काय खेळ चालू असेल ? पत्र वाचून ती उत्तर लिहायला बसेल तेव्हा मी काय अनुभवत असेन ? कुणास ठाऊक !

आता लिहिलेलं पत्रं घाईघाईनं जरी लिहिलं तरी लिहिताना समाधान मिळालं. ह्या पत्राला तिचं उत्तर कुठं, केव्हा, कधी मिळणार ह्याची पत्र लिहिताना काहीच कल्पना नाही. तिचं पत्र वाचताना आनंद होणार, समाधान मिळणार हे निश्चित; पण आता पत्र लिहिताना जे समाधान मिळतंय त्यापेक्षा ते समाधान वेगळं असणार! सतत प्रवासात असणाऱ्यांचं हे असंच ! अनुभवांचा संदर्भ अनेक वेळा चुकलेला. आज ह्या क्षणी मनात निर्माण होणारे प्रश्न कुठं तरी, कधी तरी, अगदी अनपेक्षित अशा प्रसंगातून, अघटितपणे सोडवले जाणार ! मनात निर्माण झालेलं भावनांचं वादळ कधी दीर्घ काळ पिंगा घालत राहतं तर कधी असा एखादा विचित्र अनुभव येतो की वादळ पहाता पहाता विरून जातं...

...हॉटेल शहाअब्बासच्या किमती कागदावरून घाईघाईनं लिहिलेलं पत्र घडी करून 'भारी' लिफाफ्यात सारलं आणि सीलबंद करण्यासाठी मी डिंकाच्या पट्टीवरून जीभ फिरवली तेव्हा तोंडभर पेपरमिंटचा ओलसर स्वाद पसरला. इराणचं पोस्टाचं तिकिट चिटकविण्यासाठी जिभेनं ओलं केलं की असाच गुळमट सुगंध ओठांवर रेंगाळायचा. नव्या इराणचा दरबारी थाट साधं पोस्टाचं तिकीट डकवताना देखील जाणवायचा.

पत्र पाकिटात बंद केलं आणि खोलीत पसरलेले कपडे आणि इतर सामान सुटकेसमध्ये भरलं. पुस्तकं, नोटस, टेपरेकॉर्डर, कॅसेटस वगैरे चीज वस्तू ब्रीफकेसमध्ये कोंबल्या आणि 'काही राहिलं नाही ना ?' ह्याची खातरजमा करून, भिंतीवरील चौकटीत अडकलेल्या सुहास्यवदना 'मस्तानी'ला मनातल्या मनात बाय्--बाय् करून खोली सोडली.

लाऊंजमध्ये सर्फराझ आणि हैदरी दिसत नव्हते. ते गाडीत सामान भरत असावेत ! मी 'कॅशियर'चा काउंटर गाठला आणि हॉटेल शहाअब्बासचं चार अंकी बिल् चुकतं केलं. शेजारी उभ्या असलेल्या 'पिशखिद्मद्'च्या चेहऱ्यावरील निरपेक्ष भावातून 'अंतरी'ची अपेक्षा स्पष्ट जाणवत होती. त्याला इच्छापूर्ती 'टिप' देऊन त्याचा सलाम स्वीकारत मी ब्रीफकेस उचलली आणि हॉटेल शहाअब्बासच्या लाऊंजमधील मऊमऊ पर्शियन गालिचे काहीशा जड पावलांनी (आणि बऱ्याचशा हलक्या खिशांनी) तुडवत दरवाजा गाठला. ही धर्मशाळा फक्त कोट्याधिशांना परवडण्यासारखी होती. माझ्यासारख्या पगारी नोकरदाराच्या प्रवासभत्त्याला हा खर्च झेपण्यासारखा नव्हता. हॉटेल शहाअब्बासमध्ये रहाणे हा एक आगळावेगळा अनुभव जरूर होता; पण 'महाखर्चिक अनुभव' हे लक्षात ठेवणं आवश्यक होतं. चित्रातील मस्तानी बघण्यासाठी हा खर्च अवास्तवच म्हणावा लागेल !

उरलेली सफर जर अशाच प्रकारच्या महागड्या हॉटेल्स्मध्ये राहून पार पाडायची वेळ आल्यास पाकीट संपूर्ण खाली होणार ह्याबद्दल संशय नव्हता. माझ्याजवळ डायनर्स क्लबचं क्रेडिटकार्ड होतं. त्यामुळं तशी चिंता नव्हती. इराणचा हा पहिलाच दौरा ! इराणी लोकांशी येणारा पहिलावहिला संबंध! हे इराणी असतील श्रीमंत, मेहमान नवाझ–अगत्यशील वगैरे; पण जरूर पडल्यास त्यांना 'हम भी कुछ कम नही' हे दाखवणं देखील आवश्यक होतं. खर्चाचं नंतर पहाता आलं असतं. खिशात क्रेडिटकार्ड असलं का खर्चाची काळजी वाटत नाही. महिनाअखेर हेच क्रेडिट व्याजानिशी भरावं

लागतं ती गोष्ट वेगळी; पण 'प्रतिष्ठे 'साठी खिशाला थोडीफार कात्री लागली तरी ते सहन करण्याची तयारी हवीच! नाही तर 'प्रतिष्ठा' कशी मिळणार? आंतरराष्ट्रीय वातावरणात प्रतिष्ठेचं प्रदर्शन करायला डायनर्स क्लब–कार्ड हमखास उपयोगी पडतं.

हॉटेल शहाअब्बासचं दार ओलांडून मी बाहेर आलो. सर्फराझ आणि हैदरीमध्ये हॉटेलबिलाच्या हिशोबावरून कसला तरी वाद चालला होता. हैदरीनं रूमसर्व्हिसला फोन करून पाचसहा वेळा आइस्क्रिम, फ्रूटसॅलड, केक्स् वगैरे 'शिरिनी' चा परस्पर फडशा पाडला होता. हैदरीचं म्हणणं होतं की, बिलातच काही तरी गफलत आहे. कारण त्यानं फक्त तीनच वेळा एकट्यानं खाल्लं होतं; पण सर्फराझ त्याला पाच 'ऑर्डरस्' दाखवून जाब विचारत होता. शेवटी बरीच उलटसुलट चर्चा होऊन एकदाची तडजोड झाली. हैदरीनं धुसपुसत चार ऑर्डरीचे पैसे सर्फराझला दिले आणि कडू चेहऱ्यानं स्वत.शीच काही तरी पुटपुटत तो डिकीमध्ये सामान रचू लागला. त्याला समजावणीवजा दम देत सर्फराझ मला उद्देशून म्हणाला–

'आगा–ए–विजे, पुढील प्रवासासाठी आपण डुंगी करू या!'

'डुंगी?' मी आश्चर्यानं विचारलं.

हैदरीवर नाराज झाल्यामुळं सर्फराझ आता दुसरंच एखादं वाहन डोणी, डमणी किंवा उंटाची गाडी वगैरे करणार अशी माझी समजूत झाली. माझा प्रश्नचिन्हांकित चेहरा पाहून सर्फराझ म्हणाला,

'अरे, डुंगी म्हणजे सहप्रवाशांनी प्रवासखर्चासाठी एकत्र केलेली रक्कम. प्रत्येकानं एक ठराविक रक्कम द्यायची. ती एकत्र करून एकाच्या हाती सोपवायची, अशी रक्कम म्हणजे डुंगी. त्यातून सगळा खर्च करायचा. पैसे संपले की पुन्हा डुगी करायची. आपण आता हैदरीकडे पाच पाच हजार देऊन ठेवू. तो स्वत.चे पाच हजार डुंगीत जमा करेल. चहापाणी, नाश्ता, जेवणखाण, हॉटेल्स, ड्रिंक्स सगळी बिलं हैदरी देईल म्हणजे-मग किचकट हिशोब ठेवण्याची गरज पडणार नाही. सगळा खर्च तिघात समान वाटला जाईल आणि मग तू किंवा मी व्होडका कमी पितो का जास्त, हैदरी कबाब किती खातो, शिरिनी किती खातो हे सगळे प्रश्न निर्माण होणार नाहीत.'

प्रवासखर्चाच्या समान वाटपाची, सोल्जर्स 'काँट्रिब्यूशन' पेक्षा काहीशी वेगळी अशी ही पद्धत मला आवडली. हैदरीवर मात्र दुधाचा ताण पडण्याची मला शक्यता वाटली म्हणून मी दोन अटी घातल्या. 'ड्रिंक्सचा खर्च डुगीमधून करायचा नाही.' कारण हैदरी न पिणारा त्याचप्रमाणे हॉटेलच्या खोलीचं भाडं फक्त माझ्यात आणि सर्फराझमध्ये वाटायचं. दोघांनी अटी मान्य केल्या आणि मी पाच हजार 'तुमान' हैदरीच्या स्वाधीन केले.

'बिसमिल्ला हो रहमान–ए रहीम' म्हणत हैदरीनं गाडी स्टार्ट केली आणि शहाअब्बासच्या इस्फहानला आम्ही खुदा हाफीज केलं. गाडी शिराझच्या रस्त्याला लागली आणि हैदरी सांगू लागला–

'हॉटेल शहाअब्बास एकदम बेहतरीन पण मी एक साधा 'रानंदे' (ड्रायव्हर). माझा पगार मामुली असल्या महागड्या हॉटेलमध्ये रहाणं मला कधीच परवडणार नाही; पण एका 'हिंदी' माणसाबरोबर आमची म्हणजे माझी आणि आगा–ए–सर्फराझची ही पहिलीच सफर. तू हिंदी आणि 'युनो' चा अधिकारी तेव्हा आम्हीपण इज्जतीला शोभेल असं वागायचं ठरवलं. आगा–ए–सर्फराझ घरचा रईस असला तरी त्याला हॉटेल शहाअब्बासचा खर्च परवडण्यासारखा नाही. तरी देखील तुझ्याबरोबरीनं शहाअब्बासमध्येच रहायचं असा आम्ही निश्चिय केला; पण हे सगळं प्रकरण 'खैली खैली गेरून! (भयंकर महाग) इज्जत सांभाळण्यासाठी एव्हढा पैसा खर्चावा लागत असेल तर पैसा नसलेल्यानी आपली इज्जत कशी काय संभाळायची?'

आणि असंच बरचचं काहीसं बडबडत गरिबी-अमीरीवर लेक्चर देत हैदरीनं मला अचानक सवाल केला–

'आगा-ए–विजे, तू साजमाने मिलाल (युनायटेड नेशन्स) चा बडा अधिकारी–तू नेहमी शहाअब्बाससारख्या बड्या हॉटेलातच रहात असणार ना?'

मी हसून सिगरेट पेटवली आणि हैदरीला म्हणालो.

'बाबा रे, सुदैवानं ह्या हॉटेल शहाअब्बासपेक्षा जास्त सुखसोयी असलेली आणि कमी महागडी हॉटेल्स आशियात आहेत. ही असली हॉटेल्स् फक्त श्रीमंत टुरिस्ट लोकांच्यासाठी! आपल्यासारख्या पगारदारांनी ह्यांच्या नादी न लागलेलं बरं! पण 'प्रतिष्ठा' आड येते, इज्जतचा सवाल येतो आणि मग नाइलाज होतो!!'

खरं आहे आगा-ए-विजे, मी मुसाफिरातवर असलो की नेहमी गाडीत झोपतो. माझा नाश्ता, जेवणखाण, उठणं-बसणं हे इतर अधिकाऱ्यांच्या बरोबरीनंच असतं; पण केवळ सहा तास झोपण्यासाठी हॉटेलच्या खोलीसाठी भरमसाठ पैसे खर्च करणं मी शक्यतो टाळतो. मला गाडीत मस्त झोप येते. सवय आहे. त्यामुळं माझा प्रवासभत्ता देखील थोडाफार वाचतो, बचत होते.'

'तुला प्रवासभत्ता किती मिळतो?'

गाडीचा वेग वाढवीत हैदरी म्हणाला–

'मला आणि आगा-ए-सर्फराझला सारखाच प्रवासभत्ता मिळतो. त्यात तफावत नाही. त्याचा पगार अर्थातच माझ्यापेक्षा खूप जास्त आहे–तो 'महांदेस्' (इंजिनिअर–म्हणजे खूप पढालिखा) आहे. मी एक मामुली 'रानंदे'; पण आमचा प्रवासभत्ता मात्र सारखाच. प्रवासात सर्वांना सारखाच खर्च येणार. महागाई सर्वांनाच सारखी...आगा-ए-विजे, हिंदमध्ये अशा सफरवर गेलं की तुमच्या ड्रायव्हरची काय सोय असते?'

मी सिगरेटचा मोठा झुरका घेऊन छातीमध्ये धूर कोंडला. सर्फराझच्या 'लेव्हल' चा एखादा भारतीय अधिकारी, युनोच्या एखाद्या अधिकाऱ्याला घेऊन असल्या सफरीवर असेल तर 'हिंदी' ड्रायव्हरला हॉटेलमधील खोलीत झोपायला मिळणे तर अशक्यच; पण 'नाश्ता, जेवणखाण, उठणं-बसणं' हे 'त्यांच्या' बरोबरीनं करण्याची संधी मिळणं कधी काळी तरी शक्य आहे का? प्रवासामध्ये सर्वांना प्रवासखर्च सारखाच ह्याची जाणीव ठेवून सर्वांना समान प्रवासभत्ता ही कल्पना तरी आपल्याला पटणार आहे का? भारतीय सरकारी 'बाबू' एका 'सामान्य' ड्रायव्हरशी बरोबरीच्या (म्हणजे माणुसकीच्या) नात्यानं वागतो असं स्वप्नात तरी दिसणं शक्य आहे का? छातीत कोंडलेला धूर सोडत मी हैदरीला म्हणालो–

'अरे, आमच्या इथं सुद्धा या शहाअब्बाससारखी हॉटेल्स आहेत!'

आणि त्याचा मुख्य प्रश्न टाळून, राजस्थानमधील हॉटेलात रूपांतरित झालेल्या राजमहालाची कहाणी मी त्याला सुनवू लागलो. त्या रजपूत राजमहालातील वैभवाचं रसभरित वर्णन ऐकताना हैदरी मूळ प्रश्न विसरून गेला. आगा-ए सर्फराझ मागच्या सीटवर आडवा होऊन घोरू लागला.

## दारविश-ए-महशूर

शिराझ हे सर्फराझचं गाव. त्याचे आई-वडील, भाऊबहीण शिराझमध्ये राहणारे. बरेच दिवसानंतर कुटुंबियांना भेटायला मिळणार म्हणून सर्फराझ सुखावलेला. 'घरी जायाला मिळणार' ह्या नुसत्या विचारानंच सर्फराझचं 'सर्मा खुर्दी' बरं झालं असावं. तो प्रसन्न चेहऱ्यानं घोरत होता. हैदरी कसल्या तरी विचारात गढल्याप्रमाणे चेहरा करून गाडी हाकीत होता आणि मी 'ब्लॅक' मनान सिगरेट फुंकत होतो.

गाडीनं एक लहानसा डोंगर पार केला तेव्हा दूरवर आठ दहा झाडांचा एक हिरवा ठिपका दिसत होता. ठिपका जवळ येत चालला तशी त्याच्या बाजूची गाड्यांची आणि माणसांची गर्दी दिसू लागली. दोन प्रचंड सायप्रस वृक्षांच्या बुंध्यामध्ये एक घुमटीवजा कबर होती. आपल्या इथं दर्गा किंवा पीर असतो त्याप्रमाणं. हैदरीनं सर्फराझला जागं करीत गाडीचा वेग कमी केला आणि रस्त्याच्या कडेला सावलीची जागा हेरून गाडी पार्क केली. सर्फराझनं 'वाय्' वाऽऽय् वाऽऽय्' म्हणत एक भली मोठी जांभई दिली आणि डोळे चोळीत तो गाडीतून उतरला. आपण जसं 'ओय् ओऽऽय्' किंवा 'आई आईग ऽऽऽ' म्हणतो त्याप्रमाणं इराणी लोक 'वाय्-वाऽऽऽय् वाऽऽय्' म्हणतात.

सायप्रस झाडांच्या बुंध्याला लागून एक झरा वाहात होता आणि काठावरच घुमटीवजा दर्गा होता आणि त्याच्या भवतीभवती आधुनिक पोषाखातील इराणी स्त्रीपुरुष, बाया-बापड्या आणि गोजिरवाणी मुलं 'उरुस' साजरा करीत असल्याप्रमाणं वावरत होती. वास्तविक रमझानचा महिना; पण वातावरण एखाद्या जत्रेसारखं. दर्ग्याच्या आजूबाजूला कोकाकोला, फॅंटा, पेप्सीकोला विकणाऱ्या गाड्या ; फुगे, शिट्ट्या, पिपाण्या, प्लॅस्टिकची घड्याळं, खुळखुळे विकणारे फेरीवाले, एका झाडाखाली टरबूज-खरबुजाचा ढीग आणि इतर फळांचे स्टॉल्स.

ह्या सर्व गर्दीमधून माझी नजर एका संन्याशाप्रमाणे दिसणाऱ्या वृद्ध गोसाव्यावर स्थिरावली. पासोडीमहाराजाप्रमाणे, रंगीबेरंगी तुकडे लावलेली जाड कफनी त्यानं पहेनली होती. डाव्या खांद्यावर पांघरलेल व्याघ्रचर्म त्यानं कमरेशी बांधलं होतं. त्या व्याघ्रचर्माच्या पार्श्वभूमीवर त्याची छातीपर्यंत रुळणारी पांढरीशुभ्र दाढी उठून दिसत होती. पांढऱ्याशुभ्र जटा त्याच्या भव्य खांद्यावर विसावल्या होत्या. मस्तकावर त्यानं त्रिकोणी आकाराची भरजरी टोपी धारण केली होती टोपीवर जरीचं भरतकाम केलेलं होतं. लपेटदार अक्षरात कुराणातील ओळीची नक्षी काढलो होती. दर्ग्याजवळील एका शिळेवर, सायप्रसच्या बुंध्याला टेकून हा बलदंड 'दारवीश' (दरवेशी) बसला होता. त्याच्या एका हातात धारदार 'परशू' सारखी कुऱ्हाड होती. समोर नक्षीदार भिक्षापात्र, सुटबुटातील इराणी पुरुष आणि मिनिस्कर्टमधल्या इराणी स्त्रिया, दर्ग्यात डोकं ठेवून बाहेर येताच ह्या 'दारवीश'ला सलाम करून आपआपलं 'फाल्' (भविष्य) विचारीत होते. बारा राशीची चित्रं काढलेल्या एका पितळेच्या पत्र्यावर दारवीश हातातील पितळी फासे-मंत्र उच्चारून-टाकीत होता. जे 'दान' पडलं असेल त्यावरून 'फाल्'– भविष्य वर्तवीत होता.

सर्फराझ आणि हैदरीच्या पाठोपाठ मी झऱ्यातील थंडगार पाण्यानं हातपाय धुतले. गार पाण्याचे हबके तोंडावर मारून 'फ्रेश' झालो. सर्फराझ म्हणाला,

'चल इमामझादेला (दर्ग्याला) सलाम करून येऊ. हा इमामझादे मनातील इच्छा पुरी करणारा आहे. मनात कुठलीही इच्छा धरून तू ह्या इमामझादेच्या जाळीला एक कापडाचा तुकडा बांध–महिन्याभरात तुझी इच्छा पुरी होते की नाही बघ!'

मी 'नवस' बोलायला नकार दिला. माझ्याकडे काहीसं आश्चर्यानं पहात, 'आयती आलेली ही उत्तम संधी मी दवडीत आहे' अशा अर्थानं माना हलवीत सर्फराझ आणि हैदरी चिंधी बांधण्यासाठी गेले. मी दरवीशच्या आसपास घुटमळत राहिलो. इमामझादेला नमस्कार करून, नवसाची चिंधी बांधून दोघे भावुक चेहऱ्यानं माझ्यापाशी आले आणि हैदरी म्हणाला–

'आगा ए विजे–हा दारवीश एक महशूर 'फालसफा' आहे–ह्याच्याकडून 'फॉल्' विचारून घे!'

मी दारवीशसमोर उभा राहिलो. आपल्या पाणीदार डोळ्यानी माझ्याकडे रोखून पहात घनगंभीर आवाजात तो म्हणाला, 'विचार तुझा सवाल!' मी म्हणालो, 'सवाल काहीच नाही. फक्त भविष्य जाणून घ्यायचं आहे.' ढग गडगडल्याप्रमाणे तो हसला आणि 'या हक्– या हक्' अशी आरोळी ठोकत त्यान पितळी फासे दोन्ही हातांच्या तळव्यामध्ये घासले आणि राशीपटलावर 'दान' टाकलं. दोन्ही फाशावरील आकड्यांची बेरीज अठरा झाली. माझ्याकडं पाहून एक गूढ स्मित करीत दारवीश म्हणाला, 'आवडत्या माणसापासून तुझी ताटातूट झालेली आहे. लवकरच— महिन्याच्या आत मिलाफ होईल!' त्यानं आपल्या झोळीतून एक छोटसं कुराण काढलं आणि माझ्या हाती देत फर्मावलं 'हे नेहमी जवळ ठेव!' मी त्याला पैसे देऊ केले. त्यानं साफ नाकारले. हैदरी आणि सर्फराझनं आपआपले प्रश्न विचारून 'फाल्' वर्तवून घेतलं आणि आम्ही पुन्हा शिराझच्या दिशेनं मार्गस्थ झालो.

शिराझ ही गूढवादी 'सुफी' दारविशांची भूमी. हा दारवीश 'फालसफा' आहे असं हैदरी म्हणाला. 'फालसफा' वरूनच 'फिलॉसॉफी' हा शब्द तर आला नसावा? 'फाल्' म्हणजे भविष्य. आपण ज्याला फलज्योतिष म्हणतो त्या 'फल' चा ह्या 'फाल्' शी संबंध असण्याची काही शक्यता! हैदरी आणि सर्फराझमध्ये दारविशानं वर्तवलेल्या भविष्यवाणीवर जोरदार चर्चा चालू होती. मी त्याना चिडवण्यासाठी म्हणालो—

'अरे, भविष्यावर-ज्योतिषावर विश्वास ठेवणारे, इमामझादेला नवस बोलणारे असले कसले तुम्ही मुसलमान? तुम्हाला 'लाइलाह इल्लिलाह' ही कुराणाची आज्ञा आणि तरी तुम्ही इमामझादे दिसला की त्याच्यासमोर डोकं ठेवता, नवस बोलता! आमच्या

तेहतीस कोटी देवतांप्रमाणे तुमचे तेहतीस हजार तरी इमामझादे इराणमध्ये असणार ! प्रत्येक खेड्यात दोन-तीन इमामझादे आहेतच. इराण म्हटलं की पर्शियन गालिचा, पर्शियन मांजर, ओमरखय्याम वगैरे मनात उमटायचं. त्यात आता तुमच्या ह्या इमामझादेची एक भर पडली– काय भानगड तरी काय इमामझादेची ?'

मनमोकळं हसत सर्फराझ म्हणाला, 'तू म्हणतोस त्यात बरंच तथ्य आहे तुझा काहीसा गोंधळ होणं सहाजिक आहे. इमामझादे हा प्रकार केवळ धार्मिक नाही, तो सांस्कृतिक आहे. ती एक परंपरा आहे. इराणचं ते खास वैशिष्टय आहे ! प्रत्येक खेड्यात कुणी ना कुणी सत्पुरुष होऊन गेलेलाच असतो. बहुतेक वेळा हा सत्पुरुष 'सूफी' किंवा 'दारवीश' असतो. त्याची आठवण म्हणून इमामझादेची घुमटी बांधण्यात येते. काही वेळा ह्या सूफींना एखाद्या स्थळी साक्षात्कार झालेला असतो. त्या स्थळी देखील इमामझादेच्या नावानं दर्गा उभा करण्यात येतो.'

'आमच्या हिंदुस्थानात असले पीर आणि दर्गे जागोजागी आहेत; पण आम्ही त्यांना इमामझादे म्हणत नाही, पीर म्हणतो. अजमेरला ख्वाजा मोईनुद्दिन चिश्तीचा मोठा दर्गा आहे. ह्या महापुरुषाला पीर-ए-हिंद असं मानानं संबोधलं जातं त्याच्या दरबारात सर्व जातिधर्मांच्या लोकांना मुक्त प्रवेश आहे आणि नवसाला पावणारा अशी त्याची ख्याती आहे. आमच्या येथील पीर म्हणजे तुमच्या इमामझादेसारखाच प्रकार असणार !'

## प्रागतिक परंपरा

'तू म्हणतोस ते बरोबर आहे.' सर्फराझ रंगात येऊन सांगू लागला, 'अरे, पीर म्हणजे वृद्ध, ज्ञानी सत्पुरुष. आम्ही त्यालाच इमामझादे म्हणतो. आम्ही शियापंथी मुसलमान आणि शियापंथाचा आधारस्तंभ म्हणजे 'इमाम' ! मुसलमानांना योग्य मार्गदर्शन फक्त इमामच करू शकणार असं शियापंथी मानतात. त्याचप्रमाणे 'बारावा' इमाम–जो सध्या गुप्त आहे तो–वेळ येताच अवतरणार हा आमचा अढळ विश्वास आहे. साधारण तिसऱ्या–चौथ्या शतकाच्या सुमारास इराण, रोम, अरबस्तान, तुर्कस्तान ह्या प्रदेशात बरीच धार्मिक उलथापालथ चालली होती. चौथ्या शतकाला रोमन लोकांनी क्रूसाचा धर्म स्वीकारला. सहाव्या शतकाच्या सुमारास अरबांनी इराण पादाक्रांत करून इस्लामची स्थापना केली. त्या वेळी जे झरतुष्ट्री लोक पर्शिया सोडून हिंदमध्ये गेले ते म्हणजे तुमचे आजचे पारशी !'

सर्फराझ सांगत असलेली माहिती 'इंटरेस्टिंग' होती. मी लक्षपूर्वक ऐकू लागलो–

'ज्यान इस्फहान शहर वसवलं त्या शहा अब्बासच्या काळापासून आधुनिक इराणची पायाभरणी झाली असं सर्वसामान्यपणे मानलं जातं. शहाअब्बासच्या अगोदर तुर्की आणि मंगोल हमलेखोरांनी इराणचे बरेच लचके तोडले होते. शहाअब्बासनंतर इराण काही काळ महमूद अफघानीच्या तडाख्यात सापडला. नंतर नादीरशहानं आपल्या मनगटाच्या जोरावर आणि तलवारीच्या ताकदीवर इराणमध्ये पुन्हा स्थिर साम्राज्य स्थापन केलं.

शहाअब्बासच्या काळापासून इराणमध्ये शियापंथाचा मजबूत पाया घालण्यात आला. त्याअगोदर कडव्या सुनी धर्मोपदेशकाच्या मुल्ला-मौलवींच्या विचारसणीची इराणवर मजबूत पकड होती. शियापंथामध्ये धर्माइतकाच विद्याभ्यास आणि ज्ञानप्राप्ती ह्यांना महत्त्व दिलं जातं. शियापंथाचे 'मुजताहिद' हे आचारविचारसंहिता जाणणारे, विद्या दान करणारे ज्ञानी गुरु म्हणून मानले जायचे. शियापंथी इराणमध्ये अनेक विद्या आणि कला ह्यांना प्रोत्साहन मिळायचं, राजाश्रय मिळायचा. म्हणूनच इस्लामधर्मांचे पण स्वत:च्या देशात इतर ज्ञान–साधना करण्याची मुभा नसलेले अनेक विद्वान आपआपला देश सोडून इराणमध्ये स्थायिक होऊ लागले. त्याचप्रमाणे इराणी शिया विद्वान ज्ञानसाधनेसाठी इतर देशातून सफर करू लागले. हिंदमधील मोगल सम्राटांच्या दरबारी अनेक इराणी शिया मुजताहिद (धर्मप्रसारक नव्हे) होते. ह्या सर्वांमुळे इराणचा जगाशी संपर्क वाढत चालला.

जिथं इस्लामचा जन्म झाला त्या अरबस्तानवासियांमध्ये चौदाव्या शतकापर्यंत इब्न् खल्दून ह्याच्याव्यतिरिक्त अन्य कोणी विचारवंत झाला नाही ! पश्चिम युरोपमध्ये जसा फक्त ॲरिस्टॉटल् त्याप्रमाणे अरबांचा इब्ज खल्दून. सुनी मुसलमानांना कुराणाव्यतिरिक्त इतर कशाचाही अभ्यास मान्य नव्हता. अरबस्तान, तुर्किस्तान इथ त्यामुळंच पवित्र कुराणव्यतिरिक्त अन्य कुठलाच विचार रुजू शकत नव्हता. पर्शियाची म्हणजे इराणची परिस्थिती मात्र एकदम वेगळी होती. अनेक वेगवेगळ्या विचारसरणीच्या बुद्धिवंतांना इराणमध्ये राजाश्रय मिळायचा. मीर दामाद ह्या विचारवंताच्या लिखाणातून बहाई धर्मसंस्थापक 'बाब' किंवा 'बाबी' ह्यानं प्रेरणा घेतली.

इराणमध्ये फार प्राचीन काळापासून धर्माबरोबरच वैचारिक प्रगती सतत घडत असल्याचं दिसून येतं. इस्लामच्या स्थापनेनंतर दहाव्या शतकापासून इराणमध्ये पुन्हा एकदा प्रागतिक आणि पुरोगामी विचारसरणीचे वारे वाहू लागले. सतत शोध घेणे, फिनिक्स पक्ष्याप्रमाणे राखेतून पुन्हा जन्म घेऊन नवनिर्मिती करणे हा इराणी संस्कृतीचा विशेष गुणधर्म आहे.

शहाअब्बासची कारकीर्द म्हणजे नुसतीच इस्फहान शहराची उभारणी, भव्य वास्तुशिल्पाची निर्मिती एव्हढीच नसून धार्मिक आणि वैचारिक प्रगतीच्या पुनर्जन्माचा काळ असं मानावं लागेल. ह्याच काळात राज्य आणि सरकार, सरकार आणि प्रजा ह्याच्यामधील व्यवहाराचे अनेक संकेत, कायदेकानू, पद्धती रूढ होत गेल्या. इराणमधील प्रजा, राज्य आणि सरकार ह्याच्यातील व्यवहारपद्धती इतर सर्व इस्लामी राष्ट्रातील पद्धतीपेक्षा खूपच वेगळी होती. इराण आणि सामान्य इराणी ह्यांचा विचार करायचा झाल्यास काही ऐतिहासिक आणि सांस्कृतिक परंपरा ध्यानात घेणं अत्यंत आवश्यक आहे.

## लाटसाहेब–जमीनदारीचा उदय

अगदी मध्ययुगीन काळापासून किंवा त्याही अगोदरपासून शहरवासीयांच्या मनात ग्रामस्थांबद्दल नेहमी अनुदार भावना असावी. पुरातन कालापासून पर्शियामध्ये 'शहरीकरणाचं' वेड असल्याचे दाखले जागोजाग पहायला मिळतात. राजा म्हटलं की त्याला रहाण्यासाठी राजधानी आवश्यक. (आपल्या इथील मथुरा, द्वारका, अयोध्या किंवा नई दिल्ली हे वेड अशाच प्रकारचं), शहरवासी आणि 'देहाती' ह्यांच्या जीवनमानात, रहाणीत नेहमीच तफावत

असल्याचं आढळून येतं. इराणी समाजातील सर्वात खालच्या पातळीवरील शेतकऱ्याची, म्हणजेच शेतमजुराची परिस्थिती इतर इराण्याच्या तुलनेन अत्यंत बिकट म्हणावी अशी. शेतकऱ्याना इथं 'रईया' म्हणजे जनावर असा शब्द वापरला जायचा. नंतर त्याना 'देहगान' म्हणजे जमीनदार हा नवा शब्द वापरावा असं शाही फर्मान काढण्यात आलं; पण फर्मान निघून देखील देहगानी 'रईया'च राहिला हे सत्य!

पाण्याचं दुर्भिक्ष्य असलेल्या इराणमध्ये पाण्याच्या हक्काला अनन्य साधारण महत्त्व असणं स्वाभाविक होतं. बहुतेक ठिकाणी शेतीसाठी 'कनातो' द्वारा पाणीपुरवठा केला जायचा. नव्या 'कनाती' खोदणं, चालू कनातीची देखभाल-डागडुजी करणं हा खर्च सामान्य शेतकऱ्याला परवडण्यासारखा नसायचा. एका गावासाठी कमीत कमी दोन-तीन कनातीची आवश्यकता असायची. मूळ उगमापासून गावापर्यंत येणाऱ्या ह्या भुयारी कालव्याची लांबी कधी कधी वीस-पंचवीस किलोमीटरइतकी असायची. काही ठिकाणी तर चाळीस पन्नास किलोमीटर इतक्या दूरवर कनातीद्वारा पाणी पुरवठा केला जायचा. नव्या कनाती खोदणं आणि चालू कनातीची देखभाल करणे हा खर्च बडे जमीनदार करायचे. सहाजिकच कनातीवर त्याच संपूर्ण नियंत्रण असायच. कनात ताब्यात असल्यामुळं जमीनदाराला आपोआपच संपूर्ण गावाचा ताबा मिळायचा.

ज्या जमीनदारानी किंवा सरदारानी शे पन्नास कनाती खोदण्यासाठी पैसा खर्च केला त्याच्या ताब्यात शेपन्नास गावं असायची. ह्या सरदाराचे वंशज त्या खेड्याचे परपरागत मालक बनायचे. जमिनीशी प्रत्यक्षात काहीही संबंध नसलेले हे लाटसाहेब अशा रीतीने शभर शभर खेड्याचे मालक म्हणून मिरवायचे!

पहेलवी घराण्याचा संस्थापक रेझाशहा ह्याच्या राजवटीअगोदर इराणमधील जमिनीविषयीचे कायदे, करपद्धती अतिशय किचकट आणि जुलमी स्वरूपाच्या होत्या. गादीवर बसलेल्या शहाला प्रत्येक प्रांताच्या सरदाराकडून (गव्हर्नरकडून) किती कर अपेक्षित आहे एवढीच कल्पना असायची. तो कर कशा पद्धतीने वसूल केला जातोय ह्याची तो शहा कधीच दखल घ्यायचा नाही. शाही तिजोरीमध्ये प्रत्येक प्रांताकडून ठरवलेली रक्कम जमा झाली की, राजा खूष!

समजा एखाद्या प्रांताच्या सरदाराकडून शहाला दहा लाख कराची अपेक्षा असली तर तो सरदार आपल्या हाताखालील अधिकाऱ्याना बारा लाख कर वसूल करण्याची आज्ञा द्यावयाचा. म्हणजे त्याला मधल्यामधे दोन लाख हडप करावयास मिळायचे. सरदाराचे अधिकारी मग ग्रामप्रमुख आणि जमीनदार ह्याच्याकडून पंधरा लाखाची मागणी करायचे. बारा लाख सरदाराकडे पाठवून तीन लाख आपआपसात वाटून घ्यायचे. ग्रामप्रमुख आणि जमीनदार शेतकऱ्याकडून प्रत्यक्षात वीस लाख कर वसूल करायचे. ह्या सर्व प्रकारामुळे 'रईया' अर्थातच पिळला जायचा. ह्या करवसुलीबद्दल एक पर्शियन कवी म्हणतो की-शहाची आज्ञा झाली असती तर भाकड गाईची आचळं पिळून रक्तानं घडे भरण्याची देखील ह्या जमीनदार लाटसाहेबानी व्यवस्था केली असती! अधिकार मिळताच आपल्यापेक्षा खालच्या दर्जाच्या लोकाना 'पिळणं' आणि मनमुराद पैसा खाणे अशी सवय पर्शियन राज्यव्यवस्थेत बोकाळत चालली.

पर्शियन शहा हा जरी सर्व सत्ताधारी असला तरी तो 'बाराव्या इमामचा' गुलाम असंच प्रजा मानायची. त्याचप्रमाणे प्रत्यक्ष राजकारभार हा जरी प्रांतीय सरदाराच्या (गव्हर्नर) ताब्यात असला तरी हे सरदार शहाचे गुलाम हा संकेत देखील रूढ झालेला. त्याच हिशेबाने ग्रामप्रमुख किंवा जमीनदार हे प्रांतीय सरदाराचे गुलाम आणि शेतकरी हा जमीनदाराचा गुलाम अशी ही पद्धत इराणमध्ये पक्की रुजली गेली. ह्या सर्वांचा परिणाम म्हणून वरिष्ठाचे लांगूलचालन आणि कनिष्ठांवर जुलुमजबरदस्ती ही जीवनपद्धती सर्वमान्य झाली. फक्त उत्तरेकडील अफघानी आणि पश्चिमेकडील कुर्दीस्तानचे अर्दीश हे मात्र इराणी शहाचे प्रजाजन असून देखील असली गुलामगिरी अजिबात चालवून घ्यायचे नाहीत. तशातच अफघानी आणि कुर्दीश धर्मानं सुन्नी-त्यांची आणि इराण्याची दिलजमाई कधीच झाली नाही!

## हिंदी चहाचे वेड

'आगा-ए-सर्फराझ, चायी मी खुरी?' गाडीचा वेग कमी करत हैदरी विचारत होता. सर्फराझ 'बाले-बाऽऽले' म्हणाला तेव्हा त्यानं गाडी एका टपरीवजा कावेखुने (कॉफीहाउस) समोर पार्क केली. गाडीतून उतरता उतरता सर्फराझ म्हणाला, 'पूर्वी इराणमध्ये सगळेजण काळी कॉफी प्यायचे...पण चिनी प्रवाशांनी चहाची रोप इराणमध्ये आणली आणि तेव्हापासून इराणी 'चायी' पिऊ लागले चहाच्या रेस्टॉरंटस्ना मात्र अजूनही 'कावेखुने' हाच शब्द वापरला जातो. वास्तविक 'चायखुने' म्हणायला हवं-but old traditions die hard.'

हैदरीने तीन-चार कप चहा ढोसला तेव्हा सर्फराझ थट्टेने म्हणाला, 'तू एकटाच इतके चहा प्यायला लागलास तर डुगी कधीच संपून जाईल!' हैदरी झक्कपैकी लाजला आणि माझ्याकडं पाहून काहीस ओशाळवाणं हसला. मी त्याला म्हटलं, 'पुढच्या खेपेस इराणला येताना मी तुला हिंदमधून स्पेशल चहाची पावडर आणीन!'

'आगा-ए-विजे, माझ्यासाठी पण आण!' सर्फराझ उतावळेपण म्हणाला-'इराणमध्ये हिंदी चाय भयंकर महाग आहे. अफघानिस्तान आणि पाकिस्तानच्या बॉर्डरवरून बलुची फिरस्ते फार मोठ्या प्रमाणावर हिंदी चहा इराणमध्ये स्मगल करून आणतात. हिंदी चहाची खुशबू बेहतरीन असते. एखाद्यानं तुम्हाला हिंदी चहा पाजवला तर तुमचा खूप मोठा सन्मान केला असं समजावं.... मशहद ह्या गावचे लोक हिंदी चहाचा काळाबाजार करून गबरू झाले आहेत! तू शंभर किलो चहा आणलास तर तुला इथं वीसपट पैसे मिळतील...पुढच्या खेपेला येताना तू आमच्यासाठी एक एक किलो तरी आणच!'


इराणी लोकाना हिंदी चहाचं इतकं वेड आहे ह्याची पूर्वकल्पना असती तर मुंबईच्या विमानतळावर ड्युटी फ्री शॉपमधून लिप्टनचे तीन-चार डबे विकत घेतले असते! मला उगाचच हुरहुर लागून राहिली.

चहा पिऊन तरतरी आली होती. सर्फराझनं सांगितलेल्या माहितीवर मी विचार करत होतो. इराणबद्दलचं एक एक कोडं हळूहळू उलगडत होतं; पण अजूनही अंदाज येत नव्हता. एखाद्या


“ कठीण आणि खरखरीत टूथ पावडरी तुमच्या हिरड्या नि दातांना इजा करू शकतात...”

कोलगेट टूथ पावडरने तुमच्या दातांचे नि हिरड्यांचे संरक्षण करा — श्वास दुर्गंधीही थांबवा!






कोलगेट टूथ पावडर अत्यंत बारीक आणि पांढरीशुभ्र असते. तुमच्या हिरड्यांचे हळुवारपणे मालिश करीत असतानाच, तिच्यातील सौम्य तकाकीदायक द्रव्याने तुमच्या दातांवरील कीटण दूर होऊन, दात अधिक स्वच्छ व शुभ्र बनतात. कोलगेट टूथ पावडरचा विपुल फेस दातांच्या फटींत आरपार शिरतो आणि त्यामुळे दुर्गंध दूर होऊन दंतक्षय करणाऱ्या किडींचा नायनाट होतो.

**कोलगेट टूथ पावडरने तुमच्या कुटुंबियांना आधुनिक दंत संरक्षण द्या. त्यांना तिचा पेपरमिंटचा थंडगार स्वाद खचितच आवडेल.**

TP.G.30 MB

'फॉरिन एक्स्पर्ट 'ला दुसऱ्या देशाच्या समस्या खरोखरी कधी तरी समजणार का ? हा प्रश्न देखील वारंवार सतावत होता. युनोची नोकरी करत असताना ह्या प्रश्नानं अनेक वेळा डोकं वर काढून मला छळलं आहे

इराणमध्ये सर्वसाधारणपणे १९६० सालापासून शेतीविषयक सुधारणांचा आरंभ झाला असं गृहीत धरायला हरकत नाही. त्या काळी मूठभर बडे जमीनदार वगळले तर सर्वसामान्य शेतकऱ्याला सुधारित शेतीचं तंत्रज्ञान अजिबात अवगत नव्हतं. जमिनीवर अतोनात प्रेम करणारा इराणी शेतकरी घामाच्या धारांनी जमीन भिजवायचा; पण त्याच्या उत्पादनात आणि उत्पन्नात म्हणावी तशी वाढ होत नव्हती. तंत्रज्ञानाचा अभाव तर होताच, त्याचबरोबर शेतमाल साठविण्याच्या, विक्रीच्या सोयी अपुऱ्या पडत होत्या. शेतकऱ्याच्या शेतमालाला त्यामुळं किफायतशीर भाव मिळत नव्हता. त्याचं जीवनमान हळूहळू घसरत चाललं होतं. शेतकऱ्याला सावरण्यासाठी म्हणून शहेनशहानं 'श्वेत क्रांतीची' घोषणा केली होती.

इराणमधील एकूण क्षेत्रापैकी फक्त तेरा टक्के जमीन लागवडी-खाली होती. आधुनिक शास्त्राच्या साहाय्यानं जास्तीत जास्त वीस टक्के जमीन शेतीसाठी उपलब्ध करता येईल असा शास्त्रज्ञांचा अंदाज होता. इतकं कमी क्षेत्र लागवडीखाली असून देखील एकूण लोकसंख्येतील जवळजवळ सत्तर टक्के लोक ग्रामीण भागात राहात होते ही गोष्ट विशेष ध्यानात घेण्यासारखी होती.

इस्फहानमधील काही शेतकी अधिकाऱ्यांशी चर्चा करताना जी आकडेवारी माझ्या हाती आली होती ती खूप बोलकी होती. 'श्वेतक्रांती 'च्या ध्येयानुसार १९६३ सालापासून प्रत्येक शेतकरी जमिनीचा मालक झाला होता; पण शेतमजुरांविषयीची आकडेवारी खरं चित्र दाखवीत होती. दोनशे किंवा त्याहूनही अधिक हेक्टर बागायतीवर काम करणाऱ्या मजुरांची संख्या ३२०,००० होती; दहा ते दोनशे हेक्टर बागायतीवर ६८५,००० मजूर उपजीविका करीत होते आणि २,२००,००० शेतमजूर हे दहा किंवा त्याहून कमी हेक्टर बागायतीवर काबाडकष्ट करून, मोलमजुरीनं पोट भरत होते.

ह्या शेतमजुरांना कमीत कमी दहा एकर बागायती किंवा पंधरा एकर कोरडवाहू शेतीचे मालक बनविण्याची महत्त्वाकांक्षी योजना शहेनशहा मोहम्मद रेझा पहलवीनं आखली होती. त्यासाठी त्यानं कायद्यानं पाण्याचं राष्ट्रीयीकरण आणि समान वाटप हे पहिलं पाऊल उचललं होतं. ह्या कायद्याची सहासष्ट कलमे होती, त्यांपैकी एक कलम असं होतं–' जो कुणी जाणीवपूर्वक, पूर्वपरवानगीशिवाय केवळ स्वतःच्या वैयक्तिक फायद्यासाठी पाण्याचा वापर करण्याचा प्रयत्न करील त्याला दोन ते सहा महिने सक्तमजुरीची शिक्षा ठोठावण्यात येईल.'

हातामध्ये फळांनी भरलेले ब्राउनपेपरचे पुडे सावरत सर्फराझ गाडीत बसला आणि एका ट्रकड्रायव्हरशी गप्पा मारणाऱ्या हैदरीला साद घालून त्यानं चलण्याची सूचना दिली. हैदरी गंभीर चेहऱ्यानं

ट्रकड्रायव्हरला सुद्धा हाफीज करून गाडीपाशी आला. सर्फराझनं विचारलं 'ची शुदे ?' – काय झालं ?

शिराझमध्ये सकाळी युनिव्हर्सिटीच्या विद्यार्थ्यांनी गोंधळ घातला होता. एक कॅन्टिन जाळलं होतं. स्ट्राइक केला होता. मिलिटरी पोलिसांनी गोळीबार केला. त्यात दोन विद्यार्थी मरण पावले होते. सर्वत्र पोलिसांनी पहारे लावले होते. वातावरण चिघळण्याची शक्यता होती. तेहरानमधील एका तरुण कवीला आणि गायकाला अटक केल्याच्या निषेधार्थ शिराझमधील विद्यार्थ्यांनी संप पुकारला होता. बातमी ऐकून सर्फराझचा चेहरा काहीसा चिंतातुर झाला. स्वत:शीच बोलल्याप्रमाणे तो म्हणाला –

'मागील वर्षी तेहरान युनिव्हर्सिटीच्या विद्यार्थ्यांनी असाच दंगा केला. तेव्हा सहा महिने युनिव्हर्सिटी बंद ठेवावी लागली. आता शिराझच्या स्टुडन्सनी तोच प्रकार करायचं ठरवलेलं दिसतंय. हे सगळे इस्लामिक लेफ्टिस्ट्स आहेत. डाव्या गटाचे – ह्यांना नक्की रशियाकडून चिथावणी मिळत असणार–हे टेररिस्ट सर्व देशभर पसरले आहेत...'

हैदरीचं म्हणणं होतं की, त्या गायकाला आणि कवीला अटक करण्यात 'सावाक'नं चूक केली होती. हा तरुण गायक नव्या पिढीचा अतिशय लाडका. तो ज्या कविता गात होता त्यातून तो काही शहेनशहावर टीका करत नव्हता. फक्त सामान्य माणसाच्या दु:खाला तो वाचा फोडत होता. म्हणून तर त्याची गाणी पॉप्युलर झाली होती. बाकी सगळे 'महान संस्कृतीची' तीच तीच गाणी घोळून घोळून म्हणणारे ! हा ताज्या दमाचा गायक ह्या सर्वांपेक्षा एकदम वेगळा होता. त्याला सामान्य माणसाचं 'दर्द' जाणवलं होतं –

मी काहीच प्रतिक्रिया व्यक्त करत नाही असं लक्षात आल्यावर सर्फराज मला उद्देशून म्हणाला–

'हल्ली हे पकडापकडीचे प्रकार फार वाढत चाललेत. 'सावाक'ची सर्वांनीं धास्ती घेतली आहे. ते कुणाला कधी उचलून नेतील ते सांगता येत नाही. अमेरिकन सी. आय. ए. च्या धर्तीवर सावाकचा कारभार चालतो. फरक इतकाच की, सी. आय. ए. परदेशात उपद्‌व्याप करण्यात गढलेली असते, तर 'सावाक' आमच्याच देशात दहशत निर्माण करीत आहे. शहेनशहाचा देखील ह्या सुशिक्षित तरुण पिढीवर, कॉलेज युवकावर काहीसा राग आहे. शहेनशहाचं म्हणणं हे तरुण उच्चशिक्षण घेण्यासाठी म्हणून फ्रान्स, अमेरिका इथं जातात. जे शिकायचं ते शिकतच नाहीत ! त्याऐवजी कसल्यातरी भलभलत्या कल्पना डोक्यात घुसवून घेऊन येतात आणि इतर तरुणांना बिघडवतात! शहेनशहा म्हणतो की, आजच्या इराणला नवकवी, नवचित्रकार, नवकथालेखक ह्यांची अजिबात जरूर नाही. इराणचे महान कवी फिरदौसी, सादी – हाफीज आणखी हजार वर्षं पुरतील ! इराणला सध्या गरज आहे शास्त्रज्ञांची, तंत्रज्ञांची, इंजिनिअर्सची, टेक्निशियन्सची ! हात काळे करून काम करणाऱ्यांची ! हातामध्ये कुंचला घेऊन कॅनव्हासवर फराटे मारणाऱ्यांची देशाला सध्या गरज नाही !'

मी म्हणालो–'मला तरी शहेनशहाच्या ह्या म्हणण्यात काहीच विपरीत दिसत नाही, तुमच्याकडे तंत्रज्ञांचा, कुशल कामगारांचा प्रचंड अभाव आहे ! ज्या पद्धतीनं तुम्ही औद्योगीकरणाचा प्रयत्न चालवला आहे तो यशस्वी व्हायचा असेल तर 'मॉडर्न आर्ट' नवकाव्य वगैरे गोष्टी काही काळ तरी तुम्हाला बाजूला ठेवाव्या लागतील !'

'मला मान्य आहे तुझं म्हणणं,' सर्फराझ काहीशा निराश स्वरात म्हणाला, 'हात काळे करून काम करणाऱ्या 'ब्ल्यु कॉलर' वर्करची आज आम्हाला जरूर आहे हे सत्य आहे; पण कुशल-कारागीर किंवा तंत्रज्ञ हा असा काही जादूची कांडी फिरवल्याप्रमाणे एका रात्रीत तयार होणार नाही ! त्यासाठी काही काळ जावाच लागणार ! ट्रान्स्फर ऑफ टेक्नॉलॉजी हा शब्द उच्चारायला भारदस्त आहे; पण प्रत्यक्षात ही गोष्ट अत्यंत कठीण आहे. सध्या आमच्याकडे पैसा मुबलक झालाय, सर्वांच्या हातात पैसा खेळतोय, कंटाळा घालविण्यासाठी 'वीकएंड'ला लोक लंडन, पॅरिसची चक्कर मारून येतात. अंग मोडून काम करण्याची कुणाचीच तयारी नाही ! आमच्या बऱ्याच तरुणांना वाटतं की, हिंद, पाकिस्तान आणि कोरिया इथून पाहिजे तेव्हढे कुशल कारागीर भारी पगाराचं आमिष दाखवून आयात करता येतील. हे परदेशी कारागीर आमच्या देशाची औद्योगिक प्रगती घडवतील...पण ही भ्रामक कल्पना आहे. परदेशातून आयात केलेल्या कारागिरांच्या कौशल्यावर स्वत:चा देश प्रगत करता येत नाही हे आजच्या तरुण पिढीच्या ध्यानातच येत नाही ! अनेक गोष्टींचा इथं गुंता झाला आहे...पण ते काही असलं तरी सावाकची ही धरपकड, ही हुकुमशाही चूकच म्हणावी लागेल !'

'मला तुमच्या येथील परिस्थितीची कल्पना नाही –' मी सिगरेट पेटवत म्हणालो, 'आमच्याकडे आज अनेक वर्षं डेमॉक्रसी आहे; पण त्याचा अर्थ बडबडण्याचं स्वातंत्र्य एवढाच आहे ! आमच्या सार्वजनिक जीवनात प्रचंड बेशिस्त माजली आहे. ह्या डेमॉक्रसीनं आमचा फायदा झाला की तोटा हा अभ्यासण्यासारखा विषय आहे

मला मध्येच थांबवत सर्फराझ म्हणाला –

'तुम्ही किती भाग्यवान आहात ह्याची तुम्हाला कल्पना नाही, तुला हुकुमशाहीचा प्रत्यक्ष अनुभव नाही म्हणून तू डेमॉक्रसीवर टीका करतो आहेस...माझ्या मते तरी संपूर्ण आशियाखंडात तरी हिंदइतका सुखी देश दुसरा कुठलाच नसावा !'

मी न बोलता सिगरेट ओढत राहिलो. गाडी शिराझच्या दिशेनं धावत होती.

(क्रमश:)

**व्हॅन गॉग**

'लस्ट फॉर लाइफ' या आयर्व्हिंग स्टोनच्या
जगप्रसिद्ध कलाकृतीचा मराठी अनुवाद

अनुवादिका : माधुरी पुरंदरे

प्रकाशक

**प्रसाद पुरंदरे, पर्वती, पुणे**

कथा

# पोकळी

दिलीप निंबाळकर

काल्हीही जेनला तो एकटाच दिसला होता. नेहमीच्याच टेबलावर. बरोबर पाच वाजता आला होता आणि नेहमीच्या वेळेवरच परतही गेला होता; पण गेले पंधरा दिवस तो एकटाच येत होता. फक्त चहा घेऊन परत जात होता. जेनला कितीही आश्चर्य वाटले याचे तरी तिचा नाइलाज होता. तिला त्याची भाषाच येत नव्हती.

गेले कित्येक महिने ती त्या दोघाना पहात होती. या शहरात तिचा मुक्काम असल्यापासून दररोजच. या पाचसहा महिन्यानंतरही जेनला त्यांच्या कोणत्याच बाबतीत बदल आढळला नव्हता.

. ते दोघेही बरोबर पाच वाजता हॉटेलमध्ये येत असत. तो कायम निळ्या कामगार ॲप्रनमध्ये तर ती नेहमीच पांढऱ्याशुभ्र साडीत. हॉटेलमध्ये आल्यानंतरही ते शक्यतो कोपऱ्यातील ठराविक टेबलवरच जात. साधारण रस्त्याच्या कडेच्या बाजूला असणाऱ्या टेबलवर. हॉटेलमध्ये फक्त चहा घेत अन् बिल द्यायला ती काउंटरकडे जाई, तर तो बाहेर. नंतर ते दोघेही चालू लागत तेव्हा साडेपाच वाजून गेलेले असत. आजवर या कार्यक्रमात एकही दिवस काहीही फरक झाल्याचे जेनने पाहिले नव्हते. हॉटेलमध्ये दोघांपैकी कुणाही एकमेकाची वाट पहात बसलेले तिने पाहिले नाही.

हॉटेल तरी कसले हे ? शहराबाहेर नदीकाठी फिरायला येणाऱ्यांसाठी उघडलेले चहाचे दुकान केवळ! चहाच्या भट्टीसाठी बांधलेली टपरा-शाकारा खाली व बाहेरच्या बाजूला गारव्याच्या झाडाखाली सात-आठ टेबलखुर्च्या टाकलेल्या. चहाशिवाय इतरही काही सटरफटर वस्तू मिळत असत; पण अलीकडे दोन वर्षात, हॉटेलमागेच असणाऱ्या स्वामींच्या आश्रमातील शिष्यांची मात्र हॉटेलात वर्दळ वाढली होती. भगव्या वस्त्रातील या आश्रमवासियांमुळे हे हॉटेल सदैव गजबजलेलं राहू लागले होते.

जेनही अशीच एक स्वामीशिष्या होती. ती देखील दररोजच या हॉटेलमध्ये हजर असे. गेल्या पाचसहा महिन्यापासून येणाऱ्या त्या प्रेमी युगुलाचे अस्तित्व आता तिच्या ठायी ठाम झाले होते. दररोज पाच वाजता जेनही त्या ठराविक टेबलाशेजारी येऊन बसत असे. बरोबर पाच वाजता तिचे डोळे आपोआपच त्यांच्या वाटेकडे वळत असत. ते दोघे हॉटेलमध्ये आल्यापासून परत जाईपर्यंत जेन त्यांच्याकडेच स्थिर नजरेने पहात बसत असे. ती दोघेही हॉटेलमधील इतरांची दखलही घेत नसल्याने शेजारच्या टेबलावरील जेन सतत त्यांच्याकडे पहात असते, हे त्यांच्या ध्यानातही येत नसे.

जेनबरोबरच्या इतर स्वामीशिष्यांना मात्र जेनचे हे पहाणे--वागणे पसंत नसावे. कारण जेन एकदा अशीच पहात बसली असता विलीने तिच्या हातावर सरळ पेटती सिगारेट टेकवून आपली नापसंती व्यक्त केली होती. अर्थातच नेहमीप्रमाणे विलीवर तोंडसुख घेण्यापलीकडे जेन काहीही करू शकली नव्हती. त्या दिवसापासून ते कुणीच तिला याबाबतीत काहीही बोलत नसत. विली अन् इतर शिष्यगण- त्यांचा ग्रुप स्वामींच्या आश्रमात बनविलेल्या खास सिगारेटी भसाभस ओढीत असताना जेन मात्र केवळ कॉफी घेत त्या कपलकडे पहात बसे. हे जेनचे वर्तन त्या पथास तरी मुळीच शोभणारे नव्हते.

पण अलीकडे तर जेन स्वामींचे लेक्चरही सोडून बरोबर पाच वाजता तेथे येऊन बसत असे. हे एक नवीनच खूळ तिच्या डोक्यात शिरले होते. कोपऱ्यातले टेबल रिकामे असतानाही जेन त्या शेजारच्या टेबलावर बसत असे. एवढेच नव्हे तर त्या स्वामीशिष्यांपैकी नव्यानेच या पथात सामील झालेल्या समीर पटेलला त्या जोडप्याची भाषा समजते हे कळल्यानंतर जेनने त्यालाही आपल्याबरोबर बसवून त्यांच्याविषयी माहिती काढण्याचा प्रयत्न केला होता. जेनजवळ निव्वळ बसायला मिळणे हा देखील सन्मान समजणाऱ्या पटेलनेही कान देऊन ऐकूनही, तो एका कारखान्यात कामगार आहे व ती एका जवळच्या कॉन्व्हेंट स्कूलमध्ये शिक्षिका आहे यापेक्षा जास्त काही समजले नव्हते.

कोठेही गुंतून न रहाणे- कोणत्याच बंधनात स्वतःला अडकवून न घेणे या नवीन संस्कृतीस जन्म देणाऱ्या या पथातील जेन अलीकडे मात्र या जोडप्यामध्ये नकळत गुंतली गेली होती. नात्याचा--जात चा--पंथाचा लागाबांधा नसतानाही या युगुलाकडे जेन कधी आणि का ओढली हे तिलाही कळले नव्हते. नाही तर एऱ्हवी प्रेम-लग्न-संसार या विचारांना क्षुद्र किड्याचे वळवळणे समजून या असल्या जीवनापासून दूर राहण्यासाठीच ती विलीबरोबर घराबाहेर पडली होती.

जेन एका धनाढ्य बापाची एकुलती एक पोर! घरात 'कमतरता' या शब्दाचीच उणीव! तिच्या देशात सोळा--सतराव्या वर्षीच तरुण-तरुणी स्वकमाईने स्वतंत्र आयुष्याची सुरुवात करीत असताना जेनला मात्र तिच्या मम्मी-डॅडींनी याचा वाराही लागू दिला नव्हता. अठरा वर्षांची झाली तरी जेनची काळजी, पाचसहा वर्षांच्या मुलीसारखे घ्यायचे ते दोघेही. नेमकी ही बंदिस्त हवाच, अतीसुखच तिला भोवळ आणणारे ठरले होते. अत्यंत स्थिर आणि कमालीच्या सुरक्षित जीवनाचा तिला कंटाळा आला होता. जीवनात काही तरी घडत रहावे, काही तरी थ्रिल असावं, या तिच्या अपेक्षांचा विलीने बरोबर फायदा घेतला होता.

एक वर्षापूर्वी केवळ 'थ्रिल' म्हणून विलीबरोबर एका अनोळख्या पण बेबंद धुंद, जीवनाची चव चाखण्यासाठी ती घराबाहेर पडली होती. इतर कोणत्याही वादापेक्षा बेफिकीरवादाने जीवनातील स्वारस्य जवळ केले जात असे, अशा या संप्रदायाची जेन कट्टर अनुयायी बनली होती. या आगळ्या विश्वाची ओळख करून देणारा विली तिला अतिजवळचा वाटू लागला होता. कारण तेथ त्यांच्यासमवेत, ममी-डॅडींचे घुसमटवून टाकणारे प्रेम नव्हते, आचारविचाराबाबत तीच ती कंटाळवाणी निरर्थक बंधने नव्हती. रूटिन लाइफमधला उबगवाणा तोच तोपणा नव्हता. कुणा एकासाठीच झुरणे नव्हते, प्रतीक्षा नव्हती. प्रतिष्ठा अन् निष्ठेचे क्षणिक बुडबुडे नव्हते. आयुष्यभर एकाच तालासुरात नाचत राहून आयुष्यच बेताल करणारी कोणतीच बंधने नव्हती.

नाते फक्त एकच नर अन् मादीचे. प्रतिष्ठा होती ती मन मानेल त्या आचारांना--विचारांना बंधन ! बंधन म्हटले तर एकच. ज्या अस्तित्वशून्यतेच्या अनुभवासाठी, शून्यात विलीन होण्याच्या भावनेस सामोरे जाण्यासाठी ते हपापले होते, घरदार सोडून या नवख्या देशात दूरवर आले होते. त्यासाठी विशिष्ट टॅबलेटस् घेण्याचे बंधन होते; पण यात स्वेच्छा होती. आसक्ती होती. मग त्यास तरी बंधन कसे म्हणावे ? विली अन् त्याच्याबरोबरचा जेचा याच एका अनुभव-

लालसेने भारतात आला होता. सुखासीन घरातले ते सर्व जीव. त्यांना स्वत लाही नेमक्या माहीत नसलेल्या सुखाच्या-आगळ्या वेगळ्या सुखाच्या शोधार्थ भरकटत होते. या शहरात स्वातीच्या आश्रमात त्या सर्वांना अगदी हव्या त्याच सुखासाख्या सागर मिळाला होता. अत्यंत मुक्त वातावरणाच्या या सागरात कोणत्याच बंधनांची जाळी नव्हती.अर्थातच स्वच्छंदी आचार-विचारांची परिसीमा गाठण्यास विलीच्या ग्रुपने मुळीच वेळ लावला नव्हता.

जेनला मात्र आता या सर्वांचा पुन्हा कंटाळा येऊ लागला होता अन् विलीचा तिटकाराही. कारण घर सोडताना, मायदेश सोडताना निर्बंधित आचारविचारातही विलीच्या या अतिरेकी स्वैराचारी उपभोगी वर्तनाची कल्पना तिला आली नाही. विलीची इतरांशी मैत्री असली तरी ती 'मैत्री'च राहील, आपणच त्याच्या आयुष्यात कायम आहोत या सूक्ष्मशा का होईना जेनच्या विश्वासास आश्रमात येताच तडा गेला होता. विलीबरोबरच ती या आश्रमात दाखल होताच त्याच्या किती तरी मैत्रिणी गोळा झालेल्या पाहून व विलीची त्याच्यासोबतची समरसता पाहून, मुळातच अस्थिर विश्वासाच्या पायावर उभी असणारी तिची विलीसमवेतच्या भावी आयुष्याची स्वप्नील इमारत कोसळण्यास वेळ लागला नव्हता. या अतीव निराशेपोटीच उद्विग्न होऊन जेननेही विलीला मागे टाकील अशा वर्तनाचे टोक गाठले होते. तिला अभिप्रेत असणाऱ्या अस्तित्वशून्य जगात भ्रमण करण्याकरिता एल्. एस्. डी. सारख्या मादक द्रव्यापासून ते विलीच्या समोरसारख्या चार-दोन दिवसाच्या मित्रांचाही तिने बिनदिक्कत वापर केला होता

आणि तरीही ती जागच्या जागीच होती. घरदार-आईवडील सोडून शारीरिक सुखाचा एकाच वेळी कमालीचा उपभोग घेऊन, प्रसंगी ते अजिवात नाकारूनही आज तिच्या जीवनात एक विलक्षण पोकळीच निर्माण झाली होती. कधीकधी तिचे तिलाच हसू येई. ज्या अस्तित्वशून्यतेच्या अनुभवासाठी, पोकळीच्या प्राप्तीसाठी ती आजवर धावली होती, तीच पोकळी तिला आज मिळूनही ती समाधानी तर नव्हतीच; पण तिला आता या अवस्थेची भीतीच वाटू लागली होती. आयुष्यात निर्माण झालेल्या या पोकळीने ती अस्वस्थ झाली होती, भीतीने गोठली होती. यामुळेच आजकाल तिचे वागणे शून्यवत बनले होते. जे तिला अज्ञात असताना हवेहवेसे वाटत होते तेच माहीत झाल्यानंतर, जवळ आल्यानंतर जीवघेणे ठरत होते.

गेल्या पाचसहा महिन्यात तर ती विली, त्याचा ग्रुप, आश्रम यापासून दुरावतच चालली होती. दोन वर्षे विलीच्या सहवासात राहूनही तिची अनामिक ओढ मात्र त्या अनोळखी प्रेमिकांच्या वाटयास गेली होती. आश्रम-स्वामी कशाविषयीच तिला आता आकर्षण वाटेनासे झाले होते स्वामींच्या लेक्चर्सनाही आताशा ती हजर रहात नव्हती. कारण नित्य नवेपण शोधायची सवय झालेल्या जेनला या लेक्चर्समध्ये तोच तो उबगवाणेपणा आढळू लागला होता.

एका विशिष्ट रीतीमय-रुटिन लाइफचा कंटाळा आल्याने तर ती घराबाहेर - देशाबाहेर पडली होती. इतके सायास करूनही तिला त्याच जीवनपद्धतीचा अनुभव येत होता. या संप्रदायातही बेफिकीर, बेबंद अशी जीवनपद्धती स्वीकारतानाही स्वत.चा असा एक समाज, एक विशिष्ट रीतिमय जीवनमार्ग त्या सर्वांनी निश्चितच केला होता. नकळत का होईना, निश्चत झाला होता अन् नेमक्या याच जाणिवेने, रूढिभजकतेच्या व्यर्थ वर्तनाने, विफलतेने जेन आतल्या आत कोसळली होती, जळत होती. विफलता जेनभोवती आपले पाश फासाच्या दोराप्रमाणे आवळीत चालली होती ना आईवडिलांचे सुखद छत्र ना विलीचे प्रेम किंवा तिला पूर्वी इतक्याच अद्यापही धूसर, अस्पष्ट असणाऱ्या सुखाचा अर्धवट राहिलेला- अशक्य असलेला शोध ! जेन सुन्न झाली होती.

पाचसहा दिवसांत तर जेन खूपच खिन्न झाली. गेले आठवडाभर ती तापाने दररोज फणफणत होती. एखाद्या जड वाहनाखाली जीव द्यावासा वाटायला लावणाऱ्या वेदना शरीरात मावत नव्हत्या. जेवणावरचीच काय पण जगण्यावरचीच तिची वासना उडाली होती. अशा अवस्थेतही विली मात्र तिच्याकडे फिरकलाही नव्हता ! जेनला तापापेक्षा जाळीत होती ती हीच खंत. जोपर्यंत जेन त्याच्या मनाप्रमाणे त्याला सर्वच बाबतीत प्रतिसाद देत होती, तोपर्यंत तिच्या भोवती रुंजी घालणारा विली आता- तिच्याकडे फिरकेलाही नव्हता !

मोठ्या प्रयासानेच ती आजही आश्रमातून येऊन त्या टेबलाशेजारच्या खुर्चीवर बसली होती; अंगात भरपूर ताप असतानाही केवळ बरोबर पाच वाजता येणाऱ्या त्या जोडप्यास पहाण्यासाठी. आजवर तिने कुणाचीही एवढी आतुरतेने वाट पाहिली नव्हती. कधी मम्मी-डॅडीची तर नाहीच नाही; पण विलीचीही नाही. पंधरा दिवस झाले तो एकटाच येताना दिसत होता; पण आज तर साडेपाच होऊन गेले तरी तो एकटाही आला नव्हता. जेन अगाचच क्षणोक्षणी अस्वस्थ होत चालली होती. तिच्या मनातील हुरहूर वाढत चालली होती. तो एकटा का होईना पहाण्यास तिचा जीव आतुरला होता. त्यांना पाहाताच काही कारण नसतानाही तिला बरे वाटणार होते याची तिला स्वत:ला खात्री होती.

पावणेसहा झाले तरी-अन् वाटेवर डोळे लावून बसलेली जेन किंचितशी सुखावली. ते दोघेही येताना दिसत होते.

पण हे काय ? वेळेतल्या बदलाप्रमाणेच इतरही खूपच बदल झाला होता त्याच्यात ! ती आज नेहमीप्रमाणे पांढऱ्या साडीत नव्हतीच अन कधी नव्हे ते ती त्याला एवढी बिलगून चालताना दिसत होती. तो मात्र नेहेमीप्रमाणे कामगार अॅप्रनमध्येच होता. जेन लक्षपूर्वक त्याच्याकडे पाहात होती. तिचा एक हात त्याच्या खांद्यावर होता अन् त्याचा हात तिच्या कमरेभोवती! चालताना होणारे कष्ट तिच्या चेहऱ्यावर स्पष्ट दिसत होते. ती जेवढी वेदनेने व्याकुळ झालेली दिसत होती तेवढाच तो स्थिरपणे इकडेतिकडे न पहाता तिला आधार देत त्या ठराविक टेबला कडे जात होता.

ते दोघेही जवळ येताच जेनने तिच्याकडे बारकाईने पाहिले अन् त्याच्या कधी नव्हे त्या सलगीच्या चालण्याचे कारण लक्षात येताच जेनच्या मस्तकातून विजेचा लोळ उतरून गेला. तिचा एकच पाय साडीतून लळतलोंबत दुसऱ्या प्लॅस्टर केलेल्या पायाचे ओझे ओढीत होता. अॅक्सिडेंटमुळे तसे झाल्याचे दिसत होते. पूर्ण विश्वासाने त्याच्या खांद्यावर हात टाकून चालताना तिच्या चेहऱ्यावर व्यक्त होणाऱ्या वेदनांतूनही जेनला मात्र तिचा निर्धास्तपणा जास्त उठून दिसत होता. डोळ्यातून ओसंडणारा त्याच्याविषयीचा विश्वास शाश्वतता जेनला वाकुल्या दावत असल्यासारखी भासली. जेनची मान कधी आपोआप खाली वळली अन् डोळ्यातून अश्रूंचा ओघ का सुरू झाला हे तिलाच कळले नाही.

□

## पुस्तके

राजा दीक्षित

# आक्रमक सनातन्याचे बेताल आत्मचरित्र

आहिताग्नी कै. शंकर रामचंद्र राजवाडे (१८७९ ते १९५२) यांचे आत्मचरित्र सध्या गाजते आहे. किंबहुना गाजावे असेच ते आहे. हे आत्मचरित्र वाचनीय असले तरी दर्जेदार मात्र नाही! माझ्या ह्या विधानात कोणाला विसंगती वाटण्याचा संभव आहे; पण तशी ती नाही हे पुढे स्पष्ट होईलच. ह्या आत्मचरित्राचे थोडक्या शब्दात परीक्षण करायचे तर मी असे म्हणेन की, एका आक्रमक सनातन्याचे ते बेताल आत्मचरित्र आहे. आत्मचरित्र-लेखनात शिस्तीचा अभाव आणि मतप्रदर्शनात सुटलेला तोल ह्या दोन्ही गोष्टी माझ्या 'बेताल' ह्या शब्दात अभिप्रेत आहेत.

आत्मचरित्राचे परीक्षण करताना त्याचा विविधांगी विचार करावा लागतो. आत्मचरित्र हा माझ्या दृष्टीने शुद्ध साहित्यप्रकार नाही. कारण त्याची कथावस्तु ही लेखकाच्या प्रतिभेतून निर्माण होत नाही, तर ती प्रत्यक्ष घडून आलेली असते. ह्या वास्तवाच्या मांडणीतच लेखकाचे खरे कसब पणाला लागते. साहजिकच आत्मचरित्रलेखक हा मुख्यतः कारागीर असतो. आपले जीवन लालित्यपूर्ण रीतीने मांडून दाखवण्यातच त्याचे कौशल्य आणि प्रतिभा दिसून येत असते. जर्मन महाकवी गटे याने आपल्या आत्मचरित्राला नाव दिले होते-' Poetry and Truth.' किती अर्थपूर्ण आहे हे नाव! आत्मचरित्र ह्या प्रकाराचे वर्णन करण्यासाठी मला हेच शब्द वापरावेसे वाटतात— काव्य आणि सत्य! आत्मचरित्र हे अखेर काय असते? तर काव्यात्मक रीतीने सांगितलेले सत्य असते! अर्थात मुळात ते 'सत्य' असल्यामुळे तो 'इतिहासही' असतो. ती व्यक्ती, तिचा काळ, त्या काळातल्या घडामोडी, तेव्हाचा समाज, त्या समाजातल्या विशिष्ट व्यक्ती— यांचा थोडाबहुत इतिहास आत्मचरित्रात सांगितलेला असतो. त्यामुळे केवळ साहित्यकृती म्हणूनच नव्हे तर इतिहास आणि समाजशास्त्राच्या दृष्टीनेही आत्मचरित्र मौलिक असू शकते. कल्पनेतल्या नव्हे, तर प्रत्यक्षातल्या माणसाच्या मानसिक प्रक्रिया आत्मचरित्रात कधीकधी उलगडून दाखवलेल्या असतात. त्यामुळे मानसशास्त्रज्ञांच्या दृष्टीनेही त्याचे मोल आहे. आत्मचरित्र-लेखकाची भाषा ही साधारणतः त्याच्या प्रदेशातल्या आणि काळातल्या भाषेचे प्रतिनिधित्व करत असते. त्यामुळे भाषाशास्त्रज्ञांनाही ते उपयुक्त ठरू शकते. आपल्या अनुभवांचे आणि विचारांचे धन पुढील पिढ्यांना बहाल करण्यासाठी आणि प्रचारकी पद्धतीनेही काही आत्मचरित्रे लिहिली जातात.

एकंदरीत, आत्मचरित्र हा एक मोठा संमिश्र लेखनप्रकार आहे. त्यामुळेच तो एखाद्या बाबतीत मौलिक असेल, तर दुसऱ्या बाबतीत टाकाऊही असेल! इतिहास म्हणून उपयुक्त असणारे एखादे आत्मचरित्र साहित्यिक आनंद देण्यात कमीही पडेल. आत्मचरित्राच्या वाचनीयतेचा त्याच्या दर्जेदारपणाशी संबंध असतोच असे नाही. एखाद्या व्यक्तीच्या जीवनातच इतके नाट्य असू शकते, की लेखनात लालित्याचा अभाव असूनही केवळ जीवनातल्या नाट्यमयतेमुळे आत्मचरित्राला वाचनीयता येऊ शकते. येथे आत्मचरित्राच्या वाचकांची मनोवृत्तीही लक्षात घ्यायला हवी. मानव हा असा प्राणी आहे, की त्याला दुसऱ्याच्या घरात काय किंवा जीवनात काय, डोकावण्याची फार हौस असते. तसे नसते तर भिंतीला कान आलेच नसते! दुसऱ्याच्या घरातल्या भानगडी आणि भांडणं ह्यात तर माणसांना फारच रस असतो. माणसाची ही सगळी स्वाभाविक प्रवृत्ती आत्मचरित्राच्या वाचनामागेही थोडी तरी असतेच! ह्या माणसाचे जीवन होते तरी कसे, ह्याची एक उत्सुकता वाचकांना असते. त्यातून त्या माणसाच्या काही भानगडी असल्या तर उत्तमच. तसेच त्याने दुसऱ्यांच्या काही भानगडी सांगितल्या किंवा दुसऱ्यांची निंदानालस्ती केली तर धमालच धमाल! तेव्हा आत्मचरित्राची 'वाचनीयता' नेहमी नाही, तरी कधीकधी अशा वृत्तीतूनही ठरत असते. म्हणूनच आत्मचरित्राच्या बाबतीत वाचनीयता आणि दर्जा यांचा संबंध असतोच असे नाही. 'गाजणे' ही गोष्ट गुणवत्तेशी निगडित असेलच असे नाही.

आत्तापर्यंतच्या विवेचनावरून माझी भूमिका स्पष्ट व्हावी. काही विशिष्ट अर्थाने राजवाड्यांचे आत्मचरित्र वाचनीय आहे, काही दृष्टीने ते मौलिकही आहे; पण तरीही ते दर्जेदार नाही असे म्हणावे लागते.

आहिताग्नी राजवाडे ही काही कोणी सामान्य व्यक्ती नव्हती. ते एक प्रकांड पंडित होते. त्यांचे ज्ञान एकाच ठराविक विषयापुरते मर्यादित नव्हते तर ते अत्यंत चौफेर होते. ह्या धर्मनिष्ठ पुणेकर ब्राह्मणाला काम, कला, साहित्य, क्रीडा, शास्त्र, इतिहास, राजकारण वगैरे विविध गोष्टींमध्ये चांगलाच रस होता.

किंबहुना अशा अनेक प्रकारच्या गोष्टींमध्ये मनसोक्त रमल्यामुळेच त्यांनी पदवीपरीक्षेचा चार वर्षांचा पुस्तकी अभ्यासक्रम संपवण्यास मात्र बारा वर्षे घेतली ! तेव्हा, राजवाडे हे एक व्यासंगी होते. आजन्म ज्ञानोपासक होते. भाष्यकार होते. लेखक होते. भाषाप्रभू होते. ख्यातनाम वक्ते होते. एकोणिसाव्या शतकाचा अंतकाळ आणि विसाव्या शतकाचा प्रथमार्ध त्यांनी पाहिलेला होता. ह्या काळचे भारताच्या, महाराष्ट्राच्या आणि पुण्याच्याही इतिहासातले महत्त्व सुबुद्ध वाचकांना वेगळे सांगायची गरज नाही. तेव्हा अशा काळात जगलेल्या राजवाड्यांसारख्या माणसाचे आत्मचरित्र इतिहास आणि समाजशास्त्राच्या दृष्टीने मोलाचे असल्यास नवल नाही ! .

पारतंत्र्याच्या काळातले पुण्यातले वातावरण, त्या वेळचे प्लेगचे संकट, रँड-वध, चाफेकरबंधू, जॅक्सन खूनप्रकरण, टिळकांचे राजकारण, सुरत कॉंग्रेस, स्वातंत्र्य-लढ्याच्या काळातील विविध नेते आणि सुधारक इत्यादींची माहिती राजवाड्यांच्या आत्मचरित्रात ओघाओघाने आल्यामुळे इतिहासाच्या दृष्टीने त्याचे काहीएक मोल निश्चितच आहे. त्या काळच्या इतिहासाचा विचार करताना अभ्यासक वा जिज्ञासू ह्या पुस्तकाचा थोडाबहुत उपयोग करू लागलेही आहेत. उदा. 'महाराष्ट्र टाइम्स' च्या २७ जुलै १९८० च्या रविवार-पुरवणीत 'टिळक आगरकर' हा लेख लिहिताना विश्राम बेडेकर यांनी, तर 'माणूस' च्या १६ ऑगस्ट १९८० च्या अंकात '२२ जून १८९७ : एका स्वातंत्र्यपर्वाचे अनैतिहासिक चित्रण' हा लेख लिहिताना सतीश कामत यांनी राजवाड्यांच्या आत्मचरित्राचा काही संदर्भात आधार घेतलेला दिसतो. तेव्हा, इतिहासाच्या दृष्टीने हे आत्मचरित्र थोडेबहुत उपयोगी ठरणारे आहे. मात्र येथे एक सांगायला हवे. विशिष्ट घटनांसंबंधीची त्यांचा साक्षीदार असणाऱ्या राजवाड्यांची माहिती साधारणत: विश्वसनीय मानायला हरकत नसली, तरी व्यक्तीबाबत ते जे काही लिहितात त्यावर विसंबणे जरा धोक्याचेच आहे. कारण राजवाडे कधीकधी व्यक्तिद्वेषाने पछाडल्यासारखे लिहीत सुटलेले आहेत. त्यांचे निराधार आरोप काळजीपूर्वक तपासूनच घ्यावे लागतील. ह्या आत्मचरित्राला लिहिलेल्या 'पुरस्कारा' त कै. श्री. के. क्षीरसागर म्हणतात, 'हा ग्रंथ एका महाविद्वानाचा व्यासंगेतिहास म्हणून आणि महाराष्ट्राचा सांस्कृतिक, सामाजिक आणि राजकीय इतिहास म्हणून मराठी वाङ्मयात चिरकाल टिकेल यात शंका नाही.' श्री. के. क्षी. चे हे विधान मला एक तर फार भाबडे किंवा भलतेच अतिशयोक्तिपूर्ण वाटते. अर्थात ह्या पुस्तकाचे ऐतिहासिक मोल अगदीच नाकारून मात्र चालणार नाही. हे थोडे मोल लक्षात घेता अनुक्रमणिका नसलेल्या ह्या पुस्तकाला सूचीची अत्यंत आवश्यकता होती. सूची नसल्यामुळे अभ्यासकाची फार मोठी गैरसोय होणार आहे.

त्या वेळचे समाजचित्र समजावून घेण्यातही ह्या पुस्तकाचा थोडा उपयोग होऊ शकेल. विविध चालीरीती, उत्सव, समाजातले बदल ह्यांचे काही अंशी दर्शन ह्या पुस्तकात होते. राजवाड्यांनी त्यांच्या पहिल्या लग्नाचे जे वर्णन केले आहे ते जिज्ञासूंनी वाचून पहावे. ह्या लग्नात राजवाडे चौदा वर्षांचे, तर त्यांची वधू अवघी दहा वर्षांची होती. लग्न ठरले कसे ? तर, 'लग्नाच्या अगोदर सासरा जावयास बघावयास आला. त्याने माझे इंग्रजी व मराठी अक्षर पाहिले व लग्न मुक्रर झाले.' (पृ. १८) समाजातल्या बदलाबद्दल सन्मित्र समाजाच्या मेळ्यात लोकप्रिय झालेल्या एका पदाचा उल्लेख राजवाडे करतात. (पृ. २१) 'चालरीत सारी गेली। नित्य नवी सोंगे आली।' अशा त्या पदातले हे एक कडवे—

आटयापाटया खो खो गेले।
लॉटेनिस तेथे आले।
क्रिकेटाने वेडे केले।
बॅट करी विराजे।।'

समाजातला ब्राह्मणवर्गसुद्धा धूम्रपान, मद्यपान आणि मांसाशनासारख्या गोष्टी कशा करू लागला ह्याची वर्णने राजवाडे करतात आणि त्यावर बरीच आग पाखडतात. तेव्हा, त्या वेळच्या समाजाचे आणि त्यातल्या बदलाचे थोडेसे चित्र ह्या पुस्तकात सापडू शकते.

### प्रौढ आणि मजेशीर भाषा

राजवाड्यांची भाषा अतिशय प्रौढ होती. त्यांचे भाषाप्रभुत्व हे पुस्तक वाचताना जाणवते. मूळ इंग्रजी अवतरणांचे जे भाषांतर ते करतात त्यातही त्यांच्या भाषेचा डौल टिकलेला आहे, हे विशेषेकरून जाणवते. श्री. के. क्षी. नी अन्यत्र केलेल्या त्यांच्या भाषेच्या प्रशस्तीत खूपच तथ्य असावे, असे ह्या पुस्तकाच्या वाचनाने मला जाणवले. ती प्रशस्ती अशी—'ज्यांनी मराठी भाषेला असाधारण प्रौढत्व आणून दिले; ज्यांनी केवळ 'बाला' असलेली तिची गद्य-शैली प्रौढा आणि पुरंध्री बनविली, त्या गद्य-प्रभूमध्ये तर राजवाडे ह्यांची गणना करावीच लागेल; पण प्रौढगंभीर गद्य-वाङ्मयात इतकी कर्णमधुर गद्यसरणी निरपवादपणे पानापानांत लिहिणारा दुसरा लेखक दाखविणे कठीण होईल, असेही ज्ञात्यास आढळून येईल.

'त्यांनी लिहिलेल्या हजारो पानांत शेकडो सुंदर प्रतिशब्द आणि पारिभाषिक शब्द विखुरलेले आढळतील. दैनिकांच्या तरुण उपसंपादकांनी बनविलेले हास्यास्पद आणि सदोष शब्द आज तरुण लेखकांच्या वापरात आहेत; पण राजवाड्यांचे शब्द त्यांच्या ऐकण्यातही नाहीत.' (अर्वाचीन मराठी वाङ्मयसेवक—षष्ठ खंड—संपा. गं. दे. खानोलकर—पृष्ठ १७१–७२ वरून.)

राजवाड्यांच्या भाषेत जुन्या काळातल्या लकबी असल्यामुळे आज ती वाचताना कधी कधी मोठी गंमतही वाटते ! 'आधीच उल्हास त्यात आला फाल्गुनमास' अशा म्हणीचा वापर राजवाडे अधूनमधून करताना दिसतात. एखाद्यावर भडकून लिहिताना 'घमेंड्यानंदन, रेम्याडोक्या, नरसूगिरी, मर्कटी अनुकरण' असे शब्दप्रयोग ते वापरतात. 'ट्रॅजेडी' आणि 'कॉमेडी' ह्या इंग्रजी शब्दांना राजवाड्यांनी वापरलेले 'रोदनान्त' आणि 'रोचनान्त' हे प्रतिशब्द (पृ. २४७) लक्षात घेण्याजोगे आहेत. शब्दांची अनेकवचने करण्याची राजवाड्यांची पद्धत आज अगदी गंमतीशीर वाटते. उदा. कॉलेजच्या 'टर्मा' भरत नव्हतो, चॅप्टरवर 'नोटा' देण्याची पद्धत, 'फ्रेमी' बसविल्या, 'सिगारेटा' ओढणे, 'पोपां'चे माहात्म्य इ. टांग्यासाठी वापरलेला 'घोड्याचे टमरेल' (पृ. ८८) हा शब्दप्रयोगही असाच मजेशीर आहे ! राजवाड्यांचे हे एक वाक्य पहा—'तंबाखू हा

पदार्थ नाकाने नस्य, दातांनी चोष्य आणि ओठांनी आकृष्य असा त्रिविध आहे.' यासारखी किती तरी उदाहरणे देता येतील !

ह्या आत्मचरित्राची जी काही थोडीफार जमेची बाजू आहे ती आधी सांगून घेतली. माझ्या मूळ टीकेचे स्पष्टीकरण देण्यापूर्वी ह्या आत्मचरित्राचे आणखी एक वैशिष्ट्य नोंदवणे मला आवश्यक वाटते. ते वैशिष्ट्य म्हणजे, हे आत्मचरित्र आहिताग्नींच्या सनातनी विचारांनी भरलेले आहे. आजच्या काळात सहसा इतके सनातनी विचार ऐकायला वा वाचायला मिळत नाहीत. विचार किती टोकाचे व सनातनी असू शकतात याची प्रचीती हे पुस्तक वाचून येते. सुधारणावाद्यांनी सनातनी विचारांचा अभ्यास करण्यासाठी म्हणून हे पुस्तक जरूर वाचावे. ( काही अपरिपक्व पुरोगामी ' मनुस्मृती 'प्रमाणेच हे पुस्तक जाळतील यात संशय नाही ! ) राजवाड्यांच्या काही सनातनी विचारांची थोडीशी झलक आता पाहू.

### टोकाचे व त्याज्य विचार

आहिताग्नि राजवाडे हे चातुर्वर्ण्याचे कट्टर पुरस्कर्ते होते. ते म्हणतात, ' हा भगवद्गीतेचा देश अवतारवादी आहे. त्यापुढे परकीय मार्क्सवाद काय किंवा स्वकीय गांधीवाद काय हे सर्व वाद गळून पडतील. परमेश्वराला एखाद्या विशिष्ट राजसत्तेपेक्षा समाजाची काळजी असते आणि ब्राह्मण हे समाजाचे मुखच नव्हे तर मस्तक मानण्यात येते....चातुर्वर्ण्य असेल तर ब्राह्मणाला ब्राह्मण म्हणवून घेण्याचा अधिकार आहे, एरवी नाही. या दृष्टीने त्याच्यावर किती जरी संकटे आली व दुर्धर प्रसंग लोटले तरी त्याने डगमगून जाऊन चातुर्वर्ण्याला सोडता कामा नये!' ( पृ. २७२-७३ ) एकदा अशी भूमिका घेतली की, स्त्री-शूद्रांना कमी लेखणे आलेच. राजवाड्यांचे दुःख काय होते पाहा – ' सारांश, एक विपरीत झाले असता ' किं न विपरीतं ?' जेथे संपूर्ण राज्यच बाजारबुणग्या वैश्यवणिकांच्या हातात गेले तेथे स्त्रिया अधिकारपदावर आल्या आणि अंत्यज घटना करू लागले तर त्यात नवल कसचे ?' (पृष्ठ २४३). स्त्रियांविषयीचे आहिताग्नींचे विचार पराकोटीचे सनातनी आहेत. स्त्रियांच्या राजकारणप्रवेशावर त्यांचा अत्यंत राग होता. काँग्रेसच्या अध्यक्षपदी स्त्री (अॅनी बेझंट) विराजमान झाली म्हणून काँग्रेसला ते स्त्रीवृत्तीची ठरवतात. त्यांचे स्त्रीविषयक मत त्यांनी दिलेल्या महंमद पैगंबराच्या वचनात व्यक्त होते. ' स्त्रियांचे केस लांब असतात; पण अक्कल आखूड असते. ' राजकारण्यांना ते असा इशारा देतात की, ' कोणतीही स्त्री बोलू लागली असता पुरुष तिच्या शब्दाकडे लक्ष देत नाहीत तर तोंडाकडे पाहतात हे कामशास्त्रज्ञांचे मत राज्यधुरा वाहणारांनी लक्षात घेऊन चालावे.' ह्या पुस्तकाच्या २४२-४३ वरील मजकूर असा स्त्री-निंदेने भरलेला आहे. (आहिताग्नींनी इंदिरा गांधी, गोल्डा मायर, सिरिमाओ भंडारनायके आणि मार्गारेट थॅचर ह्या स्त्रियांचे सत्ताग्रहण पाहिले असते तर संतापाने त्यांचा किती तीळपापड झाला असता कोणास ठाऊक !) सगळ्यात कहर म्हणजे आहिताग्नी सती व केशवपनाच्या दुष्ट चालींचाही हिरीरीने पुरस्कार करतात ! (पृष्ठ ३७७ ते ८१) त्यांचे म्हणणे असे की, वैदिकधर्म हा यज्ञप्रधानधर्म ( Religion of Sacryfice ) आहे. ख्रिस्ती धर्माप्रमाणे सेवाप्रधान धर्म ( Religion of Service ) नाही. यज्ञ म्हणजे दान आणि दानातच तपाची सार्थकता आहे. तेव्हा सतीमुळे होणारे जीवनदान किंवा ते शक्य होणार नसेल तेव्हा केशवपनामुळे होणारे केसांचे दान हे राजवाड्यांना समर्थनीय वाटते. केशवपनाने स्त्रीचे सौंदर्य नष्ट होते ह्या आक्षेपावर ते असा युक्तिवाद करतात की, स्त्रीचे सौंदर्य कोणाकरता ? तर पतीकरता. तो तिच्या सौंदर्याचा ' एकमेव भोक्ता ' आहे. तेव्हा तो गेल्यावर तिला आपल्या सौंदर्याची काय क्षिती वाटावी? राजवाड्यांचा दुसरा मुद्दा असा की सौंदर्यशास्त्राच्या दृष्टीने सौन्दर्य हे बहिर्निष्ठ की अंतर्निष्ठ ? तर अंतर्निष्ठ. (म्हणून तर पंढरपूरचा विठोबा सुंदर-इति राजवाडे !) याच आधारावर, ' विकेशत्वाकडे पाहून सौंदर्याची हानी झाली असा कोण मायचा पूत म्हणू शकेल ?' हा त्यांचा सवाल आहे.

राजवाडे हे फॅसिझमचे पुरस्कर्ते आणि हिटलरचे प्रशंसक आहेत. पुस्तकातील २५९ ते २६४ ही पृष्ठे याची साक्ष देतात. राजवाड्यांच्या मते, ' फॅसिस्टगिरी शुद्ध नैसर्गिक आहे. हॉब्सच्या तत्त्वज्ञानाप्रमाणे ती व्यक्तिमात्राच्या ठिकाणी असलेल्या बलाचे प्रतीक आहे आणि व्यक्तिमात्राचे बल तिच्या स्वार्थाला धरून आहे...' 'समाजात फॅसिझमकडे चढणे हा प्रगतीचा मार्ग आहे तर उलट सोशियालिझम्कडे उतरणे हा अधोगतीचा आहे. '...' केऑसमधून कॉसमॉस निर्माण होतो, चिखलातून कमलपुष्पाचा [illegible] वर उमटतो, हे खरे अवताराचे रहस्य आहे व धर्मसंस्थापनार्थ धर्मावतार म्हटला की तो

## आक्रमक गुरु-शिष्य !

आहिताग्नी राजवाड्यांवर त्यांचे गुरु प्रि. एफ्. डब्ल्यू. बेन ( १८६३ ते १९४० ) यांचा फार मोठा प्रभाव पडलेला दिसतो. बेन हे डेक्कन कॉलेजमधले त्या वेळचे अतिशय विद्यार्थीप्रिय प्राध्यापक. प्रि. बेन आणि आहिताग्नी ह्या गुरु-शिष्यांमध्ये काही बाबतीत विलक्षण साम्य आढळते. दोघेही सनातनी आणि विक्षिप्त विद्वान ! दुसऱ्यावर टीका करताना त्यांची आक्रमकता नुसती बघून घ्यावी ! प्रि. बेन यांचे डॉ. भांडारकरांबद्दलचे हे उद्‌गार पाहा –

' As he grows older he grows more and more foolish ".(पृ. १६)

या गुरुशिष्याचा आक्रमकपणा एकत्रितपणे दाखवून देणारे एक उदाहरण पाहाण्यासारखे आहे. राजवाडे म्हणतात,

'...माझ्या प्रौढ वयात जसजसा मला माधवराव कुंट्यांच्या पांडित्यपूर्ण ग्रंथाचा परिचय होऊ लागला तसतसा त्यांच्यासंबंधी माझा आदर विलक्षण वाढत चालला व त्यापुढे विष्णुशास्त्रींची विद्वत्ता, क्षुद्र, पोरकट दिसू लागली. येथे मला प्रो. बेनच्या व्याख्यानात त्याने ह्यूएल आणि मिल्ल यांच्यासंबंधी जो आपला अनुभव सांगितला तो बरोबर आठवतो. तो म्हणाला –

'When I first read Mill I thought Whewell was an ass, but when I came to know Whewell I found Mill was an ass ' (पृष्ठ १२–१३) ◻

निश्चयाने फॅसिस्ट आहे...' सिकंदर, सीझर, आणि नेपोलियन यांना ' अति मोठे फॅसिस्ट ' म्हणून गौरवणारे राजवाडे रामाबद्दल म्हणतात, 'हल्लीच्या भारतीय राज्यकर्त्यांना रामराज्याची आकांक्षा आहे; पण राम हा जगातील सर्व फॅसिस्टात बडा फॅसिस्ट होता हे त्यांना समजत नाही !' नंतर राम आणि आणि फॅसिझम या दोहोंचे श्रेष्ठत्व राजवाडे विशद करतात ! राजवाडेकृत हिटलर-प्रशस्ती याप्रमाणे आहे—' अर्वाचीन काळचा जर्मन फॅसिस्ट वीर हेर हिटलर याला आर्यधर्माचे रहस्य उत्तम कळले असल्याकारणाने त्याने आपल्या राजवटीत अग्नीचे प्रतीक मानले आणि आपल्या ध्वजावर स्वस्तिक चिन्ह धारण केले. गेल्या महायुद्धात दैवयोगेकरून जर त्याचा जय झाला असता तर जगात आज ख्रिस्ती धर्माच्या जागी आर्यधर्माचे निशाण फडकले असते आणि या देशात अस्पृश्योद्धाराऐवजी ब्राह्मणोद्धाराचे कार्य दृष्टोत्पत्तीस आले असते !'

राजवाड्यांचे असे सनातनी आणि फॅसिस्ट विचार आजच्या काळात पटण्यासारखे नाहीत. किंबहुना ते त्याज्यच आहेत. मात्र हे विचार त्यांनी आपल्या आत्मचरित्रात मांडले याबद्दल त्यांना दोष द्यावा असे मला वाटत नाही. कारण त्यांनी स्वत.चे खरेखुरे विचार निर्भीडपणे आणि प्रामाणिकपणे मांडले आहेत. दांभिक पुरोगाम्यापेक्षा असा प्रामाणिक प्रतिगामी परवडला ! दुसरे असे की, राजवाड्यांची मते वाचताना त्यांचा काळ आणि ज्यात ते वाढले ते वातावरणही थोडे लक्षात घ्यायला हवे. थोडक्यात राजवाड्यांच्या मतांशी सहमत होणे अशक्य असले तरी ती मते मांडल्याबद्दल त्यांच्या आत्मचरित्राला दर्जाहीन ठरवणे अन्यायाचे होईल. ते आत्मचरित्र दर्जेदार नाही आणि बेताल आहे असे मी जे म्हलतो त्याची कारणे वेगळी आहेत. यानंतर मुख्यतः त्याचीच चर्चा मी करणार आहे.

## बेताल परनिंदा

राजवाड्यांनी आपले विचार व्यक्त करताना इतर व्यक्तींवर, विशेषतः काही मोठ्या व्यक्तिमत्त्वांवर जी टी टीका केली आहे ती बेताल आहे. राजवाड्यांच्या ह्या ' स्पष्ट ' मतप्रतिपादनाचो आपल्या 'पुरस्कारां' त श्री. के. क्षीं. नी केलेली तरफदारी मोठी अजब आहे ! ही मतं नुसती स्पष्ट असती तर आक्षेप घेण्याचे कारणच नव्हते; पण तशी ती नाहीत. स्पष्टपणा वेगळा आणि असहिष्णु टीका वेगळी; प्रामाणिक मतभेद वेगळे आणि असभ्य आणि आक्रमक परनिंदा वेगळी, हे लक्षात घ्यायला हवे. राजवाड्यांच्या विद्वत्तेमुळे आणि व्यासंगामुळे त्यांची अहंमन्यता वाढली असावी. ह्या अहंमन्यतेतून इतरांबद्दलची तुच्छता वाढली असावी आणि ह्या दोन गोष्टींच्या अतिरेकी संगमातून परनिंदेला काही ताळतंत्रच राहिले नसावे, असे मला वाटते.समकालिनांबद्दलच्या राजवाड्यांच्या काही मतांचा उल्लेख करणे मला आवश्यक वाटते. (येथे अर्थातच मी 'विस्तारभय' वगैरे बाळगलेले नाही! ) —

नाट्याचार्य खाडिलकर आणि बालगंधर्व यांच्यावर राजवाड्यांनी सडकून टीका केलीय. खाडिलकरांच्या काव्याला ते 'विटाळचाचे काव्य' म्हणतात. (पृ. ११७) बालगंधर्वांबद्दल ते म्हणतात, "त्याला 'दळूबाई दळू' च्या चर्वितचर्वणाची दुष्ट खोड लागली आहे व ती हल्लीच्या पुष्कळ लहानमोठ्या गाणारांनी उचलली आहे. " (पृ. १०९). आपले एक प्राध्यापक हरिभाऊ लिमये यांच्याबद्दल ते म्हणतात, "लिमये हा तर दुय्यम दर्ज्याचा रेम्याडोक्या प्रोफेसर होता." (पृ. १६१) तसेच फर्ग्युसनमधील "परांजपे-भाटे-लिमये- पानशे अँड को." ह्यांना ते " रद्दी प्रोफेसर्स " म्हणून निकालात काढतात. (पृ. ३१५). हरिभाऊ लिमयांप्रमाणेच ते हरि नारायण आपट्यांनाही " रेम्याडोक्या " ठरवतात (पृ.३७७) आणि हरिभाऊ आपट्यांनी आपल्या ' पण लक्षात कोण घेतो' ह्या कादंबरीत "बिघडलेल्या समाजाची आगरकरी छापाची सुधारणा " आणल्याबद्दलचा आपला राग अशा रीतीने व्यक्त करतात!

## आपले इंग्लिश आणि त्यांचे मराठी !

मराठी माणसाचे इंग्लिश म्हणजे साधारणतः आनंदीआनंदच असतो ! ही परिस्थिती आजच आहे असे नव्हे, तर ' वाघिणीचे दूध ' पिणाऱ्या आणि इंग्रजीतले अवघड अग्रलेखसुद्धा पाठ करणाऱ्या आपल्या आधीच्या पिढ्यांचीही स्थिती आपल्यासारखीच होती ! राजवाडे आपल्या प्राध्यापकांबद्दल काय म्हणतात पाहा —

'...या सर्वच प्रोफेसरांच्या इंग्रजी भाषेत व्याख्याने देण्याच्या पद्धतीबद्दल बोलावयाचे तर यांपैकी एकालाही नीट इंग्रजी बोलता येत नव्हते. कर्वे, परांजपे, भानु, भाटे, लिमये, पानसे सर्व एकाच माळेचे मणी !

...अर्थात् अशा क्षुद्र इंग्रजी कविता शिकविणाऱ्या बूटपाटलोणवाल्या फाकड्या प्रोफेश्वरांचा आमच्यापुढे तोरा आणि चमत्कार हा की,जन्मभर तेच ते विषय शिकवूनही यांना ती भाषा बोलता येत नव्हती हे निराळेच! याला एकच अपवाद सांगावयाचा तर तो नामदार गोखल्यांचा होय. तथापि त्यांनाही 'ब्रूटफोर्स' शब्दाचा बरोबर अर्थ समजून घेण्याकरिता सेल्बीकडे धाव घ्यावी लागली ! ते इंग्रजी भाषा उत्तम सफाईने बोलत अशी त्यांची ख्याती आहे; पण त्यांनी ती भाषा आपल्या कौन्सिलातील भाषणांपुरती, मेकॉलेच्या निबंधातील पॅरिग्राफचे पॅरिग्राफ पाठ करून कमविली होती. आता ही गोष्ट एका फर्ग्युसन कॉलेजपुरतीच होती असे नाही तर डेक्कन कॉलेजातही एतद्देशीय प्रोफेसरांची हीच स्थिती होती. एकदा एका प्रोफेसराला एका विद्यार्थ्याशी बोलताना ' तू रिकामा केव्हा असशील ' असे विचारायचे होते. त्याने ऐटीत इंग्रजीत विचारले – " When will you be vacant ? ' ?' विद्यार्थी हजरजबाबी होता. तो म्हणाला – ' ' I am just now empty '....' (पृष्ठ १६५-६६)

अर्थात दुःखात सुख एवढेच की, आपल्या इंग्रजीची गत तीच इंग्रजांच्या मराठीची गत ! याबाबतही राजवाडे उदाहरणे देतात —

'...सेल्बीसाहेबाला जग आणि गज यांतील अंतर कित्येक दिवस कळत नव्हते... एका गोऱ्या अधिकाऱ्याने आपल्या मराठीच्या तोऱ्यात आपल्या असिस्टंटला असे सांगितले की, जेव्हा माझी बायको गाभण होते तेव्हा मी तिला विलायतेत पाठवितो...!' (पृ. १६६) ◻

महात्मा गांधींबद्दल राजवाडे अत्यंत तिरस्काराने लिहितात. गांधींबद्दलचे त्यांचे हे उद्गार पहा, "जसा आपल्या कलहांतरितेचा आपल्या पतीवर प्रणयकोप झाल्याने तो नम्र होतो त्याप्रमाणे गांधींपुढे इंग्रज नमला यांत संशय नाही. म्हणून गांधींनी किती अपराध केले तरी ते इंग्रजांनी स्त्रीदाक्षिण्याने पोटातच घातले. "(पृ.२३०) ..."महात्मा गांधी हे संस्कृतीचे उज्ज्वल फल नव्हे तर नासलेले decadent फल आहे." (पृ. २४३.)

सावरकरांची हिंदुत्वनिष्ठा लक्षात घेता राजवाड्यांना खरे तर त्यांच्याबद्दल प्रेम वाटायला हवे होते! पण हिंदुत्वाच्या मर्यादेत का होईना सावरकर बुद्धिवादी सुधारक होते. तेव्हा राजवाडे या गोष्टीचा राग काढतातच! इतर नेत्यांच्या गुणांचा सावरकरांच्यात कसा अभाव होता हे सांगून पुढे ते म्हणतात,... "अर्थात यापैकी सावरकरांच्याजवळ एकही गुण नसून उलट ज्ञानाचा अभाव, पोरकट भावनांचे आविष्करण, क्षुद्र अहंमन्यता, स्वार्थपरायणता आणि धर्मभ्रष्टता, नैतिक शिथिलता ओतप्रोत भरलेली असल्यामुळे काही भावनावश पोरेटोरे आणि किरकोळ महासभावाले याशिवाय इतर कोणावरही त्यांचे तेज पडणे शक्य नव्हते." याही पुढे जाऊन सावरकरांच्या समुद्रातल्या उडीचीही ते टवाळी करतात, "पूर्वी त्रेतायुगात जे एकदा समुद्रात उडी ठोकून वीरत्व संपादिले त्या मुदलावर यांच्या पुढल्या सर्व मोठेपणाची मदार!" (पृ. २८४)

स्त्रीशिक्षणाची चळवळ वा स्त्रियांसाठी सुधारणा घडवून आणण्याचा प्रयत्न करणाऱ्यांवर आहिताग्नींचा फार राग! त्यांचे म्हणणे असे की, "ज्या ब्राह्मणवर्गात पातिव्रत्याची पराकाष्ठा सती जाण्यापर्यंत आहे ते पातिव्रत्य युरोपी स्त्रियांपुढे आदर्श ठेवण्याऐवजी एक नवरा मेला तर दुसरा, दुसरा मेला तर तिसरा असे त्या रानटी स्त्रियांचे अनुकरण आमच्या सुसंस्कृत आर्य स्त्रियांस करावयास लावणे आणि या कृत्याला 'सुधारणा' म्हणणे यासारखी लज्ज्यास्पद गोष्ट कशी घडून आली असती ?" (पृ. ३०९–१०) महर्षी कर्व्यांच्या पुनर्विवाहाबद्दलचा राजवाड्यांचा तळतळाट असा आहे, "मी लहानपणी जेव्हा यांचा पुनर्विवाह ऐकला तेव्हा काळाच्या परिस्थितीप्रमाणे मला वाटले यांच्या पुढील पिढीचे समाजात काय होईल ? ती प्रजा पौनर्भव समजली जाईल; परंतु आज पाहतो तो त्यांचे काही कमी नाही इतका काळ बदलून गेला आहे. त्या वेळी यांच्यापासूनच का म्हणा ना समाजशरीराच्या रक्तात जो किंचित बिघाड सुरू झाला ते शरीरयंत्र आज पूर्णपणे महारोगाने ग्रासून गेलेले दिसत आहे." (पृ. ३११)

म. म. द. वा. पोतदार आणि म. म. पां. वा. काणे यांच्याबद्दलचे हे उद्गार पाहा– 'काय ? पुण्याचे वासुदेवशास्त्री अभ्यंकर, राजापूरचे दत्तशास्त्री निगुडकर व वाईचे त्र्यंबकशास्त्री लेले हे जसे महामहोपाध्याय तसेच काणे व पोतदारही महामहोपाध्याय ? हा काय चमत्कार आहे! रासभाच्या अंगावर झूल घातली म्हणून त्याला कधी हत्तीची किंमत येणार आहे ?" (पृ.३२१)

तेव्हा, अशी खूप उदाहरणे आहेत! आहिताग्नींनी चिपळूणकर, पांगारकर, आगरकर, केळकर, अणे, रँ. परांजपे इ. अनेकांवरही असेच टीकास्त्र चालवलेले आहे. हिंदुधर्मातील सुधारक पंथावरील त्यांची टीकाही (पृ. ३३०–३१) अतिशय भडक आहे. 'माझे कोणाशीही वैर नाही. मी व्यक्तिद्वेषाने बोलत नाही' (पृ. १६६) असे एकीकडे म्हणणारे राजवाडे दुसरीकडे मात्र कोणती पातळी गाठतात याची साक्ष देण्यास वरील विधाने पुरेशी आहेत!

आहिताग्नींची ही रांगडी परनिंदा त्यांच्या आत्मचरित्राची 'वाचनीयता' कदाचित वाढवत असेलही; पण दर्जा मात्र नक्कीच घालवून बसते! बेताल परनिंदा आणि दर्जेदारपणा ह्या दोन गोष्टींचे परस्परसंबंध काहीसे सी–सॉच्या फळ्यांसारखे आहेत. अतिरिक्त परनिंदेची फळी वर गेली की दर्जाची फळी खालच्या टोकाला पोहोचते आणि ज्या आत्मचरित्राचा दर्जा उंचावलेला असतो तेथे बेताल परनिंदा पार धुळीला मिळालेली असते! राजवाड्यांची लेखणी एकदा तिरकी चालू लागली, की ती सुसंस्कृतपणाच्या मर्यादा मोडायला मागेपुढे पहात नाही, असे दिसते. त्यांच्या असभ्य लिखाणाचे आणखी एक उदाहरण देण्यासारखे आहे. 'हल्ली काही फार पुढारलेल्या म्हणजे नासलेल्या स्त्रिया सिगारेट ओढू लागलेल्या आहेत असे ऐकतो.' (पृ. ३४८) असे सांगून राजवाडे त्यावर असे भाष्य करतात की, 'अर्वाचीन कामशास्त्राच्या दृष्टीने पाहता ज्या कारणास्तव स्त्रीने शिटी फुंकणे दोषास्पद आहे, त्याच कारणास्तव किंवा त्याहून अधिक तिने सिगरेट तोंडात धरणे

## कर्मठ राजवाडे, सवाई कर्मठ पारशी आणि अग्नीचा उपमर्द!

राजवाडे हे आहिताग्नि कर्मठ पंडित. अशा राजवाड्यांनाही ज्ञान शिकवणाऱ्या एका गृहस्थाचा राजवाड्यांच्या आत्मचरित्रातला हा एक किस्सा—

'...धर्माच्या दृष्टीने पाहिले तर विडी ओढण्याच्या क्रियेत धर्माची कशी पायमल्ली होत आहे याची जाणीव मला एकदा दक्षिण हैदराबादेत एका पारशी गृहस्थाने करून दिली. तो म्हणाला, 'जसे आम्ही पारशी तसे तुम्ही हिंदूही अग्नीचे उपासक आहात. तुमचे सर्व संस्कार अग्नीवर होतात; पण तुम्ही विड्या ओढण्यात पदोपदी त्या अग्नीचा कसा उपमर्द करता हे पाहात नाही!' मला प्रथम याचा अर्थ काही कळेना. मी त्याला विचारले, 'आम्ही अग्नीचे पूजक त्याचा उपमर्द कसा करतो ?' तो म्हणाला, 'तुम्ही विडी ओढून जळती काडी खाली टाकता आणि पायाखाली दावून विझविता. हा अग्नीचा उपमर्द नव्हे का ? आम्ही पारशी कधी असे करणार नाही!' तेव्हा माझ्या डोक्यात प्रकाश पडला आणि त्याचे सत्यत्व पटले. याशिवाय तो आणखी म्हणाला, 'हल्ली विजेचे दिवे घरात आल्यापासून तुम्ही आपल्या देवघरात देवापाशीही ते लावू लागला आहात. यात जो अपवित्रपणा आहे तो तुमच्या कसा लक्षात येत नाही ?' त्याचे कारण विचारता तो म्हणाला, 'अहो, हे दिवे शौचकूपात आणि देवघरात एकाच प्रवाहातून वाहतात...' हे ज्ञान संपादन करून राजवाडे असा शोध लावतात की, 'जो न्याय दिव्याला तोच न्याय पाण्याला. म्हणून अद्याप काही जुने लोक देवपूजेला नळीचे पाणी घेत नाहीत, विहिरीचे घेतात!' (पृ. ३९५–९६). ◻

दोषास्पद आहे. कारण त्यात चुंबनविधीतील केवळ मुखाचे उच्छ्रित संपुटच सिद्ध होत नाही तर त्याहीपलीकडे त्याची मजल जाऊन ते एक निराळेच लाक्षणिक चिन्ह निर्माण होते. मागे मी एके ठिकाणी सांगितलेच आहे की, आमचा डेक्कन कॉलेजातील इतिहासाचा प्रोफेसर बेन हा कोणी मुलाने कानात लाकडी पेन्सिल घातली की त्याला 'इन्डिसेंट'—अश्लिल म्हणून रागे भरे. त्याहीपेक्षा हे स्त्रीच्या मुखोष्ठपुटातील सिगरेटचे ओंगळ दृश्य अधिक अश्लील म्हटले तर वावगे होणार नाही.' (पृ. ३४९-५०)

आत्तापर्यंत सांगितलेल्या उदाहरणांवरून असे स्पष्ट होते की, पुरोगामी सुधारकांवर किंवा आपल्याशी मतभिन्नता असलेल्या इतर व्यक्तींवर आणि समाजातील नव्या बदलांवर टीका करताना राजवाड्यांचा तोल सुटलेला आहे. ऊठसूठ दुसऱ्यांवर आग पाखडणे हा त्यांच्या आहिताग्नी-व्रताचाच एक भाग होता की काय न कळे! राजवाड्यांनी निखळ स्तुती कोणाची केली असेल तर ती मुख्यतः प्रि. बेन आणि लो. टिळकांचीच. ह्या स्तुतीचेही प्रधान कारण म्हणजे ह्या दोन व्यक्तींनी सनातनी विचारांचा केलेला पुरस्कार!

## आत्मचरित्र की लेखसंग्रह

तेव्हा, टीकेतला बेतालपणा हे या आत्मचरित्राचे प्रमुख वैगुण्य. दुसरे असे की, आत्मचरित्रलेखनाची कसलीच शिस्त ह्या आत्मचरित्राला नाही. ह्या आत्मचरित्राला एकूण ६३ प्रकरणे आहेत; पण काही तरी विभागणी करायची म्हणून ती केल्यासारखी वाटते. चारशे पृष्ठांच्या ह्या पसरट आत्मचरित्रात राजवाडे वारंवार विषयांतर करतात. याचे एक मोठे उदाहरण म्हणजे, आपल्या शिक्षणाची हकीगत सांगताना साधारणतः पृष्ठ १८६ नंतर त्यांचे विषयांतर सुरू होते आणि अनेक विषयांची स्टेशनं घेत घेत त्यांची गाडी जवळजवळ शंभर पृष्ठांचा प्रवास करते. ते पुन्हा मूळ विषयावर येतात ते पृष्ठ २८६ वर! आहिताग्नी आपल्या आत्मचरित्रात विविध विषयांवरचे विचार विस्ताराने सांगतात. खरे म्हणजे हा एक लेखसंग्रह, तर नव्हे ना असे हे आत्मचरित्र वाचताना वाटत रहाते. उदा. २५ वे प्रकरण म्हणजे चवक कलेविषयीचा एक लेख आहे किंवा ५७ वे प्रकरण ह्या मांसाशन आणि धूम्रपानाच्या दुष्परिणांवर लिहिलेला एक स्वतंत्र लेखच वाटतो. आत्मचरित्रात व्यक्तीचे विचार येऊ नयेत असे नाही; पण ते आयुष्यकथनाच्या ओघात योग्य प्रमाणात यावेत आणि आत्मचरित्राचा तोल बिघडवणारे नसावेत; पण राजवाड्यांचे आत्मकथन मात्र पाल्हाळिक विचारप्रदर्शनाने इतके भरलेले आहे की त्याने त्याचा तोल ढासळलेला आहे.

हे आत्मचरित्र लिहिताना राजवाड्यांच्या डोळ्यांसमोर नेमके काय होते याचा थोडक्यात आढावा घ्यायला हवा. आत्मचरित्राच्या पहिल्या तीन पृष्ठांमध्ये ते स्पष्ट होते. इ. स. १९१८ ते १९५० या ३२ वर्षांतील महाराष्ट्र आणि बृहन्महाराष्ट्र यांच्या मराठी भाषाक्षेत्रातील आपल्या कार्याचा व्याप दर्शवणे आणि त्या अनुषंगानेच जीवनवृत्त कथन करणे हे त्यांना अभिप्रेत होते. पुढे ते सांगतात की, आपल्या राष्ट्रबांधवांसाठी आपल्या सर्व अंगीकृत कार्याचा इत्थंभूत अहवाल त्यांना द्यायचाय. नंतर एके ठिकाणी ते सांगतात की, स्मृतिलेखाचे दोन भाग करून पहिल्या भागात आत्मवृत्त व दुसऱ्या भागात कृताचा आढावा त्यांना द्यायचाय. ह्या सगळ्या मुद्द्यांचा सूक्ष्म विचार केला तर राजवाड्यांच्या मनात आत्मचरित्राच्या स्वरूपाबद्दल आणि रूपरेषेबद्दल जरासा गोंधळच असावा, असे वाटते; पण तरीही ह्या सर्व गोष्टींची गोळाबेरीज करून त्यांना आपले बहुविध कार्य लोकांना सादर करायचे होते असे मानायला हरकत नाही. मुळात त्यांच्या आत्मचरित्राचे नाव 'मी आणि माझे कार्य' असेच होते. (संदर्भ: 'अर्वाचीन मराठी वाङ्मयसेवक'—षष्ठ खंड—पृष्ठ १७४.) हे नाव पुस्तक प्रकाशित करताना मात्र 'आहिताग्नी राजवाडे आत्मवृत्त' असे बदलण्यात आले. (हा बदल करण्यात फारसे काय साधले हे बदल करणाऱ्यांनाच ठाऊक! वाचकांचे लक्ष वेधून घेण्यासाठी मूळ नाव बदलून जरा आकर्षक नाव दिले आहे म्हणावे, तसेही दिसत नाही!) राजवाड्यांचे आत्मचरित्र वाचून संपल्यावर वाचकाच्या डोळ्यांसमोर त्यांचे कार्य स्पष्टपणे उभे राहण्याएवजी त्याच्या लक्षात राहतो तो राजवाड्यांच्या आक्रमक सनातनीपणाचा बेताल—रांगडा आविष्कार!

ह्या ढिसाळ आत्मचरित्राची सुरुवात अतिशय रटाळ आहे आणि चारशेव्या पानावरचा शेवट ओघ मध्येच तुटल्यासारखा झाला आहे. आत्मचरित्रलेखन राजवाड्यांच्या मृत्यूमुळे खंडित झाले असे गृहीत धरून तुटक शेवटाबद्दल त्यांना दोष द्यायला नको; पण एका संस्कृत श्लोकाने आणि त्याच्या मराठी रूपांतराने होणारी रुक्ष सुरुवात हा राजवाड्यांच्या लेखनशैलीचा दोष मानायला हवा. अर्थात ही रुक्षता पुढे सातत्याने टिकते असे नाही. उदा. पुण्यातल्या प्लेगचे आणि प्लेगने त्यांच्या कुटुंबावर केलेल्या आघाताचे राजवाडेकृत वर्णन अतिशय प्रत्ययकारी उतरले आहे. ('२२ जून १८९७' सारख्या चित्रपटात प्लेगचे जे चित्र उभे राहू शकले नाही. ते राजवाड्यांनी लिहिलेल्या काही पृष्ठांमध्ये—पृष्ठ ७० ते ८७—उभे राहते हे नक्की!) तसेच त्यांचे काही मित्र आणि प्रि. बेन यांची व्यक्तिचित्रे बऱ्यापैकी उठावदार झाली आहेत; पण हे झाले काही अपवाद! आत्मचरित्रकाराचे व्यक्तिमत्त्व चतुरस्त्र आहे आणि त्याची भाषा डौलदार आहे हेही खरे; पण एकंदरीत, प्रमाणबद्ध व रेखीव मांडणी आणि आयुष्याचे प्रत्ययकारी कथन ह्या गोष्टींचा आत्मचरित्रात बराचसा अभाव आहे असे जाणवल्यावाचून रहात नाही.

शेवटी मी एवढेच म्हणतो की, डोंगराएवढ्या माणसांच्या काळाचा एक प्रतिनिधी असलेल्या चतुरस्त्र विद्वानाचे हे आत्मचरित्र मराठीतल्या आत्मचरित्रांमध्ये विशेष मोलाची भर काही टाकू शकलेले नाही! *

'आहिताग्नी राजवाडे आत्मवृत्त'
श्रीविद्या प्रकाशन, शनिवार, पुणे ३०.
प्रथमावृत्ती (१९८०)
पृष्ठे ४००, मूल्य—४० रुपये.

रंगभूमी । पुरुषोत्तम करंडक स्पर्धांच्या निमित्ताने....

# मराठी एकांकिका : गुणात्मक वाढ हवी

मराठी वाङ्मयाच्या इतिहासात 'एकांकिका' हा प्रकार आता बरीच पावले चालून पुढे आला आहे. वाङ्मयाची एक शाखा म्हणूनच नव्हे तर जीवनानुभव व्यक्त करण्याचे एक साधन म्हणून एकांकिकेच्या माध्यमातून अनेकविध प्रयत्न झाले आणि होत आहेत. नाटक या प्रकारात एकांकिकेचा प्रवेश ही अलीकडील घटना आहे. एकूण तिचे स्वरूप लक्षात घेता, 'एक सोपा नाट्यप्रकार' असे समीकरण सध्या रूढ होऊ पाहात आहे. म्हणूनच एकांकिकेचा विचार करताना नाटक हा प्रकार वगळून स्वतंत्रपणे विचार करणे आवश्यक आहे.

एकांकिकेविषयी कलाकार जरी खूप उत्सुक असले तरीही लेखक मात्र त्याबाबत 'फारसा' विचार करताना दिसत नाहीत. सध्या संहितांची टंचाई नसली तरी चांगल्या संहिता अगदी अभावाने आढळतात ही वस्तुस्थिती आहे. याचे एक वरवर दिसणारे कारण म्हणजे सध्या जे बिनीचे एकांकिकाकार आहेत त्यांच्या संहिता कलाकारांना आव्हानात्मक वाटणाऱ्या नसतात. कारण त्यामध्ये फक्त घाटाकडे (form) लक्ष पुरविण्याची हौस अधिक असते. दिग्दर्शक आणि कलाकार यांच्या साह्याने रंगभूमीवर प्रेक्षकांच्या साह्यान सादर होणाऱ्या या नाट्यप्रकारात दिग्दर्शक, कलाकार, प्रेक्षक, तंत्रज्ञ यांचे जेवढे महत्त्व आहे तेवढेच किंबहुना थोडेसे जास्त महत्त्व मूळ संहितेला द्यावे लागेल. याचे एक प्रमुख कारण असे सांगता येईल की, 'काय' सादर करायचे हे ठरविणारा संहिताकार असतो. 'कसे' सादर करायचे हा दिग्दर्शकाचा प्रश्न असला तरी 'काय' वर 'कसे' अवलंबून असते हे लक्षात घ्यायला हवे.

संहितेचे हे महत्त्व लक्षात घेताना 'एकांकिका' हा प्रकार आणि संहितेचा त्यातील वापर यांचा विचार करायला हवा. एकांकिका हा नाटकाच्या मानाने अल्प वेळात सादर करावयाचा नाट्यप्रकार एवढेच म्हणून भागणार नाही तर नाटक आणि एकांकिका यातील नेमका फरक शोधण्याचा प्रयत्न केला पाहिजे. तीन अंकी नाटकातील एक अंक ही स्वतंत्र एकांकिका म्हणून सादर केली जाऊ शकते का? या प्रश्नाला 'नाही' असे उत्तर देताना या 'अंकाला' स्वतंत्र अस्तित्व नाही, ती स्वतंत्र आणि परिपूर्ण कलाकृती नाही, त्याला मागेपुढे संदर्भाची साखळी आहे या गोष्टी लक्षात घ्याव्या लागतील.

नाटक ही ज्याप्रमाणे एक स्वतंत्र कलाकृती असते त्याचप्रमाणे, त्याच लोकमाध्यमाचा, त्याच तंत्राचा वापर करणारी एकांकिकाही स्वतंत्र कलाकृती असते. या कलाकृतीचे घटक तपासून पाहायला हवेत. स्वतंत्र कलाकृती अनुभवाचे दर्शन घडवताना स्वतःची लय सांभाळते. ही लय त्या कलाकृतीच्या आशयाशी, घाटाशी आणि आविष्काराशी नाते सांगणारी असते. ही लय त्या कलाकृतीवर बंधने घालते. तिला एक स्वतंत्र आकार प्राप्त करून देते.

एकांकिकेतून आविष्कृत होणारा अनुभव आणि नाटकातून आविष्कृत होणारा अनुभव यांमधील नेमका फरक कलाकृतीतील ही अंतर्गत लय प्रदर्शित करते. नाटकाला मिळणारा वेळ आणि एकांकिकेला मिळणारा वेळ लक्षात घेतला तर अनुभवाच्या आविष्कारावर त्या घाटाद्वारे जी बंधने पडतात ती कळून येतील. नाटकातील अनुभवाला आविष्काराच्या विविध पातळ्यांवरून प्रवास करता येतो; पण एकांकिकेतून प्रकट होणारा अनुभव म्हणूनच अधिक (Solid) होतो. त्याची परिणामकारकताही म्हणून एकेरी होते.

कोणत्याही कलाकृतीद्वारे मानवी जीवनातील अनुभव, त्यामधील चढउतार, त्यामधील गुंतागुंत (complexity) आविष्कृत करण्याचा प्रयत्न कलावंत करीत असतो. जीवनातील विविध घटनांच्या आधारे त्यातील जाणिवेचे वेगवेगळे पदर उलगडून दाखविण्याच्या तो प्रयत्नात असतो. एकांकिकाकार असा प्रयत्न करणारच! हा प्रयत्न करीत असताना अनुभवाशी इमान राखणे ही किमान आवश्यक बाब मानायला हवी. एकांकिकेचे स्वरूप या आविष्कारावर जी बंधने घालते ती लक्षात घेऊन, या चौकटीत राहून हा अनुभव प्रत्ययकारी करण्याचा प्रयत्न एकांकिकाकार करतो, तसा त्याने करायला हवा.

एकांकिकेचा या दृष्टिकोनातून विचार करताना मराठी एकांकिका अतिशय खुजी असल्याचे जाणवते. मराठी नाटक एका बाजूला प्रायोगिक, व्यावसायिक आणि धंदेवाईक पातळीवर 'फोफावत' असताना एकांकिका या प्रकारात गुणात्मक भर फारशी पडलेली नसल्याचे जाणवते. ही बाब खटकणारी खरीच. संख्यात्मक वाढ हा कोणत्याही कलाप्रकाराचा अविभाज्य भाग असला तरी गुणात्मक वाढ तो कलाप्रकार अधिकाधिक संपन्न करीत असते. त्या कलाप्रकाराला नवनवीन दिशांची दालने उघडून देत असते. मराठी एकांकिकांकडे पाहताना याबाबत निराशाच पदरी पडते.

आज मराठी एकांकिका लिहिणारे बिनीचे एकांकिकाकारही या कलाप्रकाराकडे जाणीवपूर्वक पाहताना दिसत नाहीत. याउलट नवनवीन लेखक याबाबत अजाणता का होईना प्रयत्न करताना दिसतात. बिनीचे एकांकिकाकार ही जाणीव 'आज' ठेवत नाहीत असे दिसते. त्यांच्या एकूणच कलाकृतींमध्ये ही जाणीव अभावाने आढळते. असे का होते याचा विचारही समीक्षकांनी फारसा केलेला दिसत नाही. कारण एकांकिका हा समीक्षकांच्या दृष्टीने स्वतंत्र विचार करण्यासारखा कलाप्रकार (बहुतेक) नसावा.

### वाढती तंत्रशरणता

आज सादर होणाऱ्या एकांकिका फार ढोबळ मूल्यांचा ह्रास घडवणाऱ्या, बटबटीत आहेत. त्यामध्ये कलामूल्यांऐवजी प्रयोगमूल्याकडे अधिक लक्ष दिले जाते. घाटाचा विचार करताना आशयाकडे संपूर्ण दुर्लक्ष

केले जाते आणि म्हणून आजच्या एकांकिका जीवनानुभवाचा यथार्थ आविष्कार करीत नाहीत असे वाटते. मानवी जीवनातील गुंतागुंत व्यक्तीव्यक्तींमधील परस्पर संबंध, त्या संबंधांचे विश्व आणि या सगळ्यातून निर्माण होणारे प्रश्न यांचा शोध एकांकिका जाणीवपूर्वक घेत नाही. मानवी जीवनातल्या घडामोडींचे, घटनांचे अर्थ–अन्वयार्थ लावण्याचा प्रयत्न (अपवाद वगळून) बहुतांश एकांकिकाकार करीत नाहीत. या सगळ्याचा अर्थ एवढाच होतो की, जीवनविषयक जाणिवा, त्यातील अनुभव, त्या अनुभवांचे कलामूल्य आणि त्या कलामूल्यातील सर्जकता याकडे एकांकिकाकार दुर्लक्ष करतात, (किंवा) खरे तर हे सारे त्यांच्या कुवतीबाहेरचे आहे.

रत्नाकर मतकरी, रमेश पवार, श्रीनिवास भणगे, दिलीप परदेशी, वृंदावन दंडवते यांसारख्या नावाजलेल्या एकांकिकारांच्या एकांकिकांमध्ये आजवर मला खटकत आलेली गोष्ट नेमकी हीच आहे. मतकरींसारखा लेखक आपल्या कथांमध्ये ज्या ताकदीने अनुभवांचा शोध घेतो त्या मानाने त्यांच्या एकांकिकांमधून मात्र या अनुभवाला आविष्काराचा एक प्रकारचा बटबटीतपणा येताना दिसतो. त्यांच्या एकांकिकांत जीवनातील गुंतागुंत कलात्मकतेच्या पातळीवरुन प्रयोगशरण माध्यमातून फारच क्वचित अनुभवाला येते. बहुश: त्या एकांकिका बेतीव स्वरूपाच्याच असतात. म्हणून ते 'व्यावसायिक एकांकिकाकार' वाटतात. अनुभवाचा शोध घेताना सापडणारा घाट आणि त्या घाटाच्या अनुषंगाने येणारा अनुभव हा फरक मतकरींच्या एकांकिकांमधून दिसून येतो. त्यांच्याजवळ ही ताकदच नाही असे म्हणणेही धाष्टर्याचे आहे. त्यांनीही लक्षात राहण्यासारख्या एकांकिका सादर केल्या आहेत; पण त्यानंतरच्या काळात त्यांनी स्वत:पुरते या लेखनाचे तंत्र ठरवून घेतले आणि मग त्यांच्या एकांकिकांना आविष्कार–पद्धतीचा तोच तोपणा प्राप्त होऊ लागला. श्रीनिवास भणगेही याहून वेगळे नाहीत. अतिशय योजनापूर्वक प्रयोगमूल्यांची कसोशीने जपणूक करून, अनुभव वगळून ते एकांकिका तयार करतात. त्यामधील शब्दबंबाळपणा, नाट्यबीजाचा तोकडेपणा पण रंगभूमीच्या मर्यादांची जाण यामुळे त्या एकांकिकांचा प्रयोग चांगला रंगतो; पण प्रयोग संपल्यानंतर मनात उरते ते अभिनय, तांत्रिक बाजू. मूळ आशयाच्या बाबतीत मात्र 'रामराम'च असतो.

रमेश पवार, दिलीप परदेशी यासारख्या लेखकांच्या लिखाणातूनही ही तंत्रशरणता जाणवते. फॉर्मच्या हव्यासापायी एक प्रयोग यशस्वी ठरल्यानंतर त्याच अनुभवाशी समांतर अशा एकांकिका तयार करणे' त्यांना फारसे अवघड जात नसावे. वृंदावन दंडवतेंसारख्या दीर्घांक लेखकानेही सामूहिक नाट्याविष्काराच्या बाबतीत काही लुडबुड करण्याचा प्रयत्न केला, पण पुढील प्रयोगांमध्ये ही तंत्रशरणता, सामूहिक महत्त्व यांचे अवडंबर माजू लागल्याचे लक्षात येते.

सतीश आळेकरांसारखा लेखकही 'झुलता पूल' सारखी तरल, संवेदनाक्षम आणि कलादृष्ट्या, प्रयोगदृष्ट्या सरस एकांकिका सादर करतो; पण पुढे निर्माण झालेल्या बहुतेक एकांकिकांमध्ये प्रयोगाचे, रंगभूमीचे भान ठेवता ठेवता आशयाकडे दुर्लक्ष झाल्याचे दिसते; पण तरीही त्यांच्या पहिल्याच एकांकिकेने या प्रकाराबद्दल उत्सुकता निर्माण झाली, त्या प्रकारातील Potentialities बद्दल आशा वाटू लागली...पुढे हे सर्व फोल ठरले. चंद्रकांत प्रभाकर देशपांडे सारखा, किंवा वामन तावडे, वामन पात्रीकर यांच्यासारखे कमी लिहिणारे लेखक या क्षेत्रात आपली चमक दाखवून जातात. त्यांची अनुभवाची प्रगल्भता त्यांच्या एकांकिकांमधून जाणवते; पण तरीही चं. प्र. देशपांडे यांच्या एकांकिकेतील शब्दबंबाळपणा मात्र प्रयोगभर जाणवत राहातो. शब्दांचे प्रयोगमूल्य त्यामध्ये कमी आढळते म्हणूनच त्या परिमाणकारक झाल्या, तरीही त्यातील बहुतेक भाग शब्दांनी व्यापलेला असतो.

आजच्या मराठी एकांकिकांमधील सामाजिक संदर्भ हा एक अभ्यासाचा विषय आहे. जीवनातील फोलपणा, त्यातून निर्माण होणारे ताण-तणाव, अनुभवाचे अनेक पदर उलगडून दाखविताना या एकांकिका समकालीन सामाजिक संदर्भापासून दूर पळताना दिसतात. आपल्या सामाजिक बदलांचे प्रतिबिंब, त्या बदलातून निर्माण होणारे प्रश्न, नव्या जीवनविषयक जाणिवा यांचे आजच्या एकांकिकांमधून दर्शन घडत नाही.

सामाजिक संदर्भ साहित्यातून अपरिहार्यपणे प्रकट होतात. हे संदर्भ जसजसे व्यामिश्र होऊ लागतात तसतसे ते अधिकाधिक महत्त्वाचे बनतात. हा सामाजिक संदर्भ (सामाजिक आशय किंवा सामाजिकता नाही.) आजच्या एकांकिकांमध्ये कुठे आहे? एकांकिका म्हणूनच अजूनही अप्रगल्भ आहेत. दंडवतेंसारख्या लेखकांच्या दीर्घांकातून हा सामाजिक संदर्भ जाणवतो; पण ज्या समाजात आपण राहतो, त्या समाजापासून आपल्यापर्यंत वाहणारे जाणिवांचे निरनिराळे प्रवाह त्यातून दिसत नाही. म्हणूनच अस्तित्वाचा प्रश्न तेथे भौतिकदृष्ट्या जगण्याशी जोडला जातो.

आजच्या नागरी साहित्यात याचे दर्शन अधिक सखोलपणे, चिंतनाच्या पातळीवर दिसते. औद्योगिकतेमुळे समाजातील संवेदनांचा होणारा कोंडमारा आणि तिच्या विरुद्ध प्रत्येकजण आपापल्या परीने करीत असलेला आकांत यांचे दर्शन या नाट्यप्रकारात कुठे आहे? आजचे 'व्यावसायिक एकांकिकाकार' याबाबतीत काय विचार करताना दिसतात? जीवनातील फोलपणा, जगण्याची धडपड आणि संवेदनांचे, मूल्यांचे, जाणिवांचे कोणत्याच पातळीवर न लागणारे अर्थ या एकांकिकांत कुठे आहेत?

## रंजकतेची ओढ

काही जे ग्लिम्प्सेस दिसतात ते सुद्धा खूप उशीराने. या नाट्यप्रकाराद्वारे हे संदर्भ प्रकट करताना कलामूल्ये, प्रयोगमूल्ये यांची जपणूक करायला हवी. सामाजिक आशयातील कलात्मकता अनुभवायची कुवत त्यासाठी असायला हवी. कोणताही अनुभव शिळा झाला की त्याला एकांकिकेचे स्वरूप द्यायचे हा आजचा शिरस्ता आहे. मग थीमच्या शोधातील लेखकांना एखादा घटनाप्रसंग पुरतो. त्या प्रसंगाभोवती शब्दांची आणि उपप्रसंगांची वेटोळी काढत एकांकिका तयार करणे हे सोपे काम होते. एकांकिका हा एक अनुभवाचा प्रत्यय असतो याची जाणच थिटी आहे त्यामुळे त्या एकांकिका केवळ रंजनात्मकतेच्या पातळीवर जातात. त्यांना कलात्मकतेच्या पातळीवर संचार करावासा वाटत नाही. कारण रंजकता ही अधिक उथळ असते. (आणि झटपट प्रसिद्धी

देणारीही ! )

रंजकता हे मूल्य गृहीत धरून एकांकिका हा नाट्यप्रकार यापुढेही भरपूर फोफावेल; पण त्याचे गुणात्मक संवर्धन मात्र होणार नाही, बिनीच्या एकांकिकाकारांनी हे गुण-विशेष लक्षात घेणे आवश्यक आहे. नव-नवीन लेखकांना या रंजनमूल्यापासून दूर जाण्याला प्रवृत्त करणाऱ्यांनीच शेवटी याचा विचार करायला हवा.

आजच्या एकांकिकांमध्ये तरलतेऐवजी बटबटीतपणा जास्त जाणवतो. हा बटबटीतपणा प्रयोगापुरता मर्यादित नसतो तर संहितेचीच ती मागणी असते. म्हणून बटबटीतपणा हा अविभाज्य भागच समजला जाऊ लागला आहे. हा बटबटीतपणा अनुभवापासून दूर पळणारा तरी असतो किंवा अनुभवाला अधिक ग्लोरिफाय करणारा तरी असतो. जीवनानुभवातील व्यामिश्रता यामुळे कमी होत जाते आणि हाती उरते ते फक्त एक बटबटीत स्वरूपाचे रेखीव नाट्य. रेखीवपणा हा संहितेचा एक भाग असला तरीही तो जेव्हा नुसताच रेखीव राहतो तेव्हा अनुभवाचा उथळपणा जास्त स्पष्ट होतो.

महेश एलकुंचवारांसारखा लेखक आपल्या थोड्याश्याच लेखनातून शब्दांचे प्रयोगमूल्य, अनुभवाचे कलामूल्य यांचे संतुलन अतिशय संयमितपणे आविष्कृत करताना दिसतो, संहितेतील हा संयमितपणा आज फार क्वचित आढळतो. आढळतो. आजच्या एकांकिकांमध्ये या अनुभवाच्या खोलीला स्पर्श करून त्याची जाणीव करून दिली जात नाही. उथळपणा, रंजनात्मकता, बटबटीतपणा आणि फॉर्मचा हव्यास यापायी एकांकिका म्हणूनच गुणात्मकतेच्या दृष्टीने नवी वळणे घेऊ शकलेली नाही.

मराठी एकांकिकांच्या प्रवासात फॉर्मचे जेवढे प्रयोग झाले, त्यात आशयदृष्ट्या कोणतीच भरीव भर पडलेली दिसत नाही. आशियातील तोचतोपणा नवनव्या फॉर्मच्या साह्याने सादर करताना एकांकिका पुढे जाते आहे असे म्हणणे म्हणूनच धाष्टर्याचे ठरेल. हा अनुभवातील तोचतोचपणा मध्यमवर्गीय आहे, जीवनानुभवाच्या विविध पातळ्यांचा कलात्मक शोध घेण्याचा प्रयत्न इथे झालेला दिसत नाही. ही एकांकिकांची मर्यादा मानावी काय? वास्तविक एकांकिकेच्या फॉर्ममध्ये ही क्षमता निश्चितच आहे; पण तिचा अजून जाणीवपूर्वक; खोलवर विचार झालेला दिसत नाही. एकांकिकांमधील प्रगल्भतेचा अभाव याचमुळे दिसून येतो.

प्रेम, अश्लीलता, विकृती या त्रयीचा विचार अजूनही एकांकिका सोडत नाही. किंबहुना त्यातील विश्लेषणात्मकतेचा विचारही होत नाही. या सर्वामागे लेखकांच्या कुवतीचा प्रश्न उभा राहतो. हे लेखक या जाळ्यात इतके अडकून पडले आहेत की, यापलीकडील जीवनव्यापारात त्यांना रस नसल्यासारखे वाटते. मराठी एकांकिका जाळ्यात अडकून पडलेली आहे. तिला त्यातून बाहेर काढणेही कलादृष्ट्या आवश्यक बाब आहे; पण तथाकथित लेखकांनी मात्र याचा विचार करायला हवा.

प्रायोगिक पातळीवर सध्या एकांकिका सादर करण्याचे प्रमाण वाढलेले आहे; पण त्यातही मागे म्हटल्याप्रमाणे फॉर्मशीच खेळ खेळले जातात. अशाने प्रायोगिक रंगभूमीचा विकास होण्याला खीळ बसते आहे. एकूणच प्रायोगिक रंगभूमीची हानी यामुळे होत आहे. एकांकिका हा नाट्यप्रकार नुसताच रुजला आहे असे म्हटले जाते; पण त्या रुजण्यातून निर्माण होणाऱ्या पुढील एकांकिकांची दिशा मात्र स्वल्प होते आहे. ही दिशा वळवून एकांकिका अधिक समर्थ करायला हवी. तिची गुणात्मकता वाढवायला हवी, तिच्यातील नेमकी बलस्थाने शोधायला हवीत.

**—मुकुंद संगोराम**

# करंडका नाम.... पुरुपोत्तमम्

जून-जुलै महिना. कॉलेजेस नुकतीच सुरू झालेली असतात, पावसामुळे धरित्रीमातेने हिरवा शालू परिधान केलेला असतो. (वगैरे इयत्ता १० च्या निबंधाप्रमाणे सर्व पावसाळी वर्णन) तात्पर्य, लिज्जतपूर्ण, पाडगावकरी कवितांचे हे दिवस. सर्व कॉलेजातून उपलब्ध सर्व मराठी एकांकिकांना प्रचंड डिमांड येते आणि बघता बघता पुरुपोत्तम करंडकस्पर्धा तोंडावर येऊन ठेपतात.

पुण्याच्या महाविद्यालयीन जगतात ही स्पर्धा हा एक अत्यंत महत्त्वाचा 'इव्हेंट' आहे आणि गेली १६ वर्षे महाराष्ट्रीय कलोपासक ही संस्था या स्पर्धेचे संयोजन 'दर्जेदार' पणे करीत आहे.

या वर्षीपासून पुणे विद्यापीठाच्या सर्व कॉलेजेसना ही स्पर्धा खुली करण्यात आली आणि पहिल्याच वर्षी अहमदनगरच्या गंगाधरशास्त्री गुणे आयुर्वेद महाविद्यालयाने हा करंडक पटकावला.

त्यांनी सादर केलेली 'कळकीचे बाळ' ही एकांकिका अक्षरश: न भूतो न भविष्यती अशी होती. संपूर्ण मोकळे स्टेज, ना नेपथ्य ना लाइट इफेक्टस. जबरदस्त लेखन, उत्कृष्ट दिग्दर्शन आणि संपूर्ण कथावस्तू जशीच्या तशी प्रेक्षकांपर्यंत पोचवून त्यांना खिळवून ठेवणारा अभिनय करणारी माणसं ! विहीर, स्मशान, गुहा एवढेच नव्हे तर दरवाजा सुद्धा 'मानवी' दाखवून, शब्द आणि अभिनय हीच नाटकाची खरी अंगे आहेत हे या एकांकिकेने प्रत्यक्ष दाखवले. समूहनाट्य असून सुद्धा कवायत नव्हती (आणि 'घाशीराम' चा मुळीच प्रभाव नव्हता.) तंत्राच्या आहारी गेलेल्या नाटकांना त्यांनी एक सणसणीत चपराकच दिली. पहिल्या फेरीत ज्यांनी 'कळकीचं बाळ' पाहिलं त्यांनी तेव्हाच ओळखलं की, करंडक अभिनय व लेखनदिग्दर्शनाची सर्व प्रथम बक्षिसे ही एकांकिका घेणार. फक्त लेखनाचे पारितोषिक त्यांना मिळाले नाही. या नाटकाचे कौतुक करावे तेवढे थोडेच आहे.

याच्या उलट म्हणून 'काळ्या वंबाळ अंधारी' चे उदाहरण द्यावे लागेल. वास्तवाच्या जवळ जायचे म्हणजे तरी किती? त्याला काही मर्यादा? झोपडी, पाळणा, ठीक आहे. पण ते मोठे ओंडके, भरपूर घाण कचरा ! स्टेजवर चूल पेटवणे, कपडे पिळून वाळत टाकणे, पोराचे दुपटे धुणे, चुळा भरणे, थुंकणे, इ. ! अगदी किळस आली. बरे वास्तवताही नीट टिकत नाही. भरपूर दारू पिऊन 'एण्ट्री' घेणारा दीडएक मिनिटात छान बोलू लागतो. दुधावाचून

प्रचंड रडणारे पोर काही त्या आईला उचलून घेता येणे शक्य नसते, कारण तिथे ते मूल नसतेच ना! मग एवढे त्याला रडवायचे कशाला? त्या रडण्याने कान किटले! 'वस्ती' चे चित्र वास्तवपूर्ण उभे करताना कुत्र्यांचे भुंकणे ठीक आहे, पण मग ते कर्णकर्कश बॅक ग्राऊंड म्युझिक कशाला? ही एकांकिका पाहिल्यावर या शाहू मंदिर कॉलेज ने 'कन्स्ट्रक्शन' ही एकांकिका मागे दिली होती ही खरे वाटत नाही.

लेखनात विशेष ताकद नसताना लाइटस व इतर तंत्रे सांभाळून केलेला अत्यंत सफाईदार प्रयोग असेच ज्याचे वर्णन करावे लागेल असा नाटयप्रयोग सादर केला पुण्याच्या अभिनव कलाने. विद्यार्थी लेखक–दिग्दर्शक संजय जगताप यांच्या 'बुद्धं सरण गच्छामि' चा वर्ण्यविषय होता प्रस्थापित हिंदु धर्मास आणि ब्राह्मण समाजास बौद्ध धर्माच्या उदयाने बसलेले हादरे हा, पण शेवटपर्यंत त्याना नक्की काय म्हणायचे आहे ते नेमकेपणाने प्रेक्षकांपर्यंत पोचत नाही. कर्मठ पंतांची मुलगी जमुना तिचे पुरुषोत्तम नामक तरुण ब्राह्मणाशी असलेले संबंध त्या सज्जन पंताचे मवाली शिष्य, बौद्धाच्या आगमना (की आक्रमणा) मुळे भयभीत झालेले वामनभट, असे तुकडे, (व्यक्तिरेखाचे) सांधून संपूर्ण एकांकिका उभी करण्याचा प्रयत्न केला आहे. बौद्धधर्म, हिंदूधर्माने परित्यक्त ठरवलेल्या व्यक्तींना आश्रय देतो हे एकदा संवादातून व शेवटी प्रत्यक्ष सूचित केले आहे. ही एकांकिका सफाईदारपणे बसवलेली असली तरी प्रसंगाचे पुनर्योजन जरा कंटाळवाणे ठरते. त्यातून 'घाशीराम' चा ठसा जाणवतो.

या एकांकिकेचे बीज 'घटश्राद्ध' या चित्रपटात आहे काय अशी शकाही येते. एकांकिकेत दाखवलेला बौद्धधर्माच्या जबरदस्त उदयाचा काळ आणि जमुनेच्या तोंडचे ज्ञानेश्वरांचे पसायदान हे कालानुरूप वाटत नाही. खटकते. असो. सांघिक दुसरे बक्षिस व लेखनाचे बक्षिस या नाटकाने मिळवले.

नेहमी ज्या दोन कॉलेजेस्चा\ दबदबा असतो म्हणजे इंजिनियरिंग व बी. जे. मेडिकल. पण इंजिनियरिंग जरा फिके पडले. 'ये रे ये रे पावसा' ही इंजिनियरिंगची एकांकिका. एका वृद्ध जोडप्याची ही भावकहाणी (इ. इ.) खूपच बोअर झाली. दोघाही कलाकारांनी कामे समजून केली तरीही कंटाळवाणेपणाचे कारण त्या संपूर्ण नाटकात 'घडत' काहीच नाही.

बी. जे. ची 'मरणगंध' (विद्यार्थी लेखक दिग्दर्शक पुरुषोत्तम शिराळकर) ही सुरेख एकांकिका 'ज्याँ पॉल सार्त्र' च्या 'द वॉल' शी साम्य दाखवत होती. मूळची अवघड व तत्त्वज्ञान वगैरे सांगणारी, गोष्ट नसलेली गोष्ट शिराळकरांनी एकांकिकेतून चांगली मांडली. क्रांतिकारकाच्या जीवनातले चढउतार, ताण, संघर्ष दाखवणारी ही एकांकिका किंचित कंटाळवाणी वाटली ती त्या पात्राच्या भाषणवजा प्रकट चिंतनामुळे. बी. जे. चीच दुसरी 'निनावी मूक' एकांकिका ही एक वेगळा प्रयोग म्हणून लक्षात घेणे आवश्यक आहे. ३०।४० मिनिटे एक शब्दही न उच्चारता गोष्ट 'सांगणे' हा प्रकार झाला छान! हा प्रकार नवीनच असल्याने त्यांचे अभिनय जरा 'लाऊड' वाटले तरी हरकत नाही. (याउलट टिळक प्रशिक्षण महाविद्यालयाचे भयाण, शब्दबंबाळ 'आवर्त'! त्याने प्रेक्षकांचा अगदी घाम काढला हो!)

सामाजिक प्रश्नांची चर्चा करणारी नाटके ही बहुतेक सगळी छान झाली. त्यात बी. जे. चे निनावी एक नाटयही येते. यात राजकारणावर टीका ही अपरिहार्यपणे असते.

'मी घोडा हुसेनच्या चित्रातला' ही वामन तावडे याची एकांकिका आबासाहेब गरवारे कॉलेजने सादर केली. सात पात्रे असलेली ही एकांकिका दिग्दर्शक राजेंद्र खंडागळे याने छान बसवली होती. या एकांकिकेत दृश्ये ( visuals ) किंवा घटना कमी होत्या. जास्त भर बोलण्यावर होता.

तर बृहन्महाराष्ट्र वाणिज्य विद्यालयाची 'दुष्ट चक्र' (ले. वृंदावन दंडवते) ही जास्त करून दृश्यावर भर देणारी होती. समूहदृश्ये असूनही व बरीच पात्रे एका वेळी स्टेजवर असतानाही दिग्दर्शक सुहास कुलकर्णीने कोठेही गर्दी भासू दिली नाही किंवा कवायतही होऊ दिली नाही. नेहमीच भरडला जाणारा मध्यमवर्गीय आणि अस्थिर सामाजिक राजकीय स्थिती याच्या परस्पर संबंधाचे चित्रण असलेली ही एकांकिका दिग्दर्शित करताना डोके वापरण्याचे व मेहनत घेतल्याचे जाणवत होते. यातला संगीताचा (अभंगाचा) भाग राहुल घोरपडे यानी छान सांभाळला. विशेषत: 'सुंदर ते ध्यान' या अभंगाला लावलेली चाल खूपच छान आहे; पण गाणारे सगळेच चांगले आणि सुरेल कसे मिळणार?

स्त्रीवरील अत्याचाराला वाचा फोडणारी एस. एन. डी. टी. ची एकांकिका 'अनुत्तरित' पहिल्या फेरीतच का अडकून पडली ते कळले नाही. तीच गोष्ट 'राजाचा खेळ'ची. त्याऐवजी टिळक आयुर्वेदची 'पान्हा' मात्र दुसऱ्या फेरीत आली.


ए. व्ही. एम. जेमिनी किंवा तत्सम 'मद्रासी' चित्रपटाची असावी इतकी भडक 'थीम' या पान्हा एकांकिकेची आहे. सर्व पोरांनी काम वगैरे ठीक केलं हे कबूल; पण कथावस्तू काही महत्त्वाची आहे की नाही? याचा शेवट तर केवळ भन्नाट 'मेलोड्रॅमॅटिक आहे. यातील प्रमुख अभिनेता नीळकंठ देव याला वाचिक अभिनयनैपुण्याबद्दल बक्षीस मिळाले (ते छान झाले. त्याबद्दल त्याचे अभिनंदन; पण 'वाचिक' आणि 'अभिनय' हे दोन्ही एकत्र कसे? कोणी कोडे माझे उकलील का?')

ते असो. तेव्हा अशा तऱ्हेने एकंदर १२ दिवस हा सोहळा चालला. या वर्षी बक्षिसाच्या संख्येत वाढ झालेली आहे तिसरे सांघिक बक्षीस संजीव करंडक 'सुरू' झालाय. वाचिक अभिनयाचं बक्षीस नवीनच आहे. शिवाय कै. जयराम हर्डीकर याच्या स्मृत्यर्थ 'सर्वोत्कृष्ट प्रायोगिक नाटयप्रयोगास' बक्षीस देण्यास सुरवात झाली आहे. या वर्षी ते बृ. म. वाणिज्य म. वि. ने (दुष्ट चक्र) पटकावलेले आहे. ही गोष्ट चांगली आहे; पण प्रायोगिक नावाखाली पुढे काय बघावे लागेल अशी शंकाही मनामध्ये उभी राहते.

'स्पर्धेचा दर्जा घसरतोय' ही ओरड व्यर्थ आहे. चारदोन वाईट नाटके व्हायचीच. बाकी दर्जा आणि नवीन काही तरी करण्याचा लोकाचा उत्साह वाखाणणे आवश्यकच आहे.

सर्व थरातल्या लोकांना आवडणारी ही स्पर्धा आणखीन फुलेल व अधिक चांगली नाटके आपल्याला बघायला मिळतील अशी आपण आशा करू या.

— निखिल गजेंद्रगडकर



# आता आम्ही 'छायागीत' घरीच बघतो...

हो! परवांच आम्ही टी.व्ही. घेतला. लग्नाच्या वाढदिवशी … मुलांचा हट्ट आणि ह्यांची आवड यांची सांगड शेवटी मी घातली. दरमहा शिलकी रकमेतून बँक ऑफ महाराष्ट्रमधे एक आवर्त खातं उघडलं. वर्षाच्या शेवटी जमा रक्कम अधिक व्याज हातात आलं, आणि मग काय…टी.व्ही. घरांत!

## आवर्त ठेव योजना

—ठेवींची अनेक आवर्तने करा

किमान रुपये ५/- अगर रुपये ५/- च्या पटीने खाते सुरू करता येते.



तुम्हीही टी.व्ही. घेऊ शकता
किंवा छोट्या मोठ्या कौटुंबिक गरजा
महाबँकेच्या आवर्त ठेव योजनेद्वारा
पूर्ण करू शकता.मात्र शिलकी रकमेच गुपित
तुमच्या ह्यांना कळू देऊ नका म्हणजे झालं!

बँकिंग सेवा व्यक्तिगत जिव्हाळा

**बँक ऑफ महाराष्ट्र**
(भारत सरकारचा उपक्रम)

मुख्य कचेरी:
'लोकमंगल', शिवाजीनगर, पुणे-४११ ००५

RAAS/BM/F02/80